
आबाजी गोखले

# एक आनंदयात्री



-: लेखिका :-

सौ. स्वामिनी विक्रम सावरकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

**अनुक्रमणिका**

# आबाजी गोखले

# एक आनंदयात्री

- लेखिका –

**सौ. स्वामिनी विक्रम सावरकर**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई**

अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती :
जुलै, १९९९

**प्रकाशक :**
**सचिव,**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर,
मुंबई — ४०० ०१४.

**©महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

**मुद्रक :**
**शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स,**
[शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय अंतर्गत]
सुभाष मार्ग, नागपूर — ४४० ०१८.

**किंमत : रुपये ७०/-**

## अनुक्रमणिका

# मनोगत

माझे वडील श्री. पांडुरंग बळवंत उपाख्य आबाजी गोखले हे नागपूरच्या सार्वजनिक जीवनातील, एक विख्यात व्यक्तिमत्व होते. नाग-विदर्भात ते नर्मदा परिक्रमावासी- पदयात्री म्हणून ओळखले जात. कारण त्यांनी श्री नर्मदा नदीची अत्यंत अवघड अशी परिक्रमा, अल्पकाळात पूर्ण केली. केवळ नर्मदा परिक्रमाच नव्हे, तर सर्व भारतभर त्यांनी पद भ्रमण केले.

एका व्यक्तिने वर्षानुवर्षे कोणताही राजकीय हेतु किंवा आर्थिक अभिलाषा न बाळगता हजारो मैलांचा प्रवास, लोकनिरीक्षण, निसर्गाशी नाते जोडणे आणि या देशातील दुर्गम आदिवासी जनतेची ओळख करुन घेण्यासाठी करणे, हे क्वचित आढळणारे उदाहरण आहे.

पर्यटनातील त्यांच्या विविध अनुभवांचा लाभ मराठी वाचकांना व्हावा, असे मला सारखे वाटायचे. आबाजींचे व्यक्तिमत्व व त्यांचे अनुभव हे पुस्तकरूपाने आले तर ते वाचकांना उपयुक्त होईलच पण मराठी साहित्यालाही एक वेगळा आयाम मिळेल असेही मला वाटू लागले. म्हणून त्यांनी लिहिलेली टिपणे मी पुनःपुन्हा वाचली. आबाजींच्या व्यक्तिमत्वाचे लेखन आणि त्यांनी केलेल्या शब्दांकनांचे आवश्यक ते संपादन करुन हे पुस्तक तयार केले.

या लेखनाची माहिती महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे पूर्वाध्यक्ष कै. विद्याधर गोखले यांना कळली तेव्हां त्यांनी या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यात रुची घेतली. त्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे एक सदस्य डॉ. वि. स. जोग यांच्या पुढाकाराने, उपाध्यक्षा श्रीमती नीला उपाध्ये व सचिव श्री. चंद्रकांत वडे यांच्या सहकार्याने पुस्तक प्रकाशनास गती आली. त्यांना हार्दिक धन्यवाद.

पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे श्री. विद्याधर गोखले व त्यांचेनंतर अध्यक्ष, नागपूरचे डॉ. मधुकर आष्टीकर या दोघाही अध्यक्षांचे निधन झाले. या दुःखद घटनांनंतर मंडळाचे काम सावरल्यानंतर पुस्तक छपाईचे सोपस्कर सुरु झाले.

त्यानंतर आणखी एक दुर्दैवी आघात झाला. माझे वडील आबाजीगोखले हेच दिवंगत झाले. हे पुस्तक बघायला ते आज विद्यमान नाहीत. मुळात त्यांच्यासमोर, त्यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्याची योजना होती. पुस्तक मुद्रणालयात छपाईसाठी गेलेले त्यांना कळले होते. त्यामुळे ते आनंदात होते. पण त्यांचा आणि आमचा सर्वांचा हा आनंद काळाने हिरावून नेला. ती. आबाजींचे वयाच्या ९४ व्या वर्षी नागपूर येथे, वार्धक्याने दि. २१ सप्टेंबर ९८ ला निधन झाले.

आबाजी एक आनंदयात्री होते. या आनंदयात्रीचे जीवन आणि त्यांच्या परिक्रमा नवीन पिढीला प्रेरणादायी ठरतील. त्यांच्या पदयात्रांनी साहसी लोकांना प्रोत्साहन मिळेल.

अनुक्रमणिका

पर्यटन आणि पर्यावरणाचे भान ही आजच्या जगाची सांस्कृतिक सामाजिक गरज आहे. ही गरज पूर्ण करण्याच्या महाकार्यात, या पुस्तकाने खारीचा वाटा उचलला तरी माझे लेखन सार्थकी लागेल असे वाटते.

या पुस्तकाच्या लेखन प्रकाशनात विशेष नामोल्लेख करावयाचा तर श्री विक्रम सावरकर, डॉ. वि. स. जोग, डॉ. सौ. सुमेधा मराठे, सुरेश घुगरे, विकास फडके, विद्याधर बापट, व श्री. बा. जी. सावंत श्री. सुभाष पटवर्धन यांचा करता येईल.

विशेष योगायोग असा की नागपुरच्या ज्या श्री शिवराज फाईन आर्ट लिथो प्रेसमधे आबांनी चाकरी केली त्या शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स मधेच या पुस्तकाची छपाई होत आहे. तेथील सर्व कर्मचारी बंधूंना हार्दिक धन्यवाद!

वसंत पंचमी — सौ स्वामिनी विक्रम सावरकर

२२ जाने १९९९

## अनुक्रमणिका

# -: प्रस्तावना :-

श्रीमती स्वामिनी विक्रम सावरकर यांनी लिहिलेल्या "**आबाजी : एक आनंदयात्री**"हे पुस्तक साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने प्रसिद्ध करताना अतिशय समाधान होत आहे.

महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने अलीकडच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाले. संस्कृती संवर्धनात साहित्य निर्मितीचा वाटा नेहमीच मोठा असतो. साहित्यनिर्मितीत अनुभवांच्या कक्षा विस्तारणाऱ्या साहित्याचे योगदान मोठे असते. मग असे साहित्य प्रथितयश लेखकांनी लिहिलेले असो की अप्रसिद्ध लेखकांनी अशी पुस्तकांचे मोल नेहमीच मोठे मानले पाहिजे.

प्रस्तुत पुस्तक एका सर्व साधारण व्यक्तीने आपल्या आयुष्यात केलेल्या साहसी,रोमांचक अनुभवांचे रसाळ शब्दांकन आहे. विदर्भातील आबाजी गोखले हे विनोबांच्या पिढीतील दीर्घायुषी समाजसेवक असा कार्यकर्ता या देशातील लक्षावधि कीलोमीटर्सचा प्रवास पायी करतो आणि त्या अनुभवांचे कथन करुन पर्यावरणाचा, प्रदूषणमुक्ती जीवनसरणीचा प्रसार करतो ही महत्त्वाची गोष्ट आहे. या दृष्टीने हे पुस्तक लक्षणीय ठरावे. म्हणून या पुस्तकाच्या लेखिका श्रीमती स्वामिनी विक्रम सावरकर यांचे मी अभिनंदन करतो.

वाचकांनाहे वेगळ्या विषयावरील पुस्तक आवडेल असा विश्वास वाटतो.

द. मा. मिरासदार

**अध्यक्ष**

साहित्य संस्कृती मंडळ

महाराष्ट्र राज्य.

## अनुक्रमणिका

## अर्पण पत्रिका

या पुस्तकाच्या निर्मितीत ज्यांचा अर्धवाटा आहे परंतु दुर्दवाने हे पुस्तक बघण्यास जे विद्यमान नाहीत ते माझे वडिल “आनंदयात्री – आबाजी गोखले,”आणि आई कै. सौ. मनोरमा पांडुरंग गोखले या दोघांना सादर समर्पण !

**सौ. स्वामिनी विक्रम सावरकर**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

मनोगत........................................................................................................४

-: प्रस्तावना :- ...............................................................................................६

**एक आनंदयात्री**..........................................................................................९

तेव्हाचा काळ...............................................................................................१४

असहकार चळवळीत सामील ...........................................................................१८

आबाजींचा पसंती विवाह.................................................................................२०

उत्कृष्ट स्त्री नट ............................................................................................२४

कलंदर रसिक ...............................................................................................२८

निर्भर प्रतिकार .............................................................................................३१

कौटुंबिक सफलता .........................................................................................३३

सहधर्मचारिणी .............................................................................................३६

पदयात्रेचे बीज .............................................................................................४०

पदयात्रेचा प्रारंभ चौऱ्यागड..............................................................................४३

सर्वात मोठी –अनेक गंगोदक कावड यात्रा॰..........................................................४५

भारत भ्रमणातील अनुभूती...............................................................................५४

दशावताराची पर्यावरण मीमांसा .......................................................................५७

नर्मदा परिक्रमा मार्गक्रम .................................................................................६४

श्री नर्मदा परिक्रमा.........................................................................................६९

उत्तरतीर यात्रारंभ .........................................................................................९७

समारोप .....................................................................................................११८

## एक

# एक आनंदयात्री

**श्री. पांडुरंग बळवंत तथा आबाजी गोखले, वय वर्षे ९४!**

उंची५ फूट ८ इंच, वर्ण गुलाबी गोरा, रेखीव चेहरा, निळसर डोळे, प्रसन्न व्यक्तिमत्व असलेले आबाजी, मनाने तरुण होते. कारण त्यांचे जीवनावर अतिशय प्रेम होते. सुखदुःख आणि यशापयश यांचा पाठशिवणीचा खेळ प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात चालू असतो. अडी-अडचणी, संकटे यातून कोणीही मुक्त नसतो. माणसाला जीवनात मिळणारे यश आणि सुख हे आल्हाददायक असते. पण अपरिहार्यतेने येणारी संकटे तसेच दुःख आणि अपयश यामुळे मनुष्य वाजवीपेक्षा जास्त व्यथित होतो. अशावेळी दुःखाचा बाऊ न करता, ते निग्रहाने हसत-खेळत पचविणे हा एकमेव मार्ग असतो. परंतु तो अनेकांना जमत नाही. अशावेळी जीवनाविषयी कटुता निर्माण होते. मनुष्य वैतागतो. परंतु त्यामुळे त्याचे संकट किंवा दुःख निवारण होत नाही तर तो सभोवतालच्या व्यक्तींना मात्र दुःखी  करीत असतो.

आबाजींचा स्वभाव मात्र तसा नव्हता. जीवनातील दुःखे आणि अडचणी यावरते संयमाने मात करायचे. व्यक्तिगत दुःखाचा उपद्रव कुटुंबातील मंडळी वा इतरांना होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यायचे. आणि त्या संकट काळातही जितके अधिक शक्य तितके आनंददायी वातावरण प्रयत्नपूर्वक निर्माण करायचे. आपण आनंदी राहिले तर त्याचा परिणाम सभोवतालच्या व्यक्तींवरही होतो उल्साहमूर्ती होते. हे सूत्र आबाजींनी जीवनभर अंगिकारिले.

शेवटपर्यंतते आनंदी होते. पण म्हणजे त्यांना काहीच व्यथा नव्हत्या का? काही दुःखे नव्हती का? अर्थात व्यथा आणि दुःख त्यांनाही होती. बऱ्याच वर्षापासून त्यांना ऐकू येत नव्हते. लोक आपल्याशी काय बोलतात ते त्यांना नीटसे कळत नव्हते. पण त्यामुळे त्यांचा चेहरा कधी त्रासिक झाला नाही. ते हंसत-हंसत समोरच्या माणसाला सांगायचे, “गड्या, मला ऐकू येत नाही : तू या नळीतून बोल”रबरी नळीचे एक टोक ते कानालालावायचे. अडीच-तीन फूट लांबीच्या नळीच्या दुसऱ्या टोकाला एक प्लॅस्टिकची चाडी (फनेल) बसविलेलीहोती. तोंडापुढे ती धरुन बोलले की त्यांना बोलणे ऐकू यायचे.

एरवीऐकू येत नसल्याने दूरदर्शन वरील कार्यक्रमांचा ते थोडासा आनंद घेत. मग त्या उणिवेवर त्यांनी मार्ग शोधला. भरपूर वाचन. त्यांना रहस्यकथांची व ऐतिहासिक पुस्तके आवडायची. त्या वाचनात त्यांचा बराचसा वेळ जाई. शिवाय रोजची पूजा, अभिषेक, नियमीत जप करणे हे दैनंदिन कार्यक्रम ते न चुकता करत. त्याची नोंदही ठेवत.

दि.५ ऑक्टोबर १९९५ ला त्यांच्या पत्नी सौ. मनोरमाबाई तथा वहिनी गोखले यांचे त्यांच्या वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. तेव्हापासून आबाजींना अधिकच एकाकी वाटू लागले. पण व्यथेलाही त्यांनी मर्यादा घातली. विशेष म्हणजे या व्यथेसंबंधी ते इतरांसमोर कधीच बोलत नसत.

अनुक्रमणिका

तसेपाहिले तर आबाजींनी आपले जीवन अंगभूत गुणांमुळे यशस्वी केले. कौटुंबिक कर्तव्येही त्यांनी व्यवस्थित पार पाडली. त्यांचे चिरंजीव केशव हे टाटा कंपनीतून निवृत्त झाले असून त्यांच्या तीनही मुलींचे विवाह झाले.

आबाजींच्यातीनही विवाहित मुलींचे संसार सुखात चालू आहेत. आबाजी त्यांच्या नातवंडांशी आणि पतवंडांशीही मोकळेपणानी बोलयचे. त्यामुळे नातवंडांना आजोबा व पतवंडांना पणजोबा आपले मित्र वाटत.

आयुष्ययशस्वी होण्यासाठी विपुल धन मिळणे आवश्यक असते, अशी अनेकांची समजूत आहे. पण विपुल धनाच्या अभावीही जीवन यशस्वी आणि सुखी करता येते, हे आबाजींनी स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध केले आहे.

श्री.आबाजींच्या जीवनाचा थोडक्यात आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते. अतिशय मध्यमवर्गीय कुटुंबातील हे दहावे अपत्य. दीड वर्षाच्या वयातच वडिलांचे निधन. पाठोपाठ एक मोठा भाऊ घर सोडून व दुसरा जग सोडून गेलेला. तीन मोठ्या बहिणी, आईने कष्टाने प्रपंच सांभाळलेला. आबाजींच्या वयाच्या आठव्या वर्षी स्टेनो झालेल्या, मिळवत्या भावाचे अकस्मात निधन झाले. आबाजींचे शिक्षण सातवीपर्यंत झाले. स्वराज्य आंदोलनात भाग घेण्यासाठी नेत्यांच्या आवाहनानुसार त्यांनी १६ व्या वर्षी शिक्षण सोडले ते कायमचेच! पुढे नोकरीत चार-पाचवेळा बदल. बेताचा पगार. कौटुंबिक जबाबदाऱ्या. तीन मुली व एक मुलगा, येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांचा घरात सतत राबता आणि चौदा वर्षाचा मोठा मुलगा विष्णू याच्या निधनाचे तीव्र दुःख.

अशा परिस्थितीत आबाजींनी अंगभूत गुणांचा उपयोग करुन असे काही छंद जोपासले की, त्यामुळे त्यांना स्वतःला तर आनंद मिळेच परंतु परिचितांनाही त्याचा आनंद घेता यावा. तसेच त्यांनी समाजोपयोगी काही उपक्रम चिकाटीने, निष्ठेने, सातत्याने चालविले.

## विविध छंद

आबाजी उत्तम नट होते. देखणे रुप व सडसडीत बांधा यामुळे त्यांनी उत्तम भूमिका-स्त्री भूमिकाही वठविल्या. दिवाळीत बालगोपालांसाठी उत्तम किल्ले करणे, गणेशोत्सवात विविध मेळे बसविणे. गणेशमूर्तीसाठी जाळीदार मखर तयार करणे, भजनाचे फेर धरुन गणपती विसर्जनाची मिरवणूक काढणे, नवरात्रातील अष्टमीच्या उत्सवप्रसंगी देवीचा तांदुळाच्या उकडीचा मुखवटा तयार करणे. लग्नासाठी रुखवंताच्या उत्तम वस्तू तयार करुन देणे, विविध कार्यक्रम प्रसंगी नकला करणे, तरुण मुले व स्त्रिया-मुली आदींच्या सायकलीने किंवा बसने विविध प्रकारच्या सहली काढणे हे त्यांचे अनेक छंद. स्वतःला आनंदाचा लाभ घेताना इतरांनाही त्यात ते सामावून घेत. दुसऱ्याच्या दुःखात स्वतः सहभागी होत होते. या सहभागाची शेकडो रुपे आहेत. त्यापैकी एक रुप दुर्मिळ आहे. ते म्हणजे नागपूरी भाषेत ‘खांदेकऱ्या’ चे!

अनुक्रमणिका

कोणी, केव्हा व कुठेही बोलाविले तरी, हातची सर्व कामे टाकून अंत्यविधीसाठी जाऊन त्यांनी सर्वतोपरी सहकार्य केले. त्यासाठी त्यांनी ‘अंत्येष्टी मंडळ’ स्थापन केले. वधूवर-सूचकाचे कामही त्यांनी प्रतिदिन सायंकाळी अनेक वर्षे विनामूल्य केले. ‘स्वस्तिक स्विमींग क्लब’च्या वतीने पोहणे शिकविण्याचे कामही अनेक वर्षे विनामूल्य केले. असे अनेक उपक्रम व छंद त्यांनी जोपासले. हे करण्यामागे सामाजिक बांधिलकी होती. त्यामुळे उत्साहाचा अखंड वाहता झरा असलेल्या आबाजींची सामाजिक उपयुक्तता तसेच लोकप्रियता वाढत गेली.

अर्थात या आनंदयात्रीच्या उपक्रमशीलतेचा सर्वोत्तम आविष्कार म्हणजे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पदयात्रा!

पायी चालण्याचा उपक्रम सुरु केला तो वयाच्या पन्नासाव्या वर्षांनंतर!नागपूरला ‘चालण्याच्या’ शर्यतीत भाग घेणे सुरु केले. त्यासाठी जलद चालण्याचा सराव करण्यासाठी रोज नागपूरातील विविध धार्मिक, ऐतिहासिक स्थळांच्या दर्शनाचा कार्यक्रम सुरु केला. रोज किमान आठ-दहा मैल चालण्याची सवय करीत, पुढे साठीनंतर भारताच्या संपूर्ण भूभागाचे दर्शन घेणाऱ्या विविध पदयात्रा करुन, वयाच्या नव्वद वर्षापर्यंत चाळीस हजार किलोमीटरच्या पदयात्रा आबाजींनी केल्या.

या संदर्भात सांगण्यासारखी एक गोष्ट!दि. १८ मार्च १९७९ ला दादर येथील शिवाजी उद्यानाला दहा किलोमीटर अंतर पूर्ण होईल अशी “चाला आणि जिंका”ही स्पर्धा इंडियन ऑईल कंपनीने आयोजित केली होती. या स्पर्धेत आबाजींनी भाग घेतला. चाळीस ते पन्नास वर्ष वयोगटाने हे अंतर नव्वद मिनिटांत तर त्यापुढील वयोगटाने एकशे पांच मिनिटात चालण्याची वेळमर्यादा होती. पंच्याहत्तर वर्षाच्या आबाजींनी केवळ अठ्ठाहत्तर (७८) मिनिटांत हे अंतर चालून विशेष बक्षीस मिळविले. त्यावेळी दूरदर्शनवरील एक कार्यक्रम संयोजक तिथे आले होते. त्यांनी ‘मुलखावेगळी माणसे’ या दूरदर्शन कार्यक्रमासाठी आबाजींची मुलाखत घेण्याचे ठरविले. ठाण्याचे श्री. रामचंद्र ज. फडके यांनी ही मुलाखत घेतली ती प्रसारित झाली.

इंडियन ऑईल कंपनीच्या अशाच, नागपूर येथे दि. २० मार्च १९८८ मध्ये झालेल्या दहा किलोमीटर्स अंतराच्या स्पर्धेत ‘सर्वात मोठ्या वयाचे स्पर्धक व वेळेपूर्वी यश’ या विशेष बहुमानासह पारितोषिक स्वीकारण्याचा मानही आबाजींनी मिळविला.

या आनंदयात्रीच्या पदयात्रांचा इतिहास मनोरंजक आहे तसाच उदबोधकही आहे. आज वेगवेगळ्या निमित्ताने “दौड यात्रा”होतात. काही उपचार म्हणूनही होतात. धावण्याच्या शर्यतींनाच काय पण चालण्याच्या स्पर्धांनादेखील आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. या पार्श्वभूमीवर आबाजींच्या पदयात्रांचे त्यांनीच केलेले स्वकथन आजच्या युवक-युवतींना प्रेरक ठरेल. हा हेतू लक्षात घेऊन या पुस्तकाच्या मध्यंतरीच्या विवेचनापासून ते रोमहर्षक कथन दिले आहे. अर्थात या बहुआयामी व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीची पार्श्वभूमी अवलोककिणेही अपरिहार्य आहे.

* * *

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका




दि. २१ जानेवारी १९६२ ला नागपूर येथे १७ व्या राष्ट्रीय क्रिडा महोत्सव समारोप प्रसंगी तीन मैल चालण्याच्या स्पर्धेत सातत्याने आठ वर्षे विजयी झालेल्या आबाजींना, राज्यपाल श्री. प्रकाश विशेष क्रीडा पुरस्कार देतात.

अनुक्रमणिका

## दोन
## तेव्हाचा काळ

श्री स्वामी समर्थांच्या दास बोधातील, "नाना सुकृताचे फळ । तो हा नरदेह केवळ । त्याहीमधे भाग्य सफळ । तरीच सन्मार्गी लागे । जन्मा आलियाचे फळ । काही करावे सफळ । ऐसे न करता निर्फळ भूमिभार होय", या शिकवणीनुसार आचरण करण्याचे कसब थोड्या मंडळींना जमते. माझे वडील श्री. पांडुरंग बळवंत तथा आबाजी गोखले व आई (कै.) सौ. मनोरमा तथा वहिनी गोखले या उभयतांनी मात्रसमर्थांच्या शिकवणी प्रमाणे संसार आणि परमार्थ यांची सांगड घालून आदर्श संसार केला.

आबाजींचा जन्म १९०४ मध्ये नागपूरला झाला. पारतंत्र्यातील हा काळ. पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी नवनवीन चळवळी उदयास येत होत्या. त्यामुळे सर्वसामान्य जनजीवन सदैव धास्तावलेल्या अवस्थेत होते.

प्रपंच करणेही दुरापास्त वाटावे अशा वातावरणात स्वदेशासाठी, समाजासाठी जमेल ते काम करुन आपले ध्येय गाठणारी एक मोठी पिढी त्या काळातही निर्माण झाली. प्रपंचाकडे पाठ फिरवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व झोकून अनेकांनी आपले प्राण, आपले जीवन सार्थकी लावले, त्यासाठी तुरुंगवास, हालअपेष्टा, मानहानी सहन केली.

अर्थात हा मार्ग अवलंबिणे सर्वांनाच शक्य नव्हते. मग मांडलेला प्रपंच सांभाळून जे-जे जमेल, ते-ते समाजोपयोगी काम करण्याचे व्रत काहींनी स्वीकारले व आयुष्यभर त्या व्रताची उजळणी चालूच ठेवली. त्याचे उदयापन करुन चैनीचे, आरामाचे आयुष्य जगावे असे कधीही न वाटणाऱ्या या मंडळींमध्ये श्री. आबाजी व सौ. वहिनी गोखले यांचा फार वरचा क्रमांक लागतो.

नागपूर येथील सीताबर्डी विभागातील महाजन चाळीत दि. २५ ऑक्टोबर १९०४ साली आबाजींचा जन्म झाला. त्यांचे वडील श्री. बळवंतराव हे १९०२ मध्ये मंगळवेढे येथून नागपूरला येऊन स्थायिक झाले होते. आबाजींच्या मातोश्री सौ. लक्ष्मीबाई या न्यायमूर्ती महादेवगोविंद रानडे यांच्या घराण्यातल्या होत्या. या दांपत्याला दहा अपत्ये झाली — पाच मुली व पाच मुलगे. त्यापैकी सात हयात राहिली. श्री. बळवंतराव यांनी नागपूरला रेल्वेत कंत्राटदारीचा व्यवसाय सुरु केला होता. या व्यवसायात प्रपंच नीटपणे चालावा एवढी अर्थप्राप्ती त्यांना होऊ लागली. पण ऐन तारुण्यात त्यांचे आकस्मिक निधन झाले. आबाजी हे त्यांचे शेवटचे अपत्य, तेव्हा ते दीड वर्षाचे होते. वडिलांच्या निधनाने सर्व कुटुंब पोरके झाले. वडिलांच्या पाठोपाठ आबाजींचा एक मोठा भाऊ स्वर्गवासी झाला. वर्षभरातच गंगाधर नावाचा भाऊ घर सोडून अध्यात्ममार्गाकडे निघून गेला. आबाजींच्या वयाच्या आठव्या वर्षी वासुदेव हा स्टेनो झालेला भाऊ अचानक निधन पावला. अशाप्रकारे आबाजींच्या आईवर पतिनिधनानंतर फार मोठे उत्तरदायित्व येऊन पडले. तेव्हाच्या काळी पतिनिधनानंतर निराधर झालेल्या स्त्रीला काबाडकष्टाची कामे करुन प्रपंच सांभाळावा लागे.

अनुक्रमणिका

पन्नास-साठ वर्षांपूर्वीची स्त्री आणि आधुनिक स्त्री या दोघींच्या जगण्याच्या पद्धतीत खूप मोठी तफावत आहे. स्त्री मुक्तीच्या संकल्पनांचा बागुलबोवा निर्माण करणाऱ्या मध्यमवर्गीय आधुनिक स्त्रीने थोडा विचार केला तर तिच्या लक्षात येईल की, आताची स्त्री नोकरी करणारी असली तरीही मनाजोगते आयुष्य जगू शकते. घरातील सोयीसुविधांमुळे प्रपंच चालविताना पूर्वीप्रमाणे काबाडकष्ट उपसावे लागत नाही. मिक्सर, फ्रिज, दळणांसाठी गिरण्या, स्वच्छ केलेले घरपोच किराणा सामान आणि कंटाळा आला की पावबिस्किटे आदींसाठी बेकरीचा मिळणारा आसरा-या साऱ्या सुविधांमुळे घरकामे झटपट होतात. शिवाय शिक्षणामुळे मिळालेले विचारस्वातंत्र्य हाही मोठा लाभ आहेच.

त्या काळात मात्र शिक्षणाअभावी शारीरिक व मानसिक या दोन्ही कष्टांवाचून स्त्रीला पर्याय नव्हता. आबाजींच्या आई लक्ष्मीबाई हिच्यावर पतिनिधनानंतर ५-६ मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पडली. अतिशय काबाडकष्ट करुन तिने प्रपंच सांभाळला. दळणकांडण, धुणीभांडी व स्वयंपाक करणे याबरोबरच मुलांना सुसंस्कारित करण्याचे दायित्वही तिने पार पाडले.

पण त्या एका अर्थाने थोड्या सुदैवीही होत्या. त्यांचे भाऊ (कै.) यशवंत रघुनाथ रानडे हे अफ्रिकेत स्थायिक झाले होते. ते खऱ्या अर्थाने पाठीराखे भाऊ होते. राखी पौर्णिमा आणि भाऊबीज या सणांचाअर्थ त्यांनी जाणला होता. आफ्रिकेहून ते दर चार महिन्यांनी या बहिणीला शंभर रुपये पाठवीत. सन् १९०७ ते १९३२ पर्यंत त्यांनी या प्रथेत खंड पडू दिला नाही. त्यावेळी महिना पंचवीस रुपये ही मदत खूपच होती. आबाजींच्या आईचे काबाडकष्ट आणि भावाची मदत यामुळे त्यांच्या संसारात सुरळीतपणा आला. त्या जोरावरच त्यांनी गोदावरी, गंगू, तुंगभद्रा या तीनही मुलींची लग्ने सुस्थळी करुन दिली. मोठी गोदावरी, सौ. पार्वती सदाशिव कानिटकर ही खडकपूरला, मधली गंगू, सौ. गंगा मुकुंद परांजपे ही जबलपूरला तर धाकटी तुंगभद्रा, सौ. इंदिरा जनार्दन फडके ही कल्याणला दिली. आता तिघीही हयात नाहीत.

आबाची मुंज योग्य वयात व्हावी असे त्यांच्या आईला वाटे. पण परिस्थिती नाजूक होती. त्यामुळे तिला काही मार्ग सुचेना. मात्र सर्वांशी प्रेमाचे संबंध असल्याने घरमालकीणबाई श्रीमती माई महाजन यांनी आबाजींच्या मुंजीचा खर्च केला व आईची इच्छा पूर्ण झाली. महाजन चाळीचे मालक असलेले हे महाजन घराणे नागपूरातील अत्यंत सधन घराण्यांपैकी एक आहे.

मुंज झाल्यानंतर साहजिकच चातुर्मासात किंवा अन्य सणांवारी मुंज मुलाला जेवायला बोलाविण्याच्या रीतीनुसार आबाजींना चाळीतील भवाळकरांकडे नेहमी जेवायला बोलाविणे असे.

एक दिवस आबाजींना त्यांची आई म्हणाली “अरे आज तुला ब्राह्मण म्हणून जेवायला जायचे आहे”. कोणाकडे ते आबाजींनी पुढे काही ऐकले नाही. ते खेळायला निघून गेले. जेवणाची वेळ होताच सरळ भवाळकरांकडे जेवायला गेले. जरा वेळ बसल्यावर त्यांच्या लक्षात आले की आज यांचेकडे जेवायला बोलावलेले नाही. आबाजींची चुळबूळ बघून भवाळकर आजींनीही ओळखले की हा चुकून जेवायला आला आहे. अर्थात् त्यांनी चटकन शिरा केला. आबाजींना थांबवून घेतले व जेवायला वाढले. अशा अनेक गमती होत असत.

**अनुक्रमणिका**

आबाजींनी त्यांच्या लहानपणचा व तरुणपणचा तेव्हांचा काळ व आताचा काळ यावर एक काव्य केले आहे. या दोन्हींमधील फरक सांगताना ते म्हणतात :- “माझ्या लहानपणीचा काळ किती समाधानी आणि आनंदीवृत्तीचा होता. गरजा कमी आणि एकमेकांना सहाय्य करण्याची वृत्ती जास्त पगार अगदी अल्प असे. पण स्वस्ताईइतकी होतीकी, आताच्या पिढीचा त्यावर विश्वास बसणार नाही. मुलामुलींचे विविध खेळ, सणावारांची रेलचेल आणि त्यावेळचा आमचा उत्साह यात गेलेले बालपण आता स्वप्नवत् वाटते.”त्यावेळच्या गमतीजमतीचे साध्यासुध्या भाषेतले ते काव्यमय वर्णन वाचताना वाचकांनाही त्या काळातील आनंदाचा लाभ घेतल्याचे समाधान नक्कीच वाटेल. तसेच त्या काळांतील स्वस्ताई वाचून नवलही वाटेल. आबाजींच्या त्या दीर्घ काव्यातील या काही ओळी:-

कुठेकाळ तो बालपणीचा, सद्यः स्थितीही कशी आता ।
नसेचि तुलना सत्य असे हे, ऐकून वाटे अशक्यता ॥१॥

होतोआम्ही लहान तेव्हा समाधान हे किती असे ।
खाऊ मिळता ढब्बूचाही, हंसे दाबणे शक्य नसे ॥२॥

पगार होता वीस सहात, खुषीत केला संसार ।
नगदी देऊन, सौदा घेऊन, न ठेवी कवडीऊधार ॥३॥

वीस रुपाई घेत होतो, दुधत्या गायीसह बछड़ा ।
तीन रुपये बकरी विकता, आनंदे धनगर मारी उड्या ॥४॥

असूड गाडी दो रुपयांची, तेल शेर बावीस पैसे ।
कापड़ रुपया पाच वार, रुपया धान्याचे ओझे ॥५॥

वांगी, गाजर, मुळा, चाकवत, पैसा पासरिला देती ।
पाऊण रुपया, रुपया शेरा, लोणी-तूप हे घ्या म्हणती ॥६॥

चौदा पैसे शेर होता, साबुदाणा त्या काळी ।
सहा पैशांची भाजी घेता, लठ्ठ होतसे ती झोळी ॥७॥

आणा पायली जांभूळ होते, पैसा पायली ती बोरे ।
आवळे, चिंचा, कैऱ्या खाण्या चढू खारीसम आम्ही पोरे ॥८॥

क्वचित् सायकली, तशा मोटारी, जाण्या-येण्या असे टांगा ।
मुले वृद्धही अती उत्साही, चालविण्या अमुच्या टांगा ॥९॥

अनुक्रमणिका

मंगळागौरी, गौरी-गणपती, पुजूनी जाग्रण समयाला ।
कोंबडा, झिम्मा, फुगडी, पिंगा खेळती बालिका नि महिला ॥१०॥

महाराष्ट्री जोखेळ मुलींचा, प्रघात एक भोंडला ।
विदर्भात तशी भुलाई, आता क्वचित् दिसे मजला ॥११॥

काय असे तो रुसवा फुगवा, भुलाबाईची ती गाणी ।
बहुप्रकारे प्रसाद झांकूनि ओळखा म्हणती मुली कुणी ॥१२॥

मुलामुलींचे खेळ खेळलो, त्यात अनेक प्रकार ।
आठवणी आता पुरे करु या, न राहे मग त्या सुमार ॥१३॥

* * *

अनुक्रमणिका

## तीन
# असहकार चळवळीत सामील

आबाजी लहानपणीसतत आजारी असत. दुर्बल शरीरयष्टीमुळे त्यांच्या पायात ताकद नव्हती. त्यामुळे वयाच्या पाचव्या वर्षी ते चालायला लागले. तीन मोठ्या बहिणींच्या पाठचा हा भाऊदिसण्यात खूपचरेखीव, निळ्या डोळ्यांचा व अतिशय तरतरीत होता. या तिघी बहिणींचा तो फार लाडका होता. त्यामुळेच त्याला या बहिणी जमिनीवर ठेवतही नसत. तो सदैव त्यांच्या कडेवरच असे. मात्र वयाच्या पाचव्या वर्षी चालावयास लागलेले आबाजी, पन्नाशी उलटल्या नंतर पदयात्रा सुरु करुन, चाळीस हजार किलोमीटर्स चालण्याचा विक्रम करतील असे त्यावेळी स्वप्नातही कोणी कल्पिले नसेल.

लहानपणापासून आबाजींचा ओढा पुस्तकी शिक्षणापेक्षा अनुभवी शिक्षणाकडे जास्त होता. ते हरहुन्नरी होते.विविध प्रकारच्या सामाजिक कार्यात भाग घेण्याची त्यांची वृत्ती होती. तशातच १९२० साली स्वातंत्र्य चळवळीतही त्यांनी भाग घेतला. त्यावेळी त्यांचे शिक्षण फक्त इंग्रजी सातवी पर्यन्तच झाले होते. शिक्षण सोडून युवकांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्याचे नेत्यांनी आवाहन केल्यामुळे आबाजींनीही शिक्षण सोडून चळवळीत भाग घेतला. त्यांनी एकदा मला सांगितले :-

‘त्यावेळी नागपूरात श्री. मा.ज. कानेटकर हे काँग्रेसचे काम करणारे होते. ते एक वर्तमानपत्र चालवित. ते उत्तम वक्तेही होते. आठवड्यातून तीन-चार वेळा ते राष्ट्रीय काँग्रेस शाळेतर्फे फेरी काढण्याचा कार्यक्रम ठेवीत. त्यात भाग घेण्यास मी नियमित जात असे. ठेक्यात चालत एखादे गीत गात आमचे हे “मार्चिंग चालत असे, सौ. अनुसयाबाईकाळे, श्री. अप्पाजी गांधी ही मंडळीही जे कार्यक्रम स्वराज्य मागणीसाठी योजित, त्यातही मी सहभागी होत असे. पुढे १९२४ मध्ये माझ्यावर घराची जबाबदारी पडली व मला नोकरी करणे प्राप्त झाले आणि स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष सहभाग घेणे मला जमेनासे झाले.”

‘आलेअतीत अभ्यागत। जाऊ नेदी भुकस्त।

यथानशक्त्या दान देत । तो सत्वगुण ॥ - ही समर्थांची शिकवणगोखल्यांच्या घरी प्रथमपासूनच आचरिली जात होती. त्यामुळे घरातसदैव पाहुणे मंडळी असत तशात आबाजींच्या भावाचे निधन झालेले. पुढे तिन्ही बहिणींची लग्ने झाल्यावर त्या तिघींच्या सासरची मंडळी येत. त्यांचे सणवार-माहेरपण या साऱ्या जबाबदारीने आजी थकली होती. त्यामुळे आबाजींना या स्वातंत्र्यलढ्यातून बाजूला व्हावे लागले. आईचे कष्ट कमी करण्यासाठी त्यांनी नोकरीचा मार्ग स्वीकारला. अर्थात नोकरी सांभाळून जमेल ते समाजसेवेचे कार्य त्यांनी चालू ठेवले होते.

आबाजींच्याजन्मापासूनच, ते तेव्हाच्या सीताबर्डी, मेनरोड, नागपूर येथील ४५-५० घरांच्या महाजन चाळीत रहात होते. या महाजन चाळीत मध्यमवर्गीय संस्कृतीचे सुंदर दर्शन होत असे. कौलारु दोन किंवा तीन खोल्यांच्या या घरांमध्ये आर्थिक सुबत्ता दिसली नाही तरी मनाची श्रीमंती भरपूर होती. एखाद्या मोठ्या

कुटुंबासारखे त्या चाळीतले वातावरण होते. आमच्या लहानपणापासून आबाजी व सौ. आई चाळीतल्या लोकांचे आधारवड आहेत, असे विविध प्रसंगातून आम्हांला जाणवत होते.

* * *

अनुक्रमणिका

## चार
# आबाजींचा पसंती विवाह

लहानमोठ्या नोकऱ्या बदलत १९२५ साली नागपूरच्या 'शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स विभागात' आबाजी नोकरीला लागले. त्यात स्थिरावल्यावर साहजिकच त्यांच्या आईने सून आणण्याची इच्छा त्यांच्याजवळ व्यक्त केली.

सध्याच्यासुधारलेल्या काळाच्या मानाने १९२८ साल जुन्या रुढी-कल्पनांना मानणारे! पण स्वतःच्या मताने व बुद्धीने प्रत्येक गोष्टीचा निर्णय घेणाऱ्या आबाजींनी विवाहाचा प्रश्न स्वतःच सोडवला. सीताबर्डीवर राहणाऱ्या (कै) श्री. लक्ष्मणराव व सौ. सावित्रीबाई अभ्यंकर यांची पुतणी कु. अनसुया रामचंद्र अभ्यंकर हिच्याशी लग्न करावयाचे ठरवून तसे आपल्या आईला सांगितले. तिनेही आनंदाने संमती दिल्यावर दि. २८ एप्रिल १९२८ ला आईच्या काका-काकूंनी हा विवाह करुन दिला. ऐका परीने आबाजींचा हा प्रेमविवाहच होता.

आईसौ. मनोरमा म्हणजे रमा पुढे साऱ्यांची वहिनी बनून गोखल्यांच्या घरी चौदाव्या वर्षी आली. आबाजींची ही निवड सर्वथैव योग्य व अचूक ठरली. माझी आजी कष्टाळू व संयमी होती. आजीच्या प्रेमळ आणि दक्ष दृष्टीत वागून आमच्या आईने आजीला शेवटपर्यंत समाधानातच ठेवले. फार काय तिच्याहून मोठ्या वयाच्या तिन्ही नणंदांची मनेही तिने जिंकली. त्यांच्या सर्व मुलांमुलींना, भाच्यांना या मामा-मामीचे फार प्रेम मिळाले. त्यामुळे ही भाचेमंडळी त्यांच्या आईवडिलानंतर या दोघांना तेवढाच मान देत.

आमचीआजी लक्ष्मीबाई हिचे व माझ्या आईचे छान जमत असे. त्यामुळे त्या नंतरची काही वर्षे आजीचे आयुष्य सुखा समाधानात गेले. १९३६ साली आजीचे निधन झाले. आबाजींच्या वयाच्या दुसऱ्या वर्षी वडील गेल्याने आई म्हणजे त्यांचे सर्वस्व होती. त्यामुळे आईच्या निधनाने त्यांना पोरके झाल्याचे तीव्र दुःख झाले. पण अनेक उद्योगात गुंतवून घेण्याच्या संवयीमुळे ते त्यातून लवकरच सावरले. खरे तर रामदास स्वामींच्या दासबोधाने त्यांना सावरले. दासबोधाने प्रभावितझालेल्या आबाजींनी ती शिकवण जीवनात आचरिली.

रामदासांनी म्हटले आहे की :-

बहुतांचे मुखी उरावे। बहुतांच्या अंतरी भरावे।
उत्तम गुणी विवरावे। प्राणिमात्रांसी॥

त्यानुसारआबाजींनी प्रपंच थाटला, नोकरीत स्थिरावले. पण हाडाचे धडपडे आबाजी केवळ नोकरी – घर यातच रमणारे नव्हते.

आबाजी उत्तम मूर्तिकार होते. शाडूच्या गणपती आणि गौरीच्या सुंदर मूर्ती ते तयार करीत असत. इतरांनाही शिकवीत. गणेशोत्सवाच्या वेळी कागदाच्या बारीक नक्षीकामाचे मखर तयार करणे, पुढाकार घेऊन गणेशोत्सवासाठी विविध कार्यक्रम बसविणे, मेळे, नाटके करण्यासाठी मदत करणे ही कामे ते उत्साहाने करीत. त्यावेळी सीताबर्डीवरील श्री गणेश मित्र समाज व भिडे कन्या शाळा या दोन्ही संस्थांचा दहा दिवस श्री

गणेश उत्सव साजरा होत असे. स्थापनेपूर्वी श्री गणेश मूर्ती रेल्वे लोखंडी पुलापासून उत्सव स्थानापर्यंत आणताना तसेच विसर्जनाच्या वेळी भजनाची दिंडी काढली जात असे. टाळ, मृदुंग, झांजा वादनासह नाचत, फेर धरीत या मिरवणुकी निघत. आबाजी त्यांत अग्रभागी असत.

लेझीम,टाळ व मृदुंगाच्या साथीसह 'मोरया-मोरया, गोपाल कृष्ण राधेकृष्ण' आदी भजनात रंगलेले आबाजी गणेशमूर्तीपुढे धरलेल्या फेराच्या मध्यभागी लवलवत्या पातीप्रमाणे फार सुंदर नाचत. अतिशय उत्साही व पवित्र वातावरण निर्माण करणाऱ्या त्या गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीची अजूनही आम्हाला फार आठवण येते. आबाजींच्या उपस्थितीशिवाय त्या मिरवणुकींना मुळी रंगच येत नसल्याने त्यांच्यासाठी तीन-चार मंडळांच्या मिरवणुकी थांबलेल्या असत. त्यांचे भजनी मंडळ, गोरक्षण मंडळ त्याकाळी प्रसिद्ध झालेले होते.

**समाजसेवक आबाजी**

पहिल्या प्रकरणात उल्लेखिल्याप्रमाणे आबाजी इतरांच्या दुःखात अग्रक्रमाने सामील होत. प्रमुख उदाहरणच द्यायचे झाले तर अंत्ययात्रेचे देता येईल.सर्वसाधारणपणेपरिचितांच्या अंत्ययात्रेला लोक जाणे टाळतात. हे आबाजींच्या लक्षात आल्याने वयाच्या १६ व्या वर्षापासून अंत्ययात्रेचे बोलाविणे येताच, ऊन पाऊस, थंडीवारा, दिवसरात्र याचा विचार न करता एक सामाजिक कर्तव्य म्हणून आबाजी जाऊ लागले. कित्येकवेळा तर अनोळखी व्यक्तीही त्यांना बोलावण्यासाठी येत असत. कारण मृत्यू हा प्रसंगच विलक्षण!अनेकांना या महायात्रेच्या वेळी चार माणसे मिळवणेही कठीण असते. शिवाय या संबंधात काय सामान आणावे लागते. घाटावर काय क्रिया कराव्यात, लाकडे व गोवऱ्यांची रचताना लांबी-रुंदी किती ठेवावी, तिरडी कशी बांधावी, ही माहिती नसल्याने, आबाजींचा लौकिक ऐकून रात्री-अपरात्रीही त्यांना त्यासाठी बोलावणे येई. अनोळखी व्यक्तीसोबतही आबाजी निर्भयपणे जात असत. अशावेळी घरच्या मंडळींना मात्र ते सुखरुप परत येईतो चिंतेने ग्रासलेले असे.

त्यावेळीअंत्ययात्रा म्हणजे व्याप असे. कितीतरी दुकानांत जावे लागून सामान जमवावे लागे. अंत्यविधीच्या सर्व वस्तू प्रत्यक्षात घेतल्या गेल्याच पाहिजेत, हे धोरण असे. त्यामुळे आबाजींनी पुढाकार घेऊन एक 'अंत्यविधी मंडळ' स्थापन केले. आबाजी व त्यांचे काही मित्रअंत्ययात्रेच्या या कामात संपूर्णपणे सहकार्य करीत असत.

अनेकदाआबाजींना अस्थिविसर्जनासाठी जाण्याचेही आमंत्रण येत असे. या कामातील सर्व माहिती व संस्कार यात ते पारंगत होते. वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत या कामात पूर्वीच्याच निष्ठेने ते मदतीला धावून जात. वयाच्या सोळाव्या वर्षापासून 'अंत्यविधी' या कामातून त्यांनी केलेल्या सामाजिक सेवेला खरोखरच तोड नाही. या विषयासाठी कोणी 'डॉक्टरेट' द्यायची ठरविले तर त्यांना आबाजी इतकी योग्य व्यक्ती सापडणे कठीण होईल. अर्थात् डॉक्टरेट नव्हे पण आबाजींच्या मित्रमंडळींनी त्यांना 'मुडदेफरास' ही पदवी बहाल केली होती.

आमच्यामहाजन चाळीतील श्रीमती सीताकाकू डेग्वेकर यांचा आबाजींवर फार जीव होता. त्या नेहमी सांगत की, आबा, मी मेल्यावर मला तुझ्या खांद्यावरुन जायचे आहे. हीच माझी शेवटची इच्छा आहे. अर्थात् त्यांची ही इच्छा आबाजींच्या हातून पूर्ण झाली.

अनुक्रमणिका

वधूवरसूचक मंडळाचे कामही आबाजींनी खूप वर्षे विनामूल्य केले. सायंकाळी कामावरुन कितीही दमूनभागून ते आले तरी चहा घेऊन लगेच ते स्थळे विचारण्यासाठी आलेल्या मंडळींना आपल्या वहीतूनत्यांच्या अपेक्षेनुरुप असलेली स्थळे सांगत. या हरहुन्नरी समाजसेवकाने 'वधू-वर सूचक मंडळ' स्थापन केले. आज सर्वत्र व्यावसायिक स्तरावर अशी अनेक मंडळे स्थापन झाली आहेत. पण आबाजी ज्या काळात नागपूरात हे काम करीत होते त्या काळात ते एकमेव होते. त्यांची ती वरमंडळींची टाचण वही वधूपित्यांना भगवदगीतेसारखी वाटायची.

त्यांच्याया उपक्रमामुळे अनेकांचे विवाह जुळले. काही वधूपिते अगत्याने पेढे घेऊन ही सुवार्ता आबाजींना सांगायला येत, लग्नाचे आमंत्रण देत. तर काहींनी, आबाजींना केलेल्या विनामूल्य सेवेविषयी कृतज्ञता दर्शवावी, एवढा साधा उपचारही पाळला नाही. अर्थात् आबाजींनी या गोष्टीची कधीच खंत बाळगली नाही.

"आपणासीजे जे ठावे, ते ते इतरांसी शिकवावे"या गोष्टींची आबाजींना फार हौस होती. ते पट्टीचे पोहोणारे होते. त्यांचे मित्र (कै.) भाऊराव गाडगीळ व श्री. भाऊ सोमपूरकर यांच्या मदतीने "स्वस्तिक स्विमींग क्लब' ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने हे तिघेही नागपूरच्या जवळ २॥ - ३ मैलांवरील तेलंखिडी या तलावावर उन्हाळ्यात व सुट्टीच्या दिवशी रोज सायकलने जाऊन, मुलामुलींना पोहायला शिकवीत. आम्हा मुलींना व आमच्या मैत्रिणींनाही त्यांनी पोहायला शिकविले. आमचा मोठा भाऊ केशव हा तर आबाजींप्रमाणे पट्टीचा पोहोणारा!जवळ जवळ दोन अडीचशे युवकांना या मंडळींनी पोहोण्यात तरबेज केले. त्यांच्या या कालावधीत एकही अपघात झाला नाही. उलट अन्य पाच-सहा व्यक्तींना त्यांनी बुडताना वाचविले. आमच्या आईसोबत तिच्या समवयस्क स्त्रियांनाही त्यांनी पोहायला शिकविले. आमच्या घरामागे असलेल्या महाजनांच्या विहिरीत सौ. आई, सौ. ताराताई साने वगैरे उत्तम पोहोत असत. ते मला चांगले आठवते.

स्त्रियांनीकेवळ चूल आणि मूल यातच गुरफटावे अशी आबाजींची विचारसरणी नव्हती. आईला तिच्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांचे सदैव प्रोत्साहन असे. आबाजी आईला सायकल शिकण्यासाठी खूप आग्रह करीत असत. त्यासाठी मात्र ती नकार देत असे. शेवटी एक दिवस आबाजींनी नाराजी दाखवित तिला कारण विचारले. त्यावेळी आई म्हणाली की, "तुमच्या व माझ्यामागे इतकी कामे आहेत की आपल्याला सवड मिळत नाही. त्यातून मी सायकल चालवायला तुमच्याआग्रहाखातर शिकलेच तर तुम्ही माझ्यामागे आणखी बऱ्याच कामगिऱ्या सोपविणार!"त्यामुळे निरुत्तर होऊन आबाजींनी तिला सायकल चालवायला शिकविण्याचा नाद सोडून दिला.

**विविध छंद**

वर्षातूनसात-आठ वेळा निरनिराळ्या ठिकाणी सहली काढणे हा त्यांचाएक प्रमुख छंद होता. नागपूरला धुळवडीचा खेळ खूपच चालतो. त्यावेळी ते तरुण मुलांची सायकलवरुन सहल काढीत. कधी लहान मुलांमुलींना तर कधी प्रौढ स्त्रियांनाही ते सहलीला घेऊन जात असत. सोबत नाही म्हणून स्त्रियांना सहलीला

अनुक्रमणिका

जाता येत नसे. म्हणून आबाजी व सौ. ताई दोघेही धार्मिक व प्रेक्षणीय ठिकाणाच्या सहली आयोजित करीत असत.

चाळीतीलमुलांना व पुढे नातवंडांनाही धाडसी कामे करण्यासाठी ते प्रोत्साहन देत. त्यासाठी झाडावर चढणे, सीताबर्डी टेकडीवरुन कठीण मार्गाने मंदिरात जाणे आदी गोष्टी स्वतःच्या मार्गदर्शनाखाली करवून घेत.

दिवाळीत'सुंदर किल्ला' दरवर्षी नवीन प्रकारे करण्यावर त्यांचा भर असे. आम्ही चाळीतील बाळगोपाळ मंडळी समज आल्यापासून या कामात माती आणण्यापासून त्यांना सर्व मदत करीत होतो. प्रत्येक गोष्ट व्यवस्थित व उत्तम करण्यावर त्यांचा भर होता. त्यामुळे आमच्या घरी होणाऱ्या या दिवाळीतील किल्ल्यांची प्रसिद्धी खूप झाली होती. खूप मंडळी लांबून त्यासाठी येत. आबाजींच्या उत्साहाला तर त्यावेळी सीमाच नसे. आता नुकताच त्यांनी १९९४ साली माझी मोठी बहीण सौ. दुर्गा (सुधा रानडे) हिच्या मदतीने (तीही आबाजींच्या तालमीत अनेक कलांमध्ये पारंगत आहे) आताच्या महाजन मार्केट मधील वरच्या मजल्यावरील गॅलरीत सुंदर किल्ला तयार केला. त्यासाठी त्यांना स्पर्धेतील पारितोषिकही मिळाले. १९९३ मध्ये नागपूरच्या 'शंकरनगर' मध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली माझे भाचे रमेश व प्रदीप कानिटकर यांनी किल्ला स्पर्धेत भाग घेऊन किल्ला केला. त्यावेळी घराच्या भोवती व किल्ल्यावर एक हजार पणत्या लावून अतिशय मनमोहक सायंकाळ आबाजींच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी निर्मिली.

* * *

**अनुक्रमणिका**

## पाच
# उत्कृष्ट स्त्री नट

नागपूर येथील 'आनंद विलासी मंडळ' व 'सहकारी संस्था' या दोन्ही संस्थांचे आबाजी आघाडीचे सदस्य होते. आबाजी दिसण्यात देखणे, सडपातळ व भूमिकेची उत्तम समज असलेले होते. त्यावेळी नाटकांमध्ये स्त्रियांची भूमिका बहुधा पुरुषच करीत. त्यामुळे या मंडळाच्या अनेक नाटकांतून त्यांनी स्त्री भूमिका केल्या. माझ्या लहानपणी 'खडाष्टक' व 'आग्ऱ्याहून सुटका' या नाटकातील त्यांच्या स्त्री भूमिका पाहिल्याचे मला अजूनही आठवते. 'खडाष्टक' नाटकाचे अकरा प्रयोग झाले. त्यांच्या सोबत त्यांचे मित्र सर्वश्री नरहरी जोशी, विष्णू गोडबोले, टोकेकर गुरुजी, कानगो गुरुजी, बाळ भावे, मामा आगटे आदी अनेक मंडळी या नाटाकांतून उत्तम कामे करीत.

सन्१९४५ मध्ये साहित्यसम्राट न. चिं. केळकर हे नागपूर येथे आले होते. त्यांच्या सन्मानार्थ सहकारी संस्थेच्या वतीने 'खडाष्टक' या नाटकाचा प्रयोग सादर केला. या नाटकातील नायिकेची, गौरीची भूमिका अतिशय उत्तमरित्या श्री. आबाजींनी साकार केली.

आनंदविलासी मंडळाच्या सभा प्रायमरी शाळेत भरत. नाटकांच्या तालमी रात्री होत. एखाद्या संस्थेच्या मदतीसाठी नाट्यप्रयोग केले जात. संस्थेचे सदस्य फक्त खर्च घेऊन बाकी सर्व उत्पन्न अन्य संस्थेला देणगी म्हणून देत.

'सहकारी संस्था' ही त्यापेक्षा जुनी संस्था होती. आपापल्या नोकऱ्या व व्यवसाय सांभाळून सर्व सदस्य रात्रीएकत्र जमत. या संस्थेच्या वतीने अनेक लोकोपयोगी कामे केली जात. गरीब विद्यार्थ्यांना फी पुस्तकांची मदत करणे व दुखणेकऱ्यासाठी आवश्यक वस्तू पुरविणे, तसेच कुठे आग वा तत्सम संकट आले तर पाच-सहा बादल्या, वाळूची पोती व अन्य आवश्यक साहित्य तयार असल्याने ते घेऊन लगेच तेथे मदतीला मंडळी पुढे येत. या सर्व उपक्रमांसाठी नाट्यप्रयोग करुन त्याचे उत्पन्न ठेवण्याची संस्थेची प्रथा होती.

आबाजींनीपहिल्यांदा नाटकात काम केले ती भूमिका मात्र मुलाचीहोती.त्याविषयीची आठवण ते सांगतात, "रेल्वे कर्मचाऱ्यांचा एक क्लब सीताबर्डीवरील तिसऱ्या मोदीत होता. त्या मंडळाने 'माईसाहेब' नाटक करावे असे निश्चित केले. क्लबमध्येच रात्री नाटकाच्या तालमी होणार होत्या. नऊ-दहाजणांत नाटकाच्या भूमिका निश्चित झाल्या. रोज रात्री तालमींला प्रारंभ झाला. त्या नाटकातील बारा-तेरा वर्षाच्या शामची भूमिका मी करावी, असा मंडळाने आग्रह केला. मी होकार दिला. रोज तालमीला जाऊलागलो. सर्व संच नाटकातल्या भूमिका चांगल्या करीत होते. माझे वय लहान होते. पण मी माझी भूमिका अभ्यासाने चांगली करीत असे. क्लबच्या सभासदांनाही माझी भूमिका करण्याची पद्धत आवडली. थिएटरमध्ये रंगीत तालीम घेण्याचा दिवस नक्की झाला. व्यंकटेश थिएटरात तारीख व वेळ निश्चित ठरली. मी आईला सांगितले की आम्ही 'माईसाहेब' हे नाटक थिएटरमध्ये करणार आहोत. तुला मी नाटक पाहण्यास नेईन. पण एक लक्षात ठेव. त्यात मी सावत्र मुलाची भूमिका करणार आहे. सावत्र आई माझा छळ करते तेव्हा मला आईची आठवण येते. मी त्या

अनुक्रमणिका

जाचाला कंटाळून “आई तू कुठे आहेस? म्हणून सर्वांकडे हाक मारीत पाहात असतो त्यावेळी तू ‘ओ’ देऊ नकोस, नाहीतर फजिती होईल असा खुलासा केला होता. (कारण माझ्या करुण भूमिकेने आईच्या डोळ्यातून खरच पाणी आले होते, हे मला नाटक संपल्यावर घरी जाताना आईने सांगितले).”आता मात्र यापैकी कोणतीही संस्था अस्तित्वात नाही.

आबाजींजवळअभिनय हा उत्तम गुण होता. त्यामुळे आबाजी विविध प्रकारच्या नकलाही सुंदर करीत. विविध उत्सव, बाहेरगावी वा खाजगीतही ते अनेक प्रकारच्या नकलांचा कार्यक्रम करीत. माकड चिडल्यावर कसा उड्या मारतो, दोन्ही हात तोंडावर धरुन ओरडतो, पिंजऱ्याच्या गजाला धरुन मागेपुढे होतो ही नक्कल सर्वांना फार आवडत असे. त्यांनी एकदा शिवराज लिथो प्रेसमधील सहकारी मित्रांची केलेली गंमत त्यांच्याच शब्दात ऐकण्यासारखी आहे.

“त्यावेळीनागपूरला महाल भागात व्यंकटेश थिएटर प्रसिद्ध होते. आता सन आठवत नाही. पण आमच्या लिथोप्रेसमधील सहा-सात कामगारांनी ठरविले की, आज रात्री व्यंकटेश थिएटरमध्ये आपण सर्वांनी नाटक पाहण्यास जावे. मीसुद्धा होकार दिला. रात्री थिएटरमध्ये गेलो. नाटकाची पहिली बेल वाजली. आमचे कामगार, श्री. गंगाधरराव चासकरयांना विचारत होते. “काय हो आबाजी आले नाहीत?”चासकर म्हणाले, “नाटकाला नक्की येतो असे आबाजींनी सांगितले तेव्हा ते नक्की येतील अजून थोडा वेळ लागेल.”मग कामगारांनी विचारले, ‘हे तुमच्याबरोबर पाहुणे कोण आहेत?’ चासकर म्हणाले, “हे गृहस्थ पंढरपूरला राहतात. परवाच माझ्याकडे आले व योग जमला म्हणून त्यांना नाटकाला घेऊन आलो.”त्यावेळचा त्या गृहस्थाचा पोशाख गबाळ्यासारखाच होता. धोतर, अंगरखा त्यावर एक साध्या कापडांचा लांब कोट, हातात वाकदार काठी, व डोळ्यावर चष्मा. एका कानावर चष्म्याची काडी तर दुसऱ्या बाजूला कानाला बांधलेला दोरा.

नाटकातरंग येऊ लागला. कामगार मधून मधून प्रश्न विचारत होते. चासकर उत्तर देत होते. त्यांचे उत्तर एकच – ‘आबाजी नक्की येतील’. नाटक संपले आणि कामगारांना चासकर म्हणाले, “आबाजी माझ्याजवळ प्रथमपासूनच  बसले आहेत. हो पाहुणा म्हणजेच आबाजी.”खूप हशा पिकला. सर्वच चक्रावले. कुणीही मला ओळखले नव्हते. अशीही और नक्कल!”

नागपूरलागणेशोत्सवात ‘वाघ’ नाचण्याचा मोठा कार्यक्रम चालू असतो. आबाजी नकला करताना उत्तम‘वाघ’ नाचत असत. साखळी घातलेला, मोठा झंड डोक्यावर दुसऱ्याने धरलेला असताना, गर्दीच्या ठिकाणी काठ्यांवर उभे राहून, ताशेवाजंत्री वाल्यांच्या अंगावर धावून जाणे आदी वाघांचे नाचणे प्रकार त्यात असत.

दिवाळीतनागपूर भागात गोंडगोवारी व बिलासपूर भागात राऊत जातीच्या पंधरा-वीस व्यक्तींचा नाच कवड्यांच्या माळा, मोरपिसाचे दंडे पायात घुंगरु बांधून जो गातो तो हातवारे करुन गात असतो. त्यावेळी सर्व गोवारी नुसते उभे असतात व त्यांचे गाणे झाले की मग सर्व ओरडत नाचतात एक व्यक्ती काठी उंच सांभाळते आणि सर्व गाणी म्हणतात. त्यातली दोन गाणी :-

अनुक्रमणिका

तिमिर तिमिर पानी रे बरसे नदी ले आला रे पूर ।
जलदी बना दे शेरी वो मैय्या । गयया निकल गई दूर ॥
काजल लेवली, कुंकू लेवली, पाहाते आपले रुप,
नवरा आला रे नेण्याकरिता, लपते कुपा कूप ॥
गडावरी गड, गडावरी गड ।
गडावरी खेळू, तेथूनी दिसे मले नर्मदेची वाळू ॥

आबाजी गाणी म्हणून हा नाच करायलाही शिकले.

पूर्वी लग्नकार्यात रुखवत मांडण्याची फार प्रथा होती. प्रपंचाला मदत व प्रचंड हौस. या दोन्हींचा संगम साधून सौ. आईच्या मदतीने आबाजी श्रीखंडाचे बोहले, गौरीहार, विविध फळे, दाण्याच्या कुटांची साडीची घडी व त्यावर खण. जेवणाचे पान, साखरेपासून भांडी वगैरे वस्तू तयार करुन देत. त्यांनी रंगविलेली फळे इतकी हुबेहूब असत की, दोन-चार वेळा लहान मुलांना ती खाण्याचा मोह आवरता आला नाही.

यासर्वांबरोबर संक्रांत येण्यापूर्वी दीड-दोन महिने हलव्याचे दागिने करण्याचा एक मोठा उद्योग आमच्या दोन खोल्यांच्या घरात चालत असे.

चाळीतल्यागोतावळ्यातील एक प्रमुख (कै.) श्रीमती माई विंझे यांच्या प्रोत्साहनाने आमच्या घरी नवरात्रातील अष्टमीचा खेळ खूप वर्षे मांडला जात असे. देवीच्या पूजेसाठी खूप विवाहित मुली येत. सर्वसाधारण लग्नानंतर पाच वर्षे ही अष्टमीची पूजा करण्याची कोकणस्थांची पद्धत. पण प्रत्येक घरी ही पूजा मांडणे शक्य नसल्याने आमच्या घरी हा सार्वजनिक पूजा समारंभ खूप वर्षे होत होता.

तांदूळाच्याउकडीचा देवीचा मुखवटा करण्यासाठी खास पिठी तयार होई. आबाजी मुखवटा करण्यात तरबेज होते. 'गोरक्षण सभा-धंतोली' या संस्थेच्या होणाऱ्या उत्सवात आबाजी पूर्वीपासून मुखवटा करायला जात. त्यामुळे घरचा मुखवटा श्री. भाऊ गोरे छान करीत. आमच्या दोन खोल्यांच्या पलीकडील दोन खोल्यांत, दादा जोशी कुटुंबीय रहात. असे काही प्रसंग आले की, बाहेरच्या खोलीतला मधला दरवाजा उघडून चार खोल्यांचे घर वावरायला तयार होई.

अर्थात् सौ. आई व आबाजींनी ठरविलेल्या अशा अनेक कार्यक्रमांसाठी चाळीतील अनेकांचे हात मदतीला तयार असत. नावे तरी किती सांगावीत ? पण विंझे, घुगरे, जोशी, गोरे, डेग्वेकर, लोंढे, लेले, गर्गे, देशपांडे, पात्रीकर, डांगे, कुंटे, अभ्यंकर, बापट, उन्हाळे, देसाई, जळगावकर, आदीच्या अनेक कुटुंबातील स्त्रिया-पुरुष आणि मुले यांचा यासाठी हातभार असे.

अनुक्रमणिका

वक्तृत्वव लेखन हे दोन गुण आबाजीं मध्ये सुप्त असावेत. कारण पदयात्रा सुरु केल्यावर त्या वर्णनांचे त्यांचे अनेक कार्यक्रम होऊ लागले. त्यामुळे वक्तृत्व ही कला त्यांना साध्य झाली. यात्रेत नियमित दैनंदिनी लिहिणे, प्रसंगानुरुप काव्ये करणे यामुळे लेखन कला त्यांना थोडीफार अवगत झाली.

त्यांच्यालेखनाचा एक आविष्कार म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची आरती. नागपूर येथील आबाजी नोकरी करीत असलेले शिवराज फाईन आर्ट लिथो ऑफसेट वर्कस् येथे शिवजयंती उत्सव साजरा केला जाई. (कै.) श्री. दादासाहेब धनवटे यांनी त्याप्रसंगी म्हणण्यासाठी शिवरायांची आरती कुठे मिळेल? असे विचारले. आबाजींनी मग स्वतःच आरती रचली व ती म्हणण्याचा प्रघात शिवराज फाईन आर्ट मध्ये सुरु झाला. त्यातील 'भारतीयांनी केली मात, शिवप्रभू अग्रगण्य त्यात' या ओळी अद्यापही माझ्या स्मरणात आहेत.

* * *

अनुक्रमणिका

## सहा
# कलंदर रसिक

आमची शिक्षणे, लग्ने वगैरेंसाठी करावा लागणारा खर्च याचा विचार आबाजी आणि ताईउभयतांच्या मनात सतत घोळत असे. त्यामुळे आबाजी कित्येक वेळा कामावरुन 'ओव्हर टाईम' करुन रात्री उशीरा घरी येत. त्यांच्या आधी सौ. आई जेवत नसे. कित्येकदा आम्ही झोपल्यावर आबाजी कामावरुन परतत असत व आमची सकाळ होण्यापूर्वी डबा घेऊन सातच्या आधीच घर सोडीत. मात्र ज्या दिवशी ओव्हर टाईम नसेल किंवा सुट्टी असेल त्या दिवशी आम्हा सर्व मुलांमुलींना जमवून ते एखादी विलक्षण दीर्घकथा सांगायला सुरुवात करीत. मग त्या कथेत भुते, अनेक चमत्कार, निसर्ग, प्राणी वर्णने असल्याने आम्ही त्यात अगदी गुंग होत होतो. अर्थात एका सुट्टीच्या दिवशी सुरु झालेली ही गोष्ट बऱ्याच सुट्ट्या झाल्या तरी, पूर्ण व्यायची नाही.

आम्हामुलांना लहान-लहान गोष्टींतून आनंद शोधण्याची त्यांनी लावलेली संवय हा आमच्या आयुष्यातील अमोल ठेवा आहे. त्यासाठी गणेशोत्सवात ते नागपूरातील अनेक प्रख्यात गणपती बघण्यासाठी दोन-चार दिवस रात्रीचे पायी घेऊन जात. बस, रिक्षांची सुविधा तर नव्हतीच, पण आमच्या पायात चपलाही नसत!मला आठवतंय, नागपूरचे प्रख्यात मेडिकल कॉलेज बांधून झाल्यावर उद्घाटनापूर्वीच त्यांनी आम्हांला ते दाखवायला नेले होते. कारण तेव्हा भव्य अनेकमजली बांधकामे क्वचितच असत. कुस्त्यांचे फड, बैलांचे पट, कोंबड्यांच्या झुंजी वगैरे अनेक प्रकार त्यांच्यामुळे आम्हांला बघायला मिळाले. त्यांनी दिलेल्या या शिक्षणातून नकळत झालेला परिणाम आम्हाला आयुष्यभर पुरुन उरला आहे. त्यामुळे आजही लहान-लहान गोष्टीतला आनंद शोधून मन प्रसन्न ठेवण्याचे कसब आम्हाला सहज जमते. 'आपल्याजवळ काय नाही हे आठवण्यापेक्षा, काय आहे ते बघावे' ही त्यांची शिकवण अंगी बाणली तर कितीजणांचे संसार आनंदाने बहरलेले राहतील. धुसपूस किंवा असमाधान यांना थारा मिळणे कठीण होईल.

या आनंद शोधण्याच्या प्रकारावरुन आबाजी व मित्रमंडळींची एक सांगण्यासारखी गंमत. कित्येकवेळा ही मित्रमंडळी-ज्याचे कुटुंब घरी नाही अशा मित्राच्या घरी जमत. खूप उदबत्त्या लावून घराचा दरवाजा बंद करुन घेत आणि मग जेवणाची पंगतच बसली आहे असे बाहेरच्यांना वाटावे, अशा जोरजोराने गप्पा मारत. 'अरे, पुरे पुरे! जिलबी आता वाढू नकोस, 'अरे, खुप पोट भरलय, ठीकाय, आग्रहच करायचा असेल तर भजी किंवा श्रीखंडाचा कर" वगैरे वगैरे. अधून मधून भांड्यांचेही आवाज बाहेर येत असत. त्यामुळे शेजारी किंवा येणाऱ्या जाणाऱ्यांना खरोखरच पंगत चालली आहे असे वाटे. नित्यनवीन ठिकाणी ते महिन्यातून एक-दोनदा जमत. त्यामुळे ही त्यांची गंमत कळायला बरेच दिवस लागले. अर्थात् असा कार्यक्रम बंद झाला की, या मित्रांच्या डोक्यातून दुसरी कल्पना निघे. बिन खर्चात आनंदाचा ठेवा निर्माण करण्याचे या मंडळींचे काम चालूच असे.

सन१९३८ मध्ये या मित्रमंडळींनी आबाजींचा सत्कार त्यांचेच एक समवयस्क स्नेही (कै.) श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण तथा भिकुदादा नानिवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला.

अनुक्रमणिका

त्यावेळीया मित्रमंडळींनी आबाजींना एक मानपत्र दिले. हे मानपत्र आगळ्या, वेगळ्या पद्धतीचे होते. मानपत्र तयार करणारे आबाजींचे सर्व मित्रच!तेव्हा त्यात खोडसाळपणा असला तरी आबाजींच्या गुण-दोषांचे छान वर्णनही आहे. गोड पदार्थाची गोडी तिखट किंवा आंबट पदार्थांच्या आस्वादाने अधिकच वाढते. मानपत्र म्हणजे 'आबाष्टक' काव्य असेच आंबटगोड आहे :

**आबाष्टक**

**आबाजी असे मस्त, रंगेल प्राणी ।**
**मिळेना जया जोड पोथ्या-पुराणी ।**
**कधी मोरयाच्या पुढे वाघ नाचे ।**
**जमे देखण्या घोळके बायकांचे ॥१॥**

**हल्या-टक्करी, टक्करी एडक्यांच्या।**
**जिथे होती झुंजी नर-कुक्कुटांच्या ।**
**आबांचे तिथे अवश्य होणार जाणे ।**
**मिळो सुट्टी वा बुट्टी कामास देणे ॥२॥**

**कधी सोंग घेई आजोबा बुढ्ढ्याचे ।**
**कधी होऊनीदंग दंढार नाचे ।**

**कधी नाटकी पार्ट घेई स्त्रियेचा ।**
**'गडे, इश्य, मेलं' मुखी रम्य वाचा ॥३॥**

**मनी आग मोठी ट्रिपा काढण्याची ।**
**तशी भक्तिने भजने नाचण्याची ।**
**धरी फेर, मारी उड्याही मजेने ।**
**जमा लोक होती बघाया त्वरेने ॥४॥**

**बहु छंद त्या लागला पोहण्याचा ।**
**स्मशानी तसे मुडदे वाहण्याचा ।**
**जरी बोलती लोक 'मुडदेफरास' ।**
**नसे खंत त्याची, चढे मांस त्यास ॥५॥**

**धरोनी करिं चिमटी तपकिरीची ।**
**अकस्मात् नाकी भरी धन्य त्याची ।**
**तमाखू तशा सिगारेटी कितीक ।**
**चहा सरबते फस्त होती अनेक ॥६॥**

अनुक्रमणिका

**आबांच्या घरी एक बोका नि भाटी ।**
**अति भांडती रात्र होताच मोठी ।**
**तया हाकिता काळ जाई मजेत ।**
**कुठे? अन् कसा काय? अंदर की बात ॥७॥**

**घरी पाहुण्यांचे अगत्य ही गोड ।**
**मनोरमा वहिनी तोडीस तोड ।**
**गृहस्थाश्रम तुमचा आदर्श व्हावा ।**
**मित्रांच्या शुभेच्छांची जाणीव ठेवा ॥८॥**

१९३१ साली शिवराज प्रेस मधील नोकरी सुटल्याने आबाजी कल्याणला आमच्या तंगूआत्याकडे (तुंगभद्राचे तंगू हे टोपण नांव झालं) नोकरी निमित्ताने गेले. त्यानंतर त्यांना ज्ञानसागर लिथो प्रेसमध्ये मुंबईला लगेच नोकरीही मिळाली. त्यावेळी आबाजींचे वय २७ वर्षाचे होते. ते चपळ, हिंमतवान व कसलेल्या शरीराचे होते. पण दुर्दैवाने त्यांना दृष्ट लागली. महिनाभरातच डॉक्टरी तपासणीत टी. बी. ची लक्षणे दिसल्याने आबाजींना मुंबई सोडून नागपूरला जावे लागले. पुढे नोकऱ्या बदलत १ मार्च १९४४ पासून परत ते 'शिवराज फाईन आर्ट लिथो' मध्ये नोकरीला लागले. वयाच्या ७५ व्या वर्षापर्यंत ती नोकरी त्यांनी केली.

१९३१ साली आबाजी कल्याणला असताना त्यांच्या पहिल्या अपत्याचा, विष्णूचा जन्म झाला.

पण सौ. आई व आबाजींच्या या पहिल्या मुलाचे विष्णूचे (आम्ही त्याला दादा म्हणत असू) १४ व्या वर्षीच विषमज्वराने निधन झाले! रुपगुणात आबाजींची प्रतिमा असलेल्या या पहिल्या मुलाच्या निधनाने दोघांचीही उमेद खचली. पण आम्हा मुलाकडे बघून त्यांनी ते दुःख मूकपणाने गिळले.

* * *

अनुक्रमणिका

## सात
# निर्भर प्रतिकार

दि. ३० जानेवारी १९४८ या दिवशी गांधीजींची हत्या झाली. तो दिवस तसाच गेला. त्यानंतर दोन दिवस ब्राह्मणांना कसे शासन द्यावे याचा विचार व योजना आखण्यात गेले. सातारा, सांगली, कोल्हापूर, कराड इत्यादी भागातील ब्राह्मणांना अक्षरशः तुडवून काढले. मारामारीत त्यांना जखमी केले. घरांना रॉकेल ओतून आगी लावल्या. कित्येकांच्या अंगावर रॉकेल ओतून काडी लावली. वळकटीतून गुंडाळून तऱ्हेतऱ्हेचे हाल केले. मग ते लोण नागपूरसारख्या मोठ्या शहरातही पसरले.

आमच्यामहाजन चाळीतील सर्व घरे प्रामुख्याने ब्राह्मणांचीच होती. चाळीचे मालक महाजन यांचा बगीचा व त्यापाठी त्यांचा मोठा वाडा होता. व त्या सभोवार चाळीतील चाळीस-पन्नास घरे गोलाकार वर्तुळात होती. चाळीत शिरण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रवेशद्वारे होती.

ब्राह्मणांच्यावस्तीवर जाऊन जाळपोळ व दगडफेक करायची या हेतूने गुंड पुढारी मोटारीत बसून इतरांना चिथावणी देत. त्यांच्या चिथावणीचा गुंडांनी फायदा घेऊन एक दिवशी दुपारी दगड, काठ्या व रॉकेलचे बोळे घेऊन महाजन चाळीवर हल्ला केला.

हल्ला झाल्याचे कळताच आबाजी घराबाहेर पडले. काहींनी आबाजींना थांबविण्याचा प्रयत्न केला. पण आबाजी थांबले नाहीत. आबाजींच्या पाठोपाठ इतरही अनेक लोक, शेजारचे दादा डांगे, दादा जोशी, डेग्वेकर, गर्गे, विंझे आणि घरातील अन्य तरुण मंडळीही काठ्या घेऊन बाहेर आली. त्यांनी हल्लेखोरांचा प्रतिकार केला. या जोरदार प्रतिकारामुळे गुंड मागे सरकू लागले. त्यांच्यापैकी अनेकांना दगडाचा मार खावा लागला. त्यामुळे ते अधिक जोरजोरात अर्वाच्य शिवीगाळ करु लागले. चाळीतील एकाने गुंड चाळीवर चालून आल्याचे बघताच, जवळच असलेल्या सीताबर्डी पोलीस चौकीवर लगेच वार्ता दिली. आठ-दहा मिनिटातच पोलीस चाळीत पोहोचले – पण पोलीसांना फारसे काम करावे लागले नाही. कारण महाजन चाळीतील तरुणांच्या प्रभावी प्रतिकारापुढे गुंडांनी माघार घेतली होती.

यादगडफेकीत चाळीतील तीन-चार मंडळींना मार लागला. आणि आबाजींच्या डोक्याला दगड लागून मोठी जखम झाली. पण प्रतिकार करुन आग व मारपिटीपासून चाळीला वाचविण्याचे फार मोठे काम आबाजींच्या नेतृत्वाखाली चाळीतील तरुणांनी केले. पुढे कित्येक दिवस ही मंडळी आळीपाळीने रात्री जागता पहारा ठेवत होती. कोणत्याही प्रसंगी न डगमगता हाती घेतलेले काम कितीही लहान वा मोठे असो, यशस्वी करायचेच असा आबाजींचा निर्धार असे व तसे ते इतरांसह स्वतः वागत.

माझे वय त्यावेळी नऊ वर्षांचे होते. पण यातील बऱ्याचशा घटना मला स्पष्टपणे आठवतात. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्यात आली. त्यावेळी झालेल्या सत्याग्रहात माझा भाऊ केशव व शेजारचा राजा

अनुक्रमणिका

विंझे या दोघांनी भाग घेतला. त्या दोघांना दोन महिने कारावासाची शिक्षा झाली. पंधरा-सोळा वर्षाची त्यांची वये होती.

कारावासभोगून ते परत आले. त्यावेळी चाळकऱ्यांनी त्यांचे कौतुकाने शानदार स्वागत केले.

* * *

अनुक्रमणिका

## आठ
# कौटुंबिक सफलता

वाहील्याउद्वेग दुःखच केवळ । चित्ती असो द्यावे समाधान ॥ या वाक्याचा अर्थ आपल्या आचरणाने आमच्या मनावर बिंबवण्याचा फार मोठा संस्कार आई-वडिलांनी आमच्यावर केला. घरात कितीही पाहुणे आले तरी वातावरण प्रसन्न असे. आजच्यासारखे घरात नित्यनवीन पदार्थ करण्याची तेव्हा प्रथा नव्हती. कोणी आले तरच खायला पोहे-थालिपीठ वगैरे होत असे. एरवी वरण-भात-पोळी-लोणचे हे जेवण असे. भाजी जमेल तेव्हाच आणली जायची. पण या सर्व वातावरणातही आम्हाला कधी असंतुष्टता वाटली नाही.

आबाजींचापगार महिन्याच्या सात तारखेला होत असे. आम्ही तिघी बहिणी व मोठा भाऊ या दिवसाची आतुरतेने वाट बघायचो. कारण त्या दिवशी कामावरुन येताना आबाजी हलवायाकडून इमरती जिलबी व डाळमूठ किंवा शेव यापैकी एखादा खारा पदार्थ आमच्यासाठी आणत. महिन्यातून एकदा का होईना पण नियमित मिळणाऱ्या या जिलब्यांची अपूर्वाई वाटून आम्ही त्यात समाधानी होतो.

उधारीठेवून वस्तू आणण्याचा पायंडाही नसल्याने, आहे त्यात भागवायची सवय लागली. तशाही परिस्थितीत घरी दर गुरुपुष्याला चाळीच्या टोकावरील लेल्यांच्या सराफी दुकानातून तीन-चार रुपयाची सोन्याची पुडी घरी येत असे. आमच्या घरी स्वयंपाक घरात एक मोठे लाकडी कपाट होते. त्यातल्या ओढ खणात ही पुडी टाकली जाई. जेव्हा मोठा भाऊ अण्णा व धाकटी बहीण कुंदाचे लग्न ठरले त्यावेळी या सर्व पुड्या आईने बाहेर काढल्या. तेव्हा सून व लेकीला दागिने करता येतील एवढे सोने जमा झालेले होते.

आम्हासर्व भावंडांचे विवाह सुस्थळी होऊन सर्वांचे संसार समाधानात चालले आहेत.

सौ. जीजीचे (दुर्गा) लग्न म्हणजे आमच्या घरचा पहिला आनंदाचा मोठा प्रसंग होता. अण्णाचा इंजिनिअरींगचाडिप्लोमा होऊन तो १९ व्या वर्षीच नोकरीला लागल्याने त्यानेही बराच आर्थिक भार उचलला. सौ. जीजीचे लग्न नागपूरच्याच श्री कमलाकर नारायण रानडे यांच्याशी दि. १५ फेब्रुवारी १९५७ मध्ये झाले.

माझाम्हणजे मंदाचा विवाह दि. ११ मे १९५८ ला नागपूरला श्री. विक्रम नारायण सावरकर यांच्याशी झाला.

ती.अण्णाचे (केशवचे) लग्न संगमेश्वरचे (कै.) दत्तोपंत भिडे यांची कन्या प्रमिला हिच्याशी दि. २० मार्च १९६० ला कल्याणला झाले. त्यावेळी ती. अण्णा टाटा कंपनीत इंजिनियर म्हणून नोकरीत होता.

कुंदाचाविवाह दि. ७ फेब्रुवारी १९६० मधे कान्होलीबारा येथील डॉ. अरविंद भास्कर घारपुरे यांचे सोबत होऊन ती सौ. अरुन्धती अरविंद घारपुरे झाली.

अनुक्रमणिका

ती.आबाजी व सौ. आईने सामाजिक कामें व छंद जोपासून अतिशय नेटका प्रपंच केला व आपल्या दायित्वात थोडीही कमतरता पडू दिली नाही.

## भारताच्या विजयासाठी अथर्वशीर्ष पाठ

कुटुंबात व सामाजिक कामात रममाण झालेल्या आबाजींच्या साऱ्या कामात एक सुसूत्रता होती. कोणतेही काम करताना त्यात आपपर भाव नसल्याने ते निश्चितपणे होणारच याची सर्वांना खात्री असे.

कुटुंबप्रेम,समाजप्रेम, देशप्रेम या भावनांचे बीज त्यांच्यामध्ये घट्ट रुजलेले. त्यांची परमेश्वरावरील निष्ठाही ठाम. १९६२ च्या भारत-चीन युद्धाच्या वेळी, संकटमुक्तीसाठी आबाजींनी सीताबर्डी टेकडीवरील श्री गणपतीसमोर अनेक दिवस अथर्वशीर्षाची पारायणे करण्याचा संकल्प सामुदायिकपणे पार पाडला. त्यांचे एक अथर्वशीर्ष मंडळ होते. दर संकष्टी चतुर्थीला ती मंडळी आमंत्रण असेल त्यांचे घरी जमून २१ वेळा अथर्वशीर्षाचे पठण करीत. परमेश्वरावरील श्रद्धा हा त्यांच्या जीवनाचा आधार होता. देशावर वा व्यक्तिवर ज्यावेळी विविध आपत्ती येत, त्यावेळी नुसते हळहळत बसणे त्यांना मान्य नव्हते. आपण त्यासाठी काय करू शकतो यांचा विचार करून ते परमेश्वर आळवणीसाठी विविध अनुष्ठाने, जप यांचा संकल्प सोडत व देह कष्टवून तो पूर्णत्वास नेत.


गोवावीरश्री. मोहन रानडे हे पोर्तुगाल तुरुंगात होते. त्यावेळी आबाजींच्या मनात आले की, आपण सुटकेसाठी समुद्रापार सत्ता गाजविणाऱ्याश्री हनुमंनांची उपासना करावी. लगेच आंबाजींनी श्री विद्वंस गुरुजीचा सल्ला घेतला व एकलथी चाळीस हजार मारोती जपाचा सामुद्रायिक संकल्प सोडला. दि. २३ मार्च १९६८ ला जप सुरु झाला. त्यानिमित्ताने चाळीतील बाळगोपाळांना त्यांनी मारोतीस्त्रोसही शिकविले दि. ४ मे १९६८ ला अध्यक्ष अठ्ठावीस हजांची जपसंख्या पूर्ण झाली आणि श्री. मोहन रानडेंच्या सुटकेची वार्ता कळली. आबाजींनी संकल्प पूर्ण केली व उत्साहत जपाची सांगता केली.

साठीनंतरते रुद्रपठण शिकले, सौ. आईही त्यांच्याबरोबर पाठ म्हणत असे. त्या दोघांनी मिळून अतीमहारुद्र केला. त्यांना परिचित किंवा नातेवाईक सन्मानाने घरी लघुरुद्रासाठी आमंत्रण देत असत. दोघेही आमंत्रण स्वीकारुन जात. व त्या घरात मंत्रघोषाने पवित्र वातावरण निर्माण करीत. पुढे ठाण्याजवळील येऊर येथील टेकडीवरील एका आश्रमात उभयता दोन महिने जाऊन राहिले. रुद्रपठणाचा संकल्प त्यांनी तेथे पूर्ण केला.

गायत्रीपुरश्चरण करुन त्याचेही उद्यापन त्यांनी केले. आबाजींच्या जपाची संख्या तर कोटीच्या वर झाली असेल. नित्यनेमाने यात्रेत दैनंदिनी लिहीण्याचा त्यांनी सराव ठेवल्याने या सर्व गोष्टींची त्यांच्याकडे सविस्तर नोंद आहे.

अनुक्रमणिका

* * *



सहधर्मचारिणी सौ. मनोरमा पांडुरंग गोखले

## अनुक्रमणिका

## नऊ
# सहधर्मचारिणी

स्वच्छ, सुंदर चंद्रप्रकाशात मंद सुगंधी वाऱ्याची झुळुक केव्हा, कशी आणि कुठे मिसळते हे जसे कळत नाही तसेच आबाजींच्या आठवणीत ती. सौ. ताईची आठवण कशी येते हेही कळत नाही.

ती.आबाजींचे जीवनचित्र रेखाटताना त्यांच्या प्रत्येक कामात त्यांना संपूर्णतः सहकार्य देणाऱ्या आमच्या आईचा (कै.) सौ. ताईचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. तिचे माहेरचे नांव कु. अनसुया रामचंद्र अभ्यंकर!वयाच्या १४ व्या वर्षी लग्न होऊन ती गोखल्यांच्या घरात सौ. मनोरमा होऊन आली. सदुसष्ट वर्षे झालेला तिचा संसार तिने सार्थकतेने केला. तिथे शिक्षण फारसे झालेले नव्हते. तिच्या वयाच्या पाचव्या वर्षी वडील व १० व्या वर्षी आई गेल्याने ती, धाकटी बहीण कुसुमसह काका-काकूंकडेच राहात.

आईचे काका श्री. (कै.) लक्ष्मणराव व काकू सौ. सावित्रीबाई अभ्यंकर यांनी व पुढे त्यांच्या मुलांनीही आईला माहेरची कधी उणीव भासू दिली नाही. बदलीमुळे काका परगावी गेल्यानंतरही सौ. ताई व आबाजींना त्यांचे बोलावणे येत असे. ते दोघेही शक्य असेल तेव्हा त्यांचेकडे जाऊन येत असत. सौ. ताईच्या चुलतभावंडांनीही तिला मोठ्या बहिणीच्या मानानेच वागविले.

सौ.ताई मुळातच शांत, सोशिक व मितभाषी होती. तरीही आम्हा मुलांना तिचाच धाक जास्त होता. आबाजी आमच्यावर हात उगारणे तर सोडाच पण कधी रागावले देखील नाहीत. त्यामुळे आमच्या दृष्टीने ते फार शांत होते. पण अंदरकी बात निराळीच होती. आम्हा सर्वांना शांत वाटणारे आबाजी. आवाज न चढविताही रागाने बोलत आहेत हे फक्त सौ. ताईच्या लक्षात येई. त्यामुळे त्यांना रागावण्याची फारशी संधी न देता ती त्यांच्या बारीक सारीक लहरी व कामे न बोलताच सांभाळीत असे. ती. आबाजींचा स्वभाव फार तापट आहे, हे मोठेपणी आमच्या लक्षात आले.

आम्हीमुलींनी मात्र सौ. ताईच्या रागवण्याबरोबर तिच्या हातचामारही खाल्ला. विशेषतः कुंदाला व मला जास्त मार खावा लागला. ती. अण्णा व सौ. जीजी पाठोपाठचे, आम्हा दोघींपेक्षा थोडे मोठेच होते. त्यामुळे ताईचा राग आमच्या वाट्याला जास्त येई. अर्थात हा सर्व राग आमच्यावर चांगले संस्कार व्हावेत यासाठीच असे.

शाळेतूनआल्यावर आम्ही मुले व मुली चाळभर खेळण्यासाठी घरातून नाहीसे होत असू. शेवटी अंधार झाल्यावर ताई रागावेल या धास्तीने घरी यावे लागे. त्यातून रोज सायंकाळी खूप श्लोक, स्तोत्रे वगैरे देवापुढे बसून म्हणावे लागे. खरं म्हणजे दमल्यामुळे खूप भूक लागलेली असे व डोळेही पेंगुळलेले असत. पण ठराविक परवाचा झाल्याशिवाय ताई जेवायला वाढत नसल्याने आम्ही कसाबसा परवचा म्हणत असू. सर्वांत जास्त बोलणी व मार या गोष्टींसाठीच आम्ही खाल्ला. तिचे शिस्तीचे नियम कडक होते.

अनुक्रमणिका

संस्कृतव मराठी श्लोक, आरत्या, विविध स्तोत्रे, कविता, गीता, मनाचे श्लोक, वगैरे खूप पाठांतर तिने करुन घेतले. ती रोज मधल्या दारावर एक श्लोक खडूने लिहून ठेवीत असे. येता-जाता दिवस भरात तो पाठ करण्याची संवय तिच्यामुळे लागली. हे पाठांतराचे वळण व त्याच्या अर्थातून मिळणारे जीवनज्ञान याचे महत्व त्यावेळी कळले नाही. पण विवाह झाल्यावर लक्षात आले की, आपल्या आई-वडिलांनी केलेले सुसंस्कार ही आयुष्यभर पुरणारी शिदोरी आहे. कधी मनावर कुविचारांचे प्राबल्य होऊ लागले तर मदतीला धावून येते, ते बालपणी रुजलेले संस्काराचे हे बळ!

आताच्यानवीन पिढीला या संस्कारांची खूप आवश्यकता आहे. सुसंस्कारित पिढी निर्माण झाली तरच चांगला समाज निर्माण होतो. त्या दृष्टीने आम्ही खरच भाग्यवान ठरलो.

## स्वतंत्र व्यक्तिमत्व

सौ. ताई राष्ट्र सेविका समितीची सक्रीय कार्यकर्ती होती. प्रारंभी काही वर्षे आम्ही लहान असताना ती सर्वांचे, विशेषतः ती. आबाजींचे खाणे तयार ठेवून शाखेच्या बैठकींना वा अन्य कामाला जात असे. तशी पूर्वसूचना ती देऊन ठेवी. पुढे आम्ही जाणत्या झाल्यावर समितीच्या संस्थापिका व चालिका वं. मावशी केळकर यांच्याबरोबर बाहेरगावी दौऱ्यावर जाऊ लागली. प्रारंभी ती तयार नसे, पण मावशींचा फारआग्रह असे. आबाजीही तिला जाण्यास होकार देत. वं. मावशी फक्त संस्था कामासाठीच बाहेरगावी जात नसत तर श्री रामायणावरील प्रवचनाचे त्यांचे अनेक कार्यक्रमही ठरलेले असत. काही वर्षे सौ. ताईने शाखेचे कोषाध्यक्षापदही सांभाळले, वं. मावशींच्या सहवासात राहून व त्यांची प्रवचने ऐकून सौ. ताईनेही रामायणाचा अभ्यास केला. हस्तकामाच्या वस्तू तयार करायला शिकली. पुण्याच्या कै. श्री. सबनीस मास्तरांचा दरवर्षी, नागपूरात एक महिना भजन शिकविण्याचा वर्ग चाले. त्यात ती सहभागी होऊन तिने तीही कला आत्मसात केली. पेटी वाजविण्यातही ती प्रवीण झाली.

पुढे रामायणावर प्रवचने देणे आणि भजनाचा वर्ग घेण्यासाठी तिला गावोगावी निमंत्रणे येऊ लागली. त्यावेळी ती त्या कार्यक्रमाच्या दिवसात हस्तकलेचे वर्गही आयोजित करीत असे. त्यातून येणारे उत्पन्न ती राष्ट्र सेविका समितीच्या विविध प्रकल्पांना देत असे. अनेकवर्षे तिचे हे तिन्ही कार्यक्रम विविध गावी चालू होते.

नागपुरात सीताबर्डीवर ‘मातृसेवा संघ’ हे प्रख्यात सुतिकागृह आहे. तिथे लहान गावामधून अनेक मुली परिचारिका शिक्षणासाठी येत. त्यांना काही वर्षे तिथे रहावे लागे. सौ. ताई रोज पहाटेच पोळ्या करुन, आबाजी सकाळी सातला कामावर गेले की, पाठोपाठ मातृसेवा संघात जात असे. त्या परिचारिकांना ती रोज प्रार्थना, श्लोक वगैरे शिकवत असे. विविध सणांची माहिती, चांगल्या गोष्टी सांगून तासाभराने परत घरी येई. त्यानंतर चाळीतील मुलांमुलींना संस्कार शिक्षणाचे पाठ देण्याचे तिचे काम चाले. सौ. ताईला काही कारणाने चार-पाच दिवस मातृसेवा संघात जाणे जमले नाही तर तेथील परिचारिक चौकशीसाठी घरी येत असत.

अनुक्रमणिका

मातृसेवासंघाच्या परिचारिकांनी एक-दोन बाळंतपणे केल्यानंतर त्यांचे शिक्षण पूर्ण होत असे. सर्वसाधारणपणे शहरात घरी बाळंतपण करण्याची प्रथा बंद झाली होती. त्यामुळे या परिचारिकांना लहान खेड्यांमधून जाऊन ही बाळंतपणे करण्यासाठी फार वेळ व त्रास करावा लागे ताई शक्यतो यांना साह्य करे.

माझीधाकटी बहीण सौ. कुंदा हिची सर्व बाळंतपणे चार-पाच परिचारिकांच्या हुशारीवर विश्वासून सौ. ताईनी घरीच केली. त्यापरिचारिकांनीही या गोष्टीचे अप्रूप वाटले. सौ. वहिनींच्या ऋणात राहण्यात आनंद वाटतो, असे सर्वांना त्या सांगत.

पेटीवाजविणे, भजनाचे वर्ग चालविणे, रामायणावर प्रवचने देणे, समितीचे खजिनदार पद सांभाळणे, अनेकांचे पालकत्व स्वीकारणे वगैरे अनेक कामें तिने केली पण त्याचा उल्लेख फारसा कधी केला नाही.

वयाच्या७० व्या वर्षापर्यन्त सौ. ताईने स्वतःचे हिंमतीवर घर चालविले. आपल्यापासून कोणाला त्रास होऊ नये म्हणून स्वतःला जपले. परंतु शरीराने काम करणे अशक्य झाल्यावर आवडी निवडी, स्वतःच्या सवयी, छंद यांना फाटा देऊन मुलींच्या व सुनेच्या घराला मानवेल असे बदल स्वतःत केले. सतत कार्यरत राहून नंतर संन्यस्थ, तटस्थ जीवन जगणे हे खरोखरच विलक्षण होते. ते तिने सहजतेने पार पाडले.

फारथोडी माणसे व थोडी घरे आहेत की जेथे आपापसात कधी भांडणे, वाद कटुता अनुभवावे लागले नाहीत. अशा घरात आमच्या घराचा क्रमांक फारच वरचा लागतो. त्याचे सर्व श्रेय सौ. ताईलाच द्यायला पाहिजे.

ती.आबाजींच्या तैनातीत सौ. ताईनी कणभरही कमतरता ठेवली नाही, हे जेवढे खरे तेवढेच आबाजींचा सौ. ताईवर पूर्ण विश्वास होता, हेही खरे! पगार झाला की, आबाजी तो जसाच्या तसा सौ. ताईजवळ देत. रोजच्या बारीक सारीक खर्चासाठी आपल्या खिशात आवश्यक ते पैसे असतील याची आबाजींना पूर्ण खात्री असे. त्यांना काहीही मागावे लागत नसे.

आमच्या सर्वांचे विवाह होऊन आम्ही सुस्थळी पडलो. जावई, सून, नातवंडे यांनी गजबजलेले अनेक कार्यप्रसंग याउभयतांनी पाहिले. सर्व म्हणजे नऊ नातवंडांची लग्ने आबाजी व सौ. ताईंनी पाहिली. अकरा पतवंडांचे कौतुक केले. सौ. ताई शेवटी विलेपार्ले येथे ती. अण्णाकडे पाच-सात महिने वार्धक्याने आजारी होती. दि. ५ ऑक्टोबर १९९५ ला रात्री झोपेतच शांतपणे तिचे निधन झाले. या काळात आबाजी, अण्णा व सौ. वहिनींनी तिची पूर्णतः सेवा केली. तसा विचार केला तर सौ. ताई व श्री. आबाजी भाग्यवानच ठरले. नातवंडे व नातसुनांनी ही या दोघांची सेवा केली.

माझ्याआईच्या मृत्युनंतर माझ्या भावाने ती. अण्णाने तिच्याविषयीएक कवितात लिहिली त्या कवितेतील काही ओळी अशा :-

अनुक्रमणिका

**घरात होती एक पणती, तेवत होती तिथे ज्योति ।**
**रात्रंदिन प्रकाशत होती, आम्हा सर्वा सुखवाया ॥**

**घरात होता एक झरा, खंड न पडला तया जरा ।**
**उधळण केली जलधारा, प्राशन केले आम्ही ॥**

**घरात आली एक कळी, फुलत राहिली वेळी अवेळी**
**वेळहीयेता लुप्तही झाली, परिमळ मागे ठेवूनी ॥**

नागपूर येथील प्रख्यात लेखिका व वक्ता असलेली डॉ. सौ. आशा सावदेकर (पूर्वीची चाळीतील आशा भवाळकर) हिने सौ. ताईच्या निधनानंतर 'व्रतवेड्या गोखले वहिनी – सात्विकतेची कोजागिरी' या शीर्षकाखाली एक श्रद्धांजली तिला वाहिली. त्यात तिने शेवटी लिहिले की, "दोन वर्षांपूर्वी आबाजींचा सहस्त्रचंद्र दर्शन सोहोळा आणि सौ. वहिनींचा ऐंशिवा वाढदिवस त्यांच्या सर्व नातवंडांनी मिळून मोठ्या थाटामाटात साजरा केला. मी ही आवर्जून उपस्थित होते. शरीराने कृश तरी हसू खेळविणारा सौ. वहिनींचा उतारवयातील तो सात्विक चेहरा अजूनही आठवत आहे. नुकतीच बातमी आली. वहिनी गेल्या. डोळ्यात पाणी आलं नाही. पण मन सुन्न झालं! वहिनी आपला वसा कोणला देऊन गेल्या? एका पणतीने पूर्ण दीपमाळा उजळून ठेवून ती विझली. शांतपणे जळून अंधार दूर सारीत राहिली. प्रकाशाचे दान नव्या ओंजळीत नकळत टाकीत. तेल संपले म्हणून पणती शांत झाली. अंधार सरला नाही. नसो! तो सरणार नाहीच!पण त्याला चिरत जाण्याचे बळ देणारी पणती आमच्याही मनात वहिनींनी लावली. तिने निश्चितच आणखी काही वाती चेतविल्या!

* * *

अनुक्रमणिका

## दहा
# पदयात्रेचे बीज


**नाना तीर्था क्षेत्रासी जावे । तेथे त्या देवाचे पूजन करावे ।**
**नाना उपचारी अर्चावे । परमेश्वरासी ॥**

असे सर्वांना वाटते. त्यामुळे प्रपंचातील मुख्य जबाबदारी म्हणजे मुलींची लग्ने. ती झाल्यावर आबाजींच्या आईला साहजिकच एखादी तरी तीर्थयात्रा घडावी से वाटत होते. आबालाआपली इच्छा तिने बोलून दाखविताच आबाजींनी मध्यप्रदेशातील अमरकंटक या श्री नर्मदा नदीच्या पवित्र उगमस्थानाची यात्रा तिला घडवून आणण्याचे ठरविले. अर्थात आजी सोबत तिच्या वयाच्या चार-पाच जणींना आणि दोन-तीन मुलांना नेण्याचेही आबाजींनी मान्य केले. कारण चाळीतील संस्कृतीचा हा एक विशेष होता. एकमेकांना अधिकाराने एखादी गोष्ट सांगणे ही नैसर्गिक गोष्ट होती.

हीयात्रा १९२१ साली यांनी केली. नागपूर ते बिलासपूर पर्यन्त रेल्वेने प्रवास केल्यावर पेंढरा या गावानंतरचा प्रवास बैलगाडीने किंवा पायी करावा लागे. स्त्रिया व मुलांनी बैलगाडीने हा प्रवास केला. आबाजींनी मात्र अनवाणी पायांनी ही पंधरा मैलाची पहिली पदयात्रा केली. त्यांची आई व श्री नर्मदामाई यांच्या कृपेने त्यावेळी त्यांच्या अंतःकरणात पदयात्रेचे बी पेरले गेले, याची त्यांनाही कल्पना नव्हती. पुढे ४० वर्षांनी त्या बीजाला अंकुर फुटले व रोपाचा वृक्ष व महावृक्ष झाला. वयाच्या ५७ व्या वर्षापासून ९० व्या वर्षापर्यंत एकूण चाळीस हजार किलोमीटरच्या केलेल्या पदयात्रांचे श्रेय ते त्यांच्या आईचा आशीर्वाद व पूर्वजांच्या पुण्याईला देतात.

मधे चाळीस एक वर्षे गेली. आबाजींच्या मनात पदयात्रा करण्याचा निश्चित कार्यक्रम ठरत नव्हता. एक दिवस आबाजी व त्यांच्या ओळखीचे एक गृहस्थ सहज फिरायला निघाले. तीन-चार मैल चालणे झाले. तरी आबाजी मागे फिरेनात. शेवटी ते गृहस्थ चिडून म्हणाले की, "अरे मी पेन्शनीत निघणारा गृहस्थ. आता मी थकलो असेन असा विचार तू करायला हवास. माझ्या वयाचा झालास की तुला कळेल की म्हातारी माणसे कशी थकतात!"काहीतरी भव्य करुन दाखविण्याची ही संधी आबाजींना मिळाली. झाले!हे आव्हान आबाजींनी स्वीकारले, आणि पायी चालण्याचा सराव वाढवायला प्रारंभ केला. साधारणतः १९५५ पासून प्रौढांसाठी जलद चालण्याच्या स्पर्धा नागपूरात आयोजिल्या जात. पन्नाशीनंतर आबाजींनी त्यात भाग घेण्यास सुरुवात केली. सतत नऊ वर्षे ते या स्पर्धेत प्रथम येत असत. १९६० ला स्थापन झालेल्या महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचे हस्ते आबाजींचा मोठा सत्कार दि. २१ जानेवारी १९६२ ला करण्यात आला. जलद चालण्याचा सराव करताना वयाच्या ५० व्या वर्षी तीन मैल चालण्यास त्यांना ३५ मिनिटे २४ सेकंद लागले तर साठव्या वर्षी तेच अंतर त्यांनी २८ मिनिटे २९ सेकंदात तोडले. पुढे ७७ व्या वर्षी त्या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला व ३९ मिनिटात अंतर कापून साठीवरच्या या स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावला.

त्यांच्यावयाची साठ वर्षे झाली त्या दिवशी त्यांनी सतत नऊ तास एकगतीने चालून ३८ मैलांची नागपूर ते रामटेक ही प्रदक्षिणा पूर्ण केली.



**पदयात्रा करताना सकाळची पुजा व अनुष्ठान नियमीत करणारे आबाजी**

याचवयात श्री केदारनाथ-बद्रीनारायण यात्रेतील कठीण प्रवासात स्वतःचे सामान पाठीवर घेऊन, केदारनाथ दर्शनासाठी चढून जाणे येणे व बद्रीनारायणला जाणे येणे असे एकूण चौऱ्याण्णव मैलांचे चढउताराचे अंतर त्यांनी सहजपणे पार पाडले.

चालण्याच्याया स्पर्धांतून स्फूर्ती घेऊन वयाच्या साठीपासून ते पदयात्रा या क्षेत्राकडे वळले. पुढील वीस-पंचवीस वर्षाच्या काळांत त्यांनी सुमारे ४०,००० किलोमीटर्सच्या विविध पदयात्रा आखून योजून बऱ्याचशा एकट्यानेच पार पाडल्या.

वृत्तीव मनाच्या श्रद्धेमुळे सर्व भारत भ्रमण करणाऱ्या या पदयात्रा धार्मिक स्थळी व काही ज्ञान व अनुभव समृद्धीच्या दृष्टीने आबाजींनी केल्या. मात्र आठ-नऊ वर्षांच्या सतत जलद चालीची संवय पदयात्रांमधूनही कायम राहिल्याने प्रत्येक पदयात्रेचा कालावधी, सामान्यांची बोटे आश्चर्याने तोंडात जावीत इतका कमी लागलाच व तोही वाढत्या व उतारवयात! जबरदस्त इच्छाशक्ती, आत्मविश्वास, विलक्षण साहसी स्वभाव व परमेश्वरावरील अढळ निष्ठा या जोरावरच आबाजींना ते साध्य झाले असावे.

वाटपुसल्याविण जाऊ नये।फळ ओळखल्याशिवाय खाऊ नये।

अनुक्रमणिका

पाडिलीवस्तू घेऊ नये। येकायेकी॥ या उक्तीनुसार श्री आबाजी वागत असल्याने, त्यांच्या प्रत्येक पदयात्रेची पूर्ण आखणी अत्यंत परिपूर्ण व अभ्यासनीय बनत असे. त्यामुळे पदयात्रेतील अडचणींचे प्रमाण कमी होत असे. सोबत परिचय कार्ड, ट्रॅव्हलर्स चेक, इतर सामान आवश्यकतेनुसार ते घेत. यात्रा करताना त्या त्या भागातील काही स्थानिक मंडळांचे किंवा परिचितांचे पत्ते त्यांचे सोबत असत. कुठे व केव्हा पोहचायचे याचा आराखडा तयार असायचा. व कितीही अडचणी आल्या तरी तो क्रम दोन-चार दिवसाच्या वर फारसा चुकू नये. याची दक्षता ते घेत. घरी ते नियमीत पत्रे पाठवीत. या योजनाबद्ध कार्यक्रमामुळे घरच्या मंडळींना फारशी चिंता वाटणार नाही, असा त्यांचा उद्देश असे.

आबाजींचेएक जवळचे परिचित श्री. म. वि. गोखले यांनी एकदा आबाजींना विचारले. “आबाजी पाच-सहा महिने वणवण हिंडण्याकरिता तुम्हाला सौ. वहिनी परवानगी कशी देतात ? आबाजी काही बोलण्यापूर्वीच आपल्या सौम्य आवाजात सौ. वहिनी म्हणाल्या, “ते परवानगी विचारतातच कधी?”त्यावर आबाजी म्हणाले, “प्रथम लहान-सहान पदयात्रा यशस्वी पूर्ण करुन, मी मोठ्या पदयात्रा पूर्ण करु शकतो हे सिद्ध केले आहे. त्यामुळे मला परवानगी घ्यावी लागत नाही.”

## पदयात्रेचे उद्देश

पदयात्रा म्हणजे एकप्रकारची तपश्चर्याच आहे. ईश्वराचे नामस्मरण करताना संसारातल्या विविध चिंतांची जाणीव देखील यावेळी होत नसल्याने पदयात्रा करुन आल्यानंतर काही वेळा तर आबाजींची प्रकृती अधिकच काटक व तेजस्वी झाली. विशेषतः प्रयाग-रामेश्वर कावड यात्रा व नर्मदा परिक्रमा या अवघड यात्रा ते पूर्ण करुन आले त्यावेळी, तपस्वी ऋषींचेच तेजस्वी दर्शन झाल्याचे अनेकांनी बोलून दाखविले. या पदयात्रेसंबंधी बोलताना आबाजी म्हणतात की, “या यात्रा करताना अनेक अडचणी, कठीण प्रसंग, उपासमारीचे आणि लूटमारीचे प्रसंग ओढवतात, हे अगदी खरे आहे. पण केलेला संकल्प सिद्धीस नेण्याची तीव्र इच्छा व मानसिक धैर्य या अडचणींवर मात करते. यात्रा ठरलेल्या मार्गाने व ठरलेल्या काळातच पूर्ण करण्याची माझी मनोकामना परमेश्वरच पूर्ण करतो. परमेश्वरावरील हा विश्वासच यात्रेचा संकल्प पूर्ण होण्यास प्रामुख्याने कारणीभूत ठरतो. शिवाय या पदयात्रेच्या वेळी निरनिराळे देश, चालीरिती, हवामान, विभिन्न स्वभावांचे अनुभव, संस्कृती याचे दर्शन घडते. वइतिहासही घडवला जातो. पदरी असलेले अनुभवाचे चार शब्द इतरांना उपयुक्तही ठरतात. भिन्न प्रांतातील, निरनिराळ्या ऋतुतील निसर्ग सौंदर्याने मन नेहमीच उल्हसित व आनंदी राहते. संसाराची चिंता नसल्याने परमेश्वराची प्रार्थना एकरुपतेने करता येते. आपला देश, समाज, आप्तवर्ग व कुटुंबीय यांच्या सुख-समृद्धी - धैर्य-शौर्य-बंधुभाव वृध्दीसाठी परमेश्वराजवळ मागणे मागता येते. यामुळे जो मानसिक आनंद मिळतो त्याचे वर्णन शब्दात करणे कठीण होते. तो आनंद ज्याचा त्याने स्वानुभवानेच मिळवावा लागतो.

* * *

अनुक्रमणिका

### अकरा


## पदयात्रेचा प्रारंभ चौऱ्यागड

मध्य प्रदेशातील पचमढी जवळी महादेवाचे डोंगर असून, तेथे महाशिवरात्रीला फार मोठी जत्रा भरते. त्यालाच चौऱ्यागडची यात्रा म्हणतात. हजारोंच्या संख्येनी भाविक या यात्रेला जातात. अतीशय कठीण अशी ही यात्रा आबाजींनी १९८० ते १९९३ अशी सातत्याने चौदा वर्षे केली. प्रारंभीची काही वर्षे ते एकटे यात्रेला जात. पण पुढे नागपूरातील डॉ. प्रभाकर बेडेकर, हे श्री. सुरेश घुगरे आदी अनेक तरुणमंडळींच्या सहाकार्याने चौऱ्यागडची यात्रा योजनापूर्वक आयोजित करु लागले. सहा दिवस चालून ही यात्रा पूर्ण केल्यानंतर परतताना ते वाहनांचा उपयोग करतात.

आबाजींच्याअध्यात्म्य शक्तिवर आणि त्यांच्या मार्गदर्शनावर डॉ. बेडेकांची अतीव श्रद्ध! आबाजींचा या यात्रेतील सहभाग त्यांना प्रेरणादायी वाटे. त्यामुळे ते आबाजींना आग्रहाने या यात्रेला अतीशय सन्मानाने नेत.

यायात्रेच्यावेळी अनेक कठीण प्रसंगात आबाजींचे धीरोदात्र वर्तन आणि आत्मविश्वास यामुळे त्यातून आमाची सुटका होई, अशी माहिती देताना श्री. सुरेश घुगरे म्हणाले, "वानगी दाखल एक प्रसंगी १९९८ साली आम्ही दहा बारा मंडळी आबाजींसह ही यात्रा करीत होतो. या यात्रेच्यां वेळी काही अंतर जंगलातून चालत आम्ही पार करीत असू. एक दिवस देला खारीच्या जंगलातून सकाळी आठ वाजता आम्ही प्रवेश केला. वाटेत रस्ता चुकलो. सायंकाळचे चार वाजले तरी मुख्य रस्ता सापडेना. जंगल घनदाट होऊ लागले. अर्धवट खाल्लेल्या जंगली श्वापदांचे देह दिसू लागले. सर्वजण अतीशय भयभीत झाले. या स्थितीत जंगलात रात्र काढावी लागली तर ...... या विचाराने सर्व अस्वस्थ झाले पण या सर्व काळात आबाजी अतीशय स्थित प्रज्ञ होते. त्यांचे नाम स्मरण चालू होते आणि शांतपणे ते आमच्या समवेत, चालत होते. आम्ही सर्व हताश झाल्यावर आबाजी म्हणाले, "थांबा. आता माझ्या पाठोपाठ तुमी चला. आपल्याला लवकरच मुख्य रस्ता लागेल."आणि खरोखरच पंधरा मिनीटात आम्ही मुख्य रस्ताला लागलो. दुसऱ्या दिवशी आबाजींनी मनात योजलेले अनुष्ठानाचे कठीण संकल्प पूर्ण केले.

अनुक्रमणिका



भुराभगत मार्गाने चौऱ्यागड चढतानाचे आबाजी

## अनुक्रमणिका

## बारा
## सर्वात मोठी 'अनेक गंगोदक कावड यात्रा'

पूर्व व पश्चिम सागर दर्शनासह, मध्यभारत प्रदक्षिणा आणि अनेक तीर्थक्षेत्रे व देवदेवतांच्या दर्शनासाठी आबाजींनी अनेक गंगोदक कावड यात्रा करावयाचे ठरविले. अनेक पवित्र नद्यांचे पाणी गंगेसोबत या कावडीत होते. यावेळीही पवनार आश्रमात जाऊन त्यांनी श्री. विनोबाजींचे आशिर्वाद घेतले.

हीयात्रा दि. १५ ऑक्टोबर १९७५ ला विजया दशमीच्या मुहूर्तावर त्यांनी सुरु केली. वयाच्या ७२ व्या वर्षात पदार्पण केल्यानंतर, चार हजार सहाशे पस्तीस (४६३५) किलोमीटर्सची ही कावड यात्रा आतापर्यंत केलेल्या सर्व पदयात्रेत सर्वात मोठी यात्रा होती. सरासरी रोज २५ किलोमीटर चालून ठरविल्या कार्यक्रमानुसार एकशे एक्याण्णव दिवसात पदयात्रा पूर्ण करुन ते २१ एप्रिल १९७६ ला नागपूरला परतले. त्यावेळी नागपूरात प्रवेश करण्यापूर्वी त्यांचे फार मोठे स्वागत नागपूरकरांनी केले.

नागपूरयेथून यात्रेला सुरवात करुन महाराष्ट्र, ओरिसा, आंध्रप्रदेश कोकणपट्टी, मराठवाडा करुन नागपूर मार्गे श्री. शैल्यम, जगन्नाथपुरी, गाणगापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, चिपळूण, सातारा, पंढरपूर, नांदेड व वर्धा या मार्गाने ते परत नागपूरला पोहोचले.

नागपूरयेथील श्री.मधुकर माधव चोरघडे हे मध्यमवयीन गृहस्थ या यात्रेत साधारणतः साडेचार महिने त्यांचे सोबत होते.

आबाजींनीकोणतीही गोष्ट करायची ठरविंली तरी त्याला धार्मिकतेबरोबर देशप्रेमाची जोड असायची.

कावडयात्राकेल्या त्यावेळी त्यांनी एक काव्य केले. या काव्यात त्यांनी भारत व भारतीय जनता कशी असावी, तरुणांनी काय करावे, हे सांगून त्यासाठी परमेश्वराकडे मागणे मागितले. भारतभर कावड घेऊन निघण्याचा उद्देशच त्या काव्यात त्यांनी व्यक्तविला.

### गंगा तुळस कावड यात्रा

आबाजींनी आतापर्यंत केलेल्या सर्व मोठ्या पदयात्रा आखीववेळापत्रकानुसार यशस्वी पूर्ण केल्या होत्या. मात्र ही यात्रा त्यांना दहा दिवसांनी अर्धवट सोडून नागपूरला परतावे लागले. दि. २२ ऑक्टोबर १९७७ ला वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षी सुमारे तीन हजार किलोमिटर्सच्या पदयात्रेचा मार्ग महाराष्ट्र, आंध्र, केरळ, तामिळनाडू, गोवा अशा राज्यातून होता. पण ही यात्रा सुरु केल्यानंतर सुमारे आठ दिवसांनी आबाजींना ताप येऊ लागला. थंडी भरली की ते वाटेत झाडाखाली पांघरुण घेऊन झोपत. जरा बरे वाटले की मार्गक्रमणा करत त्यांनी दोन दिवस यात्रा केली. पण शेवटी चंद्रपूरच्या पुढे मंचेरियल या गांवी असह्य झाल्याने एका सद्‌गृहस्थाच्या मदतीने ते दवाखान्यात भरती झाले. रात्री फोन करून त्यांनी नागपूरला आजारपणाची वार्ता


अनुक्रमणिका

कळविली. ताबडतोब त्यांचे धाकटे जांवई श्री. अरविंद घारपुरे तेथे गेले आणि यात्रा पुर्ण न झाल्याने अतीशय कष्टी झालेल्या आबाजींची समजूत घालून त्यांना परत आणले. या खंडीत यात्रेच्या वेळी मंचेरियल येथेच एका यात्रेकरूला आबाजींनी सोबत नेलेली कावड, व अन्य सर्व सामानाचे दान दिले.

आयुष्यातकेलेल्या संकल्पातील या पहिल्या अपयशाने आबाजीं अतीशय नाउमेद झाले. काही दिवस बिलासपूरला राहून ते नागपूरला परतले ते एक नवा संकल्प मनात योजूनच या यात्रेच्या प्रारंभापासूनच त्यांना नकारार्थी संकेत मिळत होते. यात्रेत गंगेबरोबर तुळस हवी म्हणून यात्रेला निघण्यापूर्वी महिनाभर आधी त्यांनी टोपलीत तुळशीचे रोप लावले. पण दोन वेळा रोप कोमजले. शेवटी यात्रेला निघण्यापूर्वी दोन दिवस आधी त्यांनी परत नवीन रोप लावले व ते गंगेशेजारी ठेवले. सात-आठ दिवसांनी तेही रोप सुकून गेलेले त्यांना आढळले. याशिवाय पाय घसरुन पडणे. घुबडाचे घुत्कार, फुत्कार करणारे साप, चोऱ्या, हिवतापाने ग्रासणे आदींमुळे ही यात्रा अर्धवट सोडावी लागली अशी त्यांची भावना होती.

* * *

अनुक्रमणिका



गंगा रामेश्वर कावड यात्रेला निघालेले आबाजी - सन १९७२

# अनुक्रमणिका

## तेरा
## श्री. शिवगंगा दर्शन यात्रा

ती. आबाजींच्या या अनेक पदयात्रा म्हणजे परमेश्वरावरील त्यांची निष्ठा, भक्ती आणि तपश्चर्या यांचा संगम होय. परमेश्वर आस्तित्वाचीप्रचिती त्यांना श्री. नर्मदादेवी व श्री दत्त दर्शनाने आली होती. या शिवगंगा यात्रेतही त्यांना असाच एक परमेश्वर दर्शनाच्या दुर्मिळ योगाचा लाभ झाला.

गंगा-तुळसकावड यात्रा अर्धवट सोडून यावे लागल्याचे शल्य मनात होते. परत एक पद यात्रा करुन मगच या मोठ्या पदयात्रांची सांगता करायची, असे आबाजींनी ठरविले. त्यादृष्टीने त्यांनी परिक्रमा क्षेत्राची माहिती जमवायला सुरवात केली. आता आबाजींनी पदयात्रा न करता आरामाने वाहनातून यात्रेला जावे, असे आम्ही सर्वांनी सांगितले पण त्यांचा निर्धार पक्का होता. शेवटी कमी अंतराची पदयात्रा करीन असे सर्वांना सांगून नागपूर ते गोकर्ण-महाबळेश्वर अशी एक हजार एकशे त्रैपन्न किलोमीटरची ही यात्रा पाच नोव्हेंबर १९७९ मधे त्यांनी सुरु केली.

या पदयात्रेच्यावेळी एक विलक्षण सुखद अनुभव त्यांना आला. त्याचे त्यांनी केलेले वर्णन त्यांच्याच शब्दात देत आहे.

“नागपूर पासून पदयात्रा सुरु करुन मार्गक्रमणा करीत असताना लक्षात आले की, श्री दत्तजयंती जवळ म्हणजे तीन दिवसानंतर आली आहे. अक्कलकोट हे सोलापूर जवळील तीर्थक्षेत्र. श्री. दत्तजयंती तेथे साजरी करावी या विचाराने तीन दिवसांचा प्रवास मी दोन दिवसात पूर्ण करुन, अक्कलकोट येथील गावातील स्वामी मंदिरात पोहोचलो.

तेथीलसभामंडपात जरा वेळ थांबल्यानंतर मठाचे मुख्य व्यवस्थापक आले. मी त्यांना श्री दत्तजयंतीसाठी येथे रहावयास जागा द्यावी अशी विनंती केली. त्यांनी जवळचएका खोलीत रहाणाऱ्या श्री. बापट यांना बोलाविले व तुमच्या खोलीत यांना जागा द्या, असे सांगितले. मी आनंदाने बापट यांचेसोबत त्यांच्या खोलीपाशी आलो. खोलीचे दार बापटांनी उघडले तेव्हा काळोखी, ओलसर, दमट व कोंदट अशी लहानशी खोली माझ्या नजरेला पडली. या खोलीत वास्तव्य करणे अगदी अशक्य होते. श्री. बापट तिथे कसे रहात होते देवजाणे, असे मनाशी पुटपुटत मी परत माघारी सभामंडपात आलो.

व्यवस्थापकांनासांगितले की माझी ओसरीवर, माडीवर कुठेही मोकळ्या जागेत रहाण्यासाठी व्यवस्था करा. मी बापटांच्या खोलीत रहाणे शक्य नाही. व्यवस्थापकांनी नकार दिल्यावर मी सामान घेऊन तिथून निघालो.

अर्धवटसोडलेल्या गंगा-तुळस यात्रेच्या वेळी कलशासह कावडीचे दान दिल्यामुळे, यावेळी माझ्यासोबत कावड नव्हती. पाठीवर गच्च भरलेली हॅवरसॅक, त्याच्या दोन्ही बाजूने लोंबती पांढरी घोंगडी, एका हातात काठी व एका हातात पाण्याची बरणी असे सामान माझ्याजवळ होते.

अनुक्रमणिका

देवळातूनबाहेर आलो आणि चालू लागलो. वाटेत एका गृहस्थांची गाठ पडली. बोलण्याच्या ओघात मी मठातील व्यवस्थापकांचे वागणे सांगतले. तेव्हा ते म्हणाले, श्री स्वामी समर्थांच्या वडाखालच्या मंदिरात तुम्हाला जागा मिळेल. मी व्यवस्था करतो. त्यांनी दूरध्वनी करुन जागेची सोय केली. मी जवळच्या दुकानात सामान ठेवले व मंदिर दर्शन करुन जागा बघून सामान नेतो सांगितले.

मंदिरातीलजागा चांगली होती म्हणून परत सामान घेण्यास आलो त्यावेळी दुकानाचा तरुण मालक (त्याचे नाव मी विसरलो) आलेला होता. त्याने मला सांगितले, तुम्ही उगाच धावपळ करु नका. माझ्याबरोबर माझ्या घरी चला. भोजन व विश्रांती घ्या. त्याप्रमाणे मी तरुणाच्या घरी गेलो. जेवण व थोडी विश्रांती झाल्यावर त्या मंडळींनी मला पदयात्रांची माहिती सांगण्याचा आग्रह केला. त्या सोबत काही पदेही म्हणायला सांगितली.

रात्रीझोपण्यापूर्वी त्यांच्याकडे गावातील एक शिक्षक आले. माझा परिचय करुन घेतल्यावर त्यांनी माझा पदयात्रेचा मार्ग विचारला. नंतर ते म्हणाले. येथून तेरा-चौदा मैलावर एकसुंदर देवस्थान आहे. तेथे उत्सव असतो. ते स्थान तुम्हांला आवडेल. तुमच्या पदयात्रेपासून ते फार दूर नाही. इथल्या वास्तव्याच्या दिवसात तुम्ही तेथे जाऊन याल.' मी त्यांची सूचना मानली व दुसऱ्या दिवशी सर्वांचा निरोप व शिदोरी घेऊन निघालो.

**मन्नूरचा चिन केशव**

अक्कलकोट तहसिलीत मन्नूर नांवाचे गाव आहे. तेथे चंद्रभागेच्या तीरावर चिन केशवाचे सुंदर मंदिर आहे. चिन म्हणजे लहान व केशव म्हणजे विष्णू. या स्थानाची पौराणिक कथा :-

धृवाने तपश्चर्येने विष्णूकडून अढळपद प्राप्त केले. त्यानंतर धृवाच्या आईने त्याच्याजवळ विष्णू दर्शनाचा हट्ट धरला. त्यावेळी धृवाने विष्णू जवळ मागणी केली की, तुम्ही या ठिकाणी वास्तव्य करा. तेव्हा विष्णूने सांगितले की, चंद्रभागेत चिन केशवची काळ्या पाषाणाची मूर्ती सापडेल. ती येथे स्थापन करावी. त्यानुसार हे मंदिर बांधले गेले.

दरवर्षी दत्तजयंतीच्यावेळी येथे तीन दिवसांचा उत्सव असतो. श्री. विष्णूची मिरवणूक एक दिवस घोड्यावरुन, एक दिवस हत्तीवरुन व एक दिवस पालखीतून निघते. या गावात ७५ टक्के विद्वान ब्राह्मणांची घरे आहेत.

दुसऱ्यादिवशी पहाटेच निघाल्यानंतर प्रथम पाच-साडेपाच मैलावरील अक्कलकोट रोड स्टेशनवरुन एक-दीड मैलावरीलशिवपुरी येथील श्री गजानन स्वामी निर्मित नवीन मंदिरात गेले. एकांतवासातील हे मंदिर प्रसन्न व रमणीय परिसराने सुशोभित आहे. हिरव्यागार पानांनी वेष्टीलेल्या औदुंबराच्या कट्ट्यावर सामान ठेवले. हातपाय धूवून मंदिरात दर्शनासाठी निघालो. तेथे प्रथम दर्शन घडले ते पाच-साडेपाच फुट उंचीच्या पाषाणाच्या सुबक मूर्तीचे – श्री परशुरामाचे । ते माझ्याकडे बघून प्रसन्न हास्य करीत आहेत, असा मला भास

अनुक्रमणिका

झाला. मूर्तीचे डोळे भरुन दर्शन घेतले व नंतर अन्य देवतांना वंदन करुन, औदुंबराकडे आले. शिदोरी खाऊन पाणी प्यायलो आणि मंदिर परिसराला नमस्कार करुन पुढे निघालो.

बरेच अंतर चालत, सांगितल्या मार्गाने जात होतो.

कालपासून माझी परीक्षा घेण्याचेच परमेश्वराने ठरविले असावे. कारण शिक्षकांच्या सूचनेनुसार बैलगाडी चाकोरी मार्गाने बरेच चाललो तरी मन्नूर गाव दिसेना! वाटेत दिसलेल्या एकाला सहज विचारले तेव्हा तो म्हणाला, तुम्ही दोन-तीन मैल पुढे आला आहात. त्याने मला मार्गाची माहिती दिली. मी चाकोरी मार्ग येईपर्यंत डावीकडील पाऊलवाट व शेतीच्या भागातून मार्ग धरला. ऊन तापू लागले. पाण्याची बरणी रिकामी झाली. वाटेत चिटपाखरुही दिसेना, त्यामुळे मार्ग बरोबरआहे का हेही कळेना. चालण्याबरोबर जप सुरु होता. त्यामुळे अधिकच कोरडे पडून तहानेची जाणीव तीव्र होऊ लागली.

परतमागे जाणेही कठीण होते. मी खूप दमलो होतो. शेवटी एका झाडाखाली दहा मिनीटे विश्रांती घेतली व लगेच पुढे निघालो. कसेही करुन संध्याकाळच्या आत गाव गाठणे भाग होते.


हळूहळूमार्ग चालत असता माझ्या परीक्षेची वेळ संपली असावी, कारण समोरुन एक शेतकरी येताना दिसू लागला. तो जवळ येताच मी त्याला मन्नूर गाव किती लांब आहे हे विचारले. गाव जवळच आहे असे त्याने म्हणताच मी त्याला म्हटले, “भल्या माणसा, या म्हाताऱ्यासोबत गावापर्यंत ये. पाणी पिण्यासाठी पहिले घर किंवा हॉटेल लागेल तिथून मी गावात प्रवेश करीन.”तो शेतकरी खरोखरच भला माणूस होता. माझ्या बरोबर तो निघाला. शेतातून चालत सुमारे अर्धा मैल आल्यानंतर गाव दिसू लागले. प्रथम एका हॉटेलात शिरुन मी भरपूर पाणी प्यायल्यानंतर तो भला माणूस परत त्याच्या शेताकडे निघून गेला.

मीपुढे मुक्काम शोधण्यासाठी निघालो त्यावेळी, एका घरासमोर आठ-दहा पंड्ये उभे होते. माझ्याकालच्या व आजच्या पदयात्रेची प्रश्नोत्तररुपात त्यांनी माहिती विचारली. या यात्रेकरुकडून पैसे मिळणार नाहीत हे लक्षात आल्यानंतर त्यांनी मला सांगितले, चिनकेशव मंदिरात आज महाप्रसाद आहे. तो तुम्ही घ्या.

मीमंदिराकडे निघालो, इतक्यात एक व्यक्ती श्री. शास्त्री पुढे आले आणि मला त्यांनी मुक्कामासाठी आपल्या घरी नेले. त्यांच्या घरी पाहुण्यांची गर्दी होती. तरी त्यांनी एका पलंगावर मला सतरंजी घालून दिली. हातपाय धुवून झाल्यावर मला चहा दिला व ते म्हणाले, “तुम्ही जरा वेळ आराम करा. मी मंदिरातून महाप्रसाद आणून देण्याची व्यवस्था करतो”. मंदिर जवळच आहे हे कळल्यामुळे मी त्यांना म्हटले, “मीच संध्यासमयी मंदिरात जाऊन दर्शन व महाप्रसाद घेऊन येतो”श्री. शास्त्री यांनी त्यांच्या मुलाला माझ्या सोबत जाण्यास सांगितले.

मंदिरात जाण्यापूर्वी मी चंद्रभागेवर हात पाय धुण्यासाठी गेलो. सूर्यास्त होण्याची वेळ होती. पावसाच्या तांबूस गढूळ पाण्याचा प्रवाह चंद्रभागेतून वहात होता. नदीतीरावर हिरवीगार विपूल झाडे होती. आणिमंदिराचा

व त्यावरील शिखराचा रंग पांढरा होता. मावळत्या सूर्याची सोनेरी किरण प्रभा या सर्वांवर पडली आणि पहाता पहाता सर्व देखावा सुवर्णमय झाला. आपण म्हणतो की सोन्याची द्वारका होती. त्याप्रमाणे त्या दिवशी मन्नुर व चिन केशवाचे मंदिर मला सुवर्णमय वाटले. यात अवास्तवता अजिबात नाही. दोन-तीन मिनीटेच हे सुवर्णक्षेत्र नजरेत साठविण्याची संधी मला मिळाली आणि सूर्यास्त झाला.



**दि. ४-१०-१९७५ ला अनेक गंगोदक कावड योत्रेला निघण्यापूर्वा, पवनार आश्रमात श्री. विनोबाजींचा आशिर्वाद घेताना श्री. आबाजी व सौ. मनोरमाबाई.**

मीअतिशय प्रसन्नतेने मंदिरात प्रवेश केला. चिन केशवच्या मूर्तीसमोर आलो आणि साष्टांग नमस्कार केला. प्रार्थना करण्यासाठी हात जोडून उभा होतो तोच धीर गंभीर वाणीत प्रश्न ऐकू आल्याचा भास झाला. “आबाजी, आज पदयात्रा कैसी हुई?”

हेशब्द कानी पडताच मी चमकलो. डोळे उघडून सर्वत्र नजर फिरविली पण माझ्याशी हिंदीत बोलणारे कुणी दिसले नाही. तेव्हा आभासमूर्ती कडे पहात हात जोडले. त्याला म्हटले. “अक्कलकोट मठातून मी हाकललो गेलो. त्या नाराजींने तिथून निघून येथे आलो. मर्यादित स्थानात रहाणे आपल्याला मान्य नसल्याने आपण अमर्यादित क्षेत्रात वास करता. मला अशा क्षेत्राचे दर्शन घेणे आवडते म्हणून मी आपल्या दर्शनासाठी आलो आहे. माझ्यावर कृपादृष्टी ठेवावी.”

अनुक्रमणिका

आनंदातिशयाने मी पुन्हा त्या जगन्नियंत्याला नमस्कार केला प्रार्थना पूर्ण केली.

मंदिराजवळच्याओसरीत शास्त्रीच्या मुलाने महाप्रसादाची व्यवस्था केली. मी जेवायला बसलो. भात, वरण व चटणी हे तीनच प्रकार जेवणात होते, पण अतिशय रुचकर असे ते जेवण होते.

माझ्यामनात विचारांचे काहूरासोबत आनंदलहरी उठत होत्या. काल स्वामी मंदिरात अपमानास्पद प्रसंग आला नसता तर परमेश्वराशी झालेल्या आभासात्म संभाषणाचा व श्री विष्णूदर्शनाचा लाभ मला झाला नसता. आपण चिंतितो एक, परमेश्वर घडवितो दुसरेच, ही जाणीव झाली. होते ते बऱ्याकरीताच, या उक्तीची सत्यता पटली.

रात्रीश्री. शास्त्रींच्या घरी सर्वांशी गप्पागोष्टी झाल्या. बोलता बोलता मी नागपूरचा हे कळल्यावर श्री. शास्त्री म्हणाले, “माझी पत्नी नागपूरच्या विश्वरुपे कुटुंबातली!”मग काय-घरचाच परिचय निघाला. कारण माझ्या सौभाग्यवतीशी विश्वरुपे कुटुंबियांचे घरोब्याचे संबंध होते. समितीचे कामव भजनाचे वर्ग या दोन्हीमुळे ही मंडळी सौभाग्यवतीशी फार आदराने वागत.

अनोळखीअसतानाही त्यांनी आदराने आश्रय दिला. आता ओळखीमुळे दुधात साखर पडली.

माझ्या परिक्रमाकथांचा थोडा कार्यक्रम त्यांच्या आग्रहावरुन झाला. रात्री खास कॉफीपान झाल्यावर मी चिनकेशवची मूर्ती आठवत गाढ झोपलो.

दुसरेदिवशी सकाळी स्नान व सर्व आन्हिक आटोपल्यानंतर ताम्हनातले तीर्थ मी शास्त्रींच्या घरामागील अंगणातील तुळशी वृंदावनाच्या रोखाने जरा लांबूनच भिरकावले. संवयी प्रमाणे दोन वेळा ताम्हण झटकले. घरात आलो. सहज माझे लक्ष ताम्हनाकडे गेले, तर एक तुळशीचे पान चिकटलेले दिसले. मला आश्चर्य वाटले. कारण पूजेला मी तुळस घेतली नव्हती. तीर्थ तुळशीकडे पाच-सहा फुटावरुन फेकले होते. मग ताम्हनात तुळशीचे पान कुठुन आले? प्रश्न घोळवत मी घरात आलो. या प्रश्नाचे चे उत्तर अनवधान किंवा साक्षात्कार ज्याने त्याने आपल्या बुद्धी प्रमाणे द्यावे.

श्रीगोकर्ण महाबळेश्वरची ही श्री शिव गंगा दर्शन पदयात्रा अकराशे त्रेपन्न कि. मी. ची छप्पन्न दिवसात पूर्ण करून दि. ३० डिसेंबर १९७९ ला आबाजी नागपूरला परतले. आणि मोठ्या पदयात्रांच्या यशस्वी संकल्पाची त्यांनी सांगता केली.

आबाजींच्याया यात्रांपासून स्फूर्ती घेऊन अनेक मंडळी त्यांचे मार्गदर्शन घेण्यास येत. त्यावेळी आबाजींच्या उत्साहाला सीमा नसे. ते बारीक सारीक तपशीलासह माहिती देऊन, येण्याऱ्यांना प्रोत्साहित करीत. लहानमोठ्या पदयात्रा करणारी अन कांही मंडळी यात्रेहून परतल्यावर आबाजींना आठवणीने धन्यवाद देणारी पत्रे पाठवित.

**अनुक्रमणिका**

आबाजींचेधाकटे जावई श्री. अरविंद घारपुरे व त्यांच्या तीन सहकाऱ्यांनी आबाजींच्या मार्गदर्शनाखाली चार वर्षात मिळून बाराज्योर्तिलिंगाची पदयात्रा सायकलवरुनपूर्ण केली.

**अनुक्रमणिका**

## चौदा
# भारत भ्रमणातील अनुभूती

आबाजींनी पूर्वपश्चिम आणि दक्षिणोत्तर अशा पायी परिक्रमा केल्या. अशा परिक्रमातील काही प्रातिनिधिक अनुभव त्यांच्याच शब्दात संक्षेपाने खालील प्रमाणे :-

प्रयागते रामेश्वर गंगाकावड यात्रेच्यावेळी आंध्रप्रदेशाच्या आरंभी सायंकाळी रस्त्याच्या दुतर्फा ५०-६० कौलारु घरांची छोटी वस्ती दिसली. मुक्काम शोधण्यासाठी, मी डावीकडील वस्तीत प्रवेश केला असता एका घराच्या अंगणात एक तरुण जोडपे आपल्या छोट्या मुलाला घेऊन गप्पा मारीत होते. जवळच एक कुत्रा खेळत होता. त्यांना बघून मी थांबलो. "रामेश्वरला जातो आहे. कुठे मुक्कामाला जागा मिळेल का"असे विचारले.

त्याबरोबरउभयता कॉटवरुन उठले. आमच्याच घरी आराम करा असे सांगून तरुणाने खाटेवर कांबळे टाकले. माझे हातपाय धुवून होईपर्यन्त तरुणीने गरम चहा दिला. नंतर साडेसात आठच्या सुमारास ताजा स्वयंपाक करुन भोजनाची तयारी केली. प्रथम आग्रहाने त्यांनी मला जेवायला बसविले. पाट, पत्रावळीवर दोन द्रोण, पापड, मिरची, चटणी वाढली. पहिला वरणभात, दुसरा सारभात, तिसरा ताकभात अशी सुग्रास भाताची मेजवानी दिली. बाबाजींच्या झोपण्याची व्यवस्था कुठे करावी असा त्या उभयतांना थोडा प्रश्न पडला. पण लगेच त्यांनी निर्णय घेतला. लांबट खोलीत पडदा लावून स्वयंपाक घर, बैठकीची खोली व झोपण्याची खोली होती. समोर ओसरी होती. तरुणाने ओसरी स्वच्छ झाडली. चारही बाजूला जागा सोडून कांबळे घातले. शेणाचे गरगट तांब्यात घेतले व त्यात रॉकेल व फिनाईल घालून कांबळ्यापासून १॥ -२ फूट अंतरावरुन चारी बाजूने गरगट घालून सीमारेषा केली. कुत्रा भुंकण्याने बाबाजींना त्रास होईल म्हणून त्याला पलीकडे बांधले व गरगटाची लक्ष्मणरेषा ढेकणांसाठी आखली. सकाळी उठल्यावर धिरड्यांचा अल्पोपहार व चहा घेतल्यावर मी निघालो. छोट्या बालकाच्या हातात रुपया दिला. या प्रेमळ दांपत्याला शुभाशीर्वाद देऊन त्यांचा निरोपघेतला.

आंध्रप्रदेशसंपून तामीळनाडूमध्ये शिरण्याच्या आधी अंदाजे ३-४ दिवसांपूर्वीची गोष्ट!त्यादिवशी मला खूप भूक लागली होती. सायंकाळची वेळ होती. मार्गावरील एस. टी. शेडच्या जवळ कावड मुक्कामाला ठेवण्याची सोय दिसल्याने मी कावड वरती ठेवून मुक्कामाला कुठे आसरा मिळतो का या विचाराने खाली बैठक मारली. थोड्याचवेळात जवळच्याच वस्तीत राहणारा एक गृहस्थ माझ्याजवळ आला. त्याने मला इथे कसे काय थांबलात, असे विचारल्यावर मी त्याला मुक्कामासाठी जागा हवी आहे असे सांगितले. त्याबरोबर तो चटकन म्हणाला, "अरे वा! मी तुमच्याशी बोललो हे माझे भाग्यच आहे. आज तुम्ही माझ्या घरी मुक्कामाला चला. मला फार आनंद वाटेल."

मीत्याच्याबरोबर कावडीसह निघालो. थोड्या अंतरावर त्याचा मोठा वाडा आला. बरीच बिऱ्हाडेही दिसली. वाड्यात पाण्याचे बरेच ड्रम भरलेले दिसत होते. त्याने मला हॉलमध्ये नेले व कावड दोन खुंट्यांवर व्यवस्थित ठेवली. हातपाय धुवून आल्यावर त्याने मला बैठकीवर बसविले. आणि मी आता येतो असं म्हणून तो बाहेर गेला. ५-७ मिनिटात परत येताच, गरम चुरमुरे फुटाणे व शेंगदाणे यांनी भरलेला पानाचा मोठा द्रोण

अनुक्रमणिका

माझ्या हातात दिला. हा छोटा नास्ता करा, मी आत जाऊन येतो असं म्हणून तो आत गेला. भूक लागल्यामुळे हे गरम दाणे मी खाऊ लागलो.

तोचआतून एका बाईचा आवाज ऐकू येऊ लागला. बराच वेळ तिचे बोलणे उंच पट्टीत चालू होते. मला भाषा कळत नव्हती. पण नाटकातील त्राटिकेची आठवण झाली. हंबीरराव तिला वठणीवर आणतो असा नाटकातील प्रसंग, इथे उलट झाला होता एवढेच. आजुबाजूचे बिऱ्हाडकरु दारातून हे दृश्य पाहात होते व संवाद ऐकत होते. जरा वेळाने मी हॉलमधील दिवा बंद केला. जवळपास पाउण तासाच्यावर त्राटिकाबाईंचा आवाज उंचावलेलाच होता. मधून यजमान एखादे वाक्य बोलले की परत त्यांचा आवाज वाढे. शेवटी यजमानांकडून शाब्दिक प्रतिकार होत नाही, हे लक्षात आल्यावर बाईंचा आवाजाचा सूर खर्चाकडे वळला. शब्दांची फेकही मंदावली. थोड्यावेळांनी मीही पाणी पिउन झोपी गेलो. लगेच दुसऱ्या दिवशी मी तेथून त्वरीत मार्गस्थ झालो, व गावांतील एका चहाच्या टपरीवर थांबलो. माझा चहा पिणे होईतोकालचा गृहस्थ तेथे आला. त्याला फार वाईट वाटले होते. त्यांने माझी क्षमा मागीतली व चहाचे पैसे त्याने मला देऊ दिले नाही.

१९७२मधल्या यात्रेतील तामीळनाडूमधील एक प्रसंग!त्या राज्यात हिंदी भाषेविषयी राग व तिटकारा वारंवार जाणवत असे. मला त्यांची भाषा येत नसे. एक दिवशी सायंकाळ होत आली. मुक्कामासाठी ठिकाण दिसेना. वाटेत चिटपाखरुही नव्हते. तसाच पुढे जात असताना २-३ व्यक्ती पाउल वाटेने येताना दिसल्या. मी त्यांना खुणेने थांबविले. हिंदीत सांगितले की, "संध्याकाळ होते आहे. मी म्हातारा पदयात्री आहे. तेव्हा मला मुक्कामाला जागा कुठे मिळेल का ते सांगा." त्यांना माझे बोलणे कळेना. मी मोडक्या इंग्रजीत त्या अर्थाचे बोललो. पण त्यांना तेही कळेना. मग मी त्यांना खुणेनी माझे म्हणणे सांगितले. त्यांच्यापैकी एकाने समजले असा आविर्भाव केला व मला त्यांच्यामागे येण्याची खूण केली. पक्का रस्ता सोडून ते तिघे व मी पश्चिमेकडे चालू लागलो. नारळीपोफळीची बाग व एक तलाव मागे टाकून आम्ही दोन फर्लांग एका टेकडीच्या पायथ्याशी आलो. तिथे ४॥ × ६ फूटाचा एक चांगला ओटा होता. ती एका तपस्वी वृद्धाची समाधी होती हे माझ्या लक्षात आले. त्या तिघांनी माझ्याकडे बघून बरोबर आणले ना? असे खुणेने विचारले. मीही त्यांना ठीक आहे म्हटल्यावर ते गावाकडे निघून गेले.

मी केलेल्याखाणाखुणा, मी पश्चिमेकडे हात दाखवून २-३ वेळा खाली केला होता. म्हणजे सूर्यास्त होत आहे. दाढीमिशीला हात लावून, जमिनीला हात लावून, मला वृद्धाला विश्रांतीसाठी जागा हवी आहे ती कुठे मिळेल असे विचारले. व दोन्ही हात एका कानाशी लावून डोळे मिटून झोपेसाठी जागा पाहिजे असे सांगितले.

त्यांनी लावलेलाअर्थ-पश्चिमेकडे एका वृद्ध तपस्वीची समाधी आहे. ते तपस्वी दाढीमिशावाले आहेत. त्यांच्या समाधीची जागा कुठे आहे ते दाखवा.

अशीही खाणाखुणांची गंमतीदार स्वागत कथा.

सप्तगंगाकावड यात्रेतील ही आठवण. हर्दा गावाजवळील एका जंगलातल्या छोट्या वस्तीत एका घरी मुक्कामाला जागा मिळाली. घरात एकच दांपत्य दिसत होते. हातपाय धुणे होईतो त्याने गरम चहा आणून दिला

म्हणाला, “बाबाजी जेवण लवकर तयार होईल. तोपर्यंत संकोच न करता आराम करा.”मी थोडा जप करून दैनंदिनी लिहीत असताना मला खालील संवाद ऐकायला आला.

“जगदीश, दुकानातून लवकर सामान आणायला हवे.”
ठीक आहे, आणतो. मला लवकर यादी दे महेश.”

“तूप आणि साखर जास्त आणायला हवी. जगदीश विसरु नकोस.”

“महेश, मी सर्व सामान लवकर आणतो. पण बाबाजींसाठी जेवण चांगले करायला हवे.”

संवादऐकता ऐकता मी आडवा झालो. व मला झोप लागली. थोड्यावेळांनी जाग आली. त्यावेळी दोघेही माझ्या उठण्याची वाट बघत होते. हातपाय धुवायला त्यांनी मला गरम पाणी दिले. स्वयंपाकघरात जेवायला नेले. तिने दोन पाने घेतली व वाढायला लागली. जेवणापूर्वी न राहवून मी विचारले, “हे काय आम्ही दोघंच बसणार? जगदीश व महेश कुठे आहेत?

माझ्याया प्रश्नावर ती तोंडाला पदर लावून हंसायला लागली. त्यानेही तिला हसण्यात साथ दिली. मी दोघांकडे पाहात राहिलो. त्यांचे हसणे कमी झाल्यावर ती म्हणाली, “बाबाजी, पती-पत्नी एकमेकांना नांवाने हाक मारीत नाहीत, हा आमचेकडे रिवाज आहे. म्हणून आम्ही दोघांना एकमेकांना खऱ्या नावानी हाक न मारता महेश व जगदीश या नावाने हाक मारतो. तुमच्या शेजारी बसलाय तो जगदीश आहे व महेश वाढतो आहे.”तिच्या या खुलाशाने परत एकदा खसखस पिकली. दुसरे दिवशी त्यांचा निरोप घेईपर्यन्तचा वेळ खुशीत, आनंदात पार पडला. निरोप देतेवेळी त्यांना व मलाही वाईट वाटले. अजूनही मला कधी कधी त्या जगदीश-महेशची आठवण येऊन गंमत वाटते.

* * *

अनुक्रमणिका

## पंधरा
## दशावताराची पर्यावरण मीमांसा

अवतार म्हणजे परब्रह्माचे स्वतःचे अवतीर्ण होणे!अवतार म्हणजे पृथ्वीवर येणे. संपूर्ण ब्रह्म दुसऱ्या कोणत्याही जीवाला स्पर्श न करता स्वतः स्वतंत्र लिंग देह धारण करुन जन्माला येते, तो जन्म म्हणजे अवतार! प्रारब्ध भोगत, कर्मफल भोगत दैवी काम करतो तो अवतार नाही. तर स्वतः दैवी कार्यासाठीच आलेले चिरंतन तत्व म्हणजे अवतार. गीतेत म्हटल्याप्रमाणे 'परित्राणाय साधूनाम, विनाशायच दुष्कृताम्' --- भगवान अवतार घेतो. ईश्वरी चैतन्य निरनिराळ्या स्वरुपात अवतीर्ण होते, असे दशावतार मानले गेले आहेत.

यादशावतारासंबंधी श्री आबाजींनी केलेले विचार चिंतनीय आहेत.

पदयात्रांच्यानिमित्ताने आबाजी निसर्गाच्या जास्तीतजास्त सान्निध्यात गेले. जुन्या काळी ऋषीमुनींनी निसर्गाच्या अतूट सहवासातून काही मौलिक निरीक्षणे काढली. पुढे त्या निरीक्षणांचे वैदिक तत्वज्ञान झाले. आणखी पलीकडे त्या तत्त्वज्ञानाचे अपभ्रष्ट रुप पुराणात झाले. कालांतराने त्यात प्रक्षिप्त भाकडकथा घुसविल्या गेल्या.

पणमुळात निसर्गाच्या एकरुपतेतून जी निरीक्षणे स्फुरतात ती शास्त्रीय असतात. अलिकडे 'डिस्कव्हरी' या वैज्ञानिक वाहिनीत असे अनुमान व्यक्त करण्यात आले की, पृथ्वीच्या पोटात अनेक खडक किंवा पहाड गाडलेले असतात. कालान्तराने ते सापडतात. एक कयास असा आहे की, लाखो वर्षांपूर्वी, मुळात प्रचंड आकाराचे प्राणी होते. कुठल्यातरी भौगेलिक उत्पाताने ते गाडले गेले, मृत झाले. त्यांची शरीरे ही कुठल्यातरी नैसर्गिक कारणाने काही प्रमाणात तशीच राहीली. ती विरली नाहीत. पण तीवर वातावरणाचा परिणाम झाला. मग त्यांचे टेकडीत, पहाडात किंवा खडकात परिवर्तन झाले. आजच्या युगातील ही 'डिस्कव्हरी' सांगितल्या वर, आबाजींनी केलेली दशवताराची पर्यावरण मीमांसा ही अगदीच हेटाळली जाऊ नये. आजच्या बुद्धीवादाच्या युगात ते विचार महत्वपूर्ण ठरतील. आबाजींच्या शब्दात दशावतार व पर्यावरण या संबंधीचे विचार पुढील प्रमाणे:-

पर्यावरण!म्हणजे निसर्ग वातावरणाशी जवळीक ठेवणे. निसर्ग वातावरणदूषीत होऊ न देणे. प्राचीन काळापासून हे कार्य चालू असून अनेक कालखंडात पर्यावरणासाठी प्रयत्न केले गेले.

जगाचीउत्क्रांती आजपर्यंत कशी झाली व पुढे कशी होणार याबद्दल शास्त्रज्ञांनी अनेक शोध लावून खूप प्रगती केली. त्यांचे हे शोधकार्य चालूच रहाणार आहे.

परमेश्वरानी दशावतार घेतले असे आपण म्हणतो. माझ्या मते दशावतार म्हणजे दहा युगे. एक मोठा कालखंड म्हणजेएक युग! आतापर्यंत नऊ युगे होऊन गेली आणि चालू असलेले दहावे कलीयुग आहे. १]

अनुक्रमणिका

मत्स्य २] कूर्म ३] वराह ४] नारसिंह ५] वामन ६] परशुराम ७] राम ८] कृष्ण ९] बुद्ध १०] कलंकी म्हणजे कली.

### मत्स्ययुग-मत्स्यावतार

मत्स्यावतारात पूर्ण जलचर प्राण्यांचा समावेश होतो. हे जलचर प्राणी-लहान जीव जंतु, विशाल देही आणि मध्यम आकाराचेही असतात. यांचे जीवन पाण्यातच असते. पाण्याबाहेर काढले की त्यांचे जीवन संपते. हे जलचर जास्त प्रमाणात मांसाहारी. मोठ्या जलचरांनी मध्यमांना खायचे, मध्यमांनी लहान जीव जंतु खायचे आणि पाण्यातील नैसर्गिक घटकांचा समतोल ठेवायचा. म्हणजेच पाणी पर्यावरणाचा समतोल ठेवायचा. शेवाळे, गवत व लहान मोठ्या वेली यावर जगणाऱ्यांचे प्रमाण फार अल्प. या सर्व जलचरांमध्ये जे जलचर मोठ्या संख्येने असतील किंवा जे विशेष कामगिरी करतील त्यांचे नांव म्हणजे अवतार. तो झाला मत्स्यावतार. कारण विविध आकाराचे, नानाविध रंगांचे मासे यांचे जलचरांमध्ये प्रभुत्व आहे. तेव्हा पहिला कालखंड जलचरांचा मत्स्यावताराचा होता.

### कूर्मावतार

हे प्राणी जलचर व भूचर या दोन्हीत समाविष्ट होतात. बेडूक, खेकडा, पाणसाप, मगर, पाणकुत्रा, शंख शिंपले यातील जीव, कासव अशा अनेक प्राण्यांचा यात समावेश होतो.

या प्राण्यांची अंडी किंवा पिलावळ वाळू, खडकाळ भाग, झाडेझुडपे किंवा जमीनीवर असतात. जन्म होताच किंवा अंडे फुटताच ते जीव पाण्यात किंवा बाहेर दोन्हीकडे वावरतात. बेडूक मादी आपली अंडी नराच्या पाठीवर ठेवते. खेकड्याची पिल्ले मादीच्या पाठीवरील पोटीसारख्या कप्प्यात असतात. जास्त प्रमाणात हे प्राणी मांसाहारीच असतात. यायुगात कासव हा प्राणी सर्वाधिक वैशिष्ट्यपूर्ण असल्याने या कालखंडाला ‘कूर्मावतार’ म्हटले गेले.

### वराह अवतार

वराह अवतारात, भूचर म्हणजे जमीनीवर वावरणारेच प्राणी आहेत. डुक्कर, गेंडा, हत्ती, म्हैस, रानरेडा यांना चिखलात डुंबायला आवडते. पण याच कालखंडातील गाय, गवा, सांबर, हरिण, घोडा, बकरी वगैरे प्राणी आपण होऊन पाण्यात जात नाहीत. हे सर्व प्राणी पूर्णतः शाकाहारी.

या सर्व प्राण्यांमधे त्या कालखंडात ‘वराह’ जास्त ताकदवान व वैशिष्ट्यपूर्ण प्राणी असल्याने या तिसऱ्या कालखंडाला वराह अवतार म्हटले गेले.

वराह युगातल्या प्राण्यांच्या जाती कालान्तराने नष्ट होत आहेत. याला कारण मानवजात. आता सरकारनेच या सर्व निसर्ग पर्यावरणाला पूरक असणाऱ्या प्राण्यांची, पक्ष्यांची व जलचरांची काळजी घेण्याचे

काम हाती घेतले, तरच या जाती शिल्लक रहातील. त्यांची जोपासना व वाढ करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.

प्रारंभीपृथ्वीवर जलचरांचे प्रभुत्व असल्याने पहिले युग मत्स्यावताराचे!दुसऱ्या युगात जल व भूमी या दोन्ही ठिकाणी वावरणारे प्राणी बहुसंख्येने निर्माण झाल्याने, दुसरे युग कूर्मावताराचे. तिसऱ्या युगातील भूचर प्राण्यांची संख्या व त्यांची शक्ती याचे प्राबल्य झाल्याने त्या काळखंडाला 'वराह अवतार' नांव मिळाले.

## नारसिंह अवतार

या कालखंडात वाघ, सिंह, चित्ता, लांडगा, तरस अशा हिंस्त्र प्राण्यांची संख्या वाढू लागली. हे सर्व प्राणी मांसाहारी. त्या काळातील मानव म्हणजे राक्षस कुळे. ही मांसाहारीच असल्याने फार मोठ्या प्रमाणावर या नरसिंह युगातील प्राण्यांचा संहार होऊ लागला. त्या प्राण्यांना पकडून खास शिकारखाने बांधून त्यांना बंदिस्त केले जाऊ लागले.

जंगलातील पशुपक्ष्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याचे काम या मांसाहारी प्राण्यांमुळे होत असे. तसा निसर्ग क्रमच होता.

हिरण्यकश्यपू सारखे अनेक राजे या प्राण्यांची बेसुमार हत्या करु लागले. हिरण्यकश्यपूचा एक मोठा शिकारखाना जंगला जवळ होता.तेथे विविध प्राणी पिंजऱ्यात ठेवले असत. हिरण्यकश्यपू प्रजेशीही दुष्टपणाने वागे. त्याची प्रजा, त्याचा सेवक वर्ग त्याच्या या जुलमी राजवटीलाकंटाळले होते. त्याचा पुत्र प्रल्हाद हा मात्र दयाळू-न्यायी होता. शांत वृत्तीने तो परमेश्वराची आराधना करत असे. आपल्या प्रमाणेच प्रल्हादानेही प्रजेवर जरब बसवावी असे हिरण्यकश्यपूला फार वाटे. पण प्रल्हाद दयाळू होता. त्याची ही वृत्ती मोडून काढावी म्हणून हिरण्यकश्यपूने खूप प्रयत्न केले. शेवटी एक दिवस त्याने प्रल्हादाला त्याच्या शिकारखान्यात नेले. तो प्रल्हादाला म्हणाला. "तू माझे म्हणणे ऐकत नाहीस.तेव्हा तुझा देव तुझे कसे रक्षण करतो, ते बघतोच मी."असे म्हणून तो रागारागाने एका सिहांच्या पिंजऱ्याजवळ आला.

हिरण्यकश्यपू प्रल्हादाला म्हणाला, 'या सिंहाच्या पिंजऱ्याचा हा खांब आहे, यातही तुझा देव आहे कां?' प्रल्हादाने होकार दिला. त्यावर थांब तुझा देवच बाहेर काढतो असे म्हणून क्रोधायमान झालेल्या हिरण्यकश्यपूने त्या पिंजऱ्याला लाथ मारली. तो पिंजरा साफ करण्यासाठी पिंजऱ्यावर त्यावेळी एक नोकर बसलेला होता. त्यालाही हिरण्यकश्यपूच्या जुलमी राजवटीची चीड होतीच. हिरण्यकश्यपूने पिंजऱ्यावर लाथ मारताच त्याने संधी साधून पिंजऱ्याचे दार जोरात वर खेचले. त्याबरोबर चवताळलेल्या सिंहाने हिरण्यकश्यपूवर झेप घेतली व त्याची चिरफाड केली. या कालखंडातील सिंह या प्राण्याचे हे कार्य प्रशंसनीय झाल्याने या युगाला नारसिंह अवतार म्हटल्या गेले.

अनुक्रमणिका

पुढे प्रल्हादाच्या राजवटीत, प्रमाणाबाहेर होत असलेल्या वन्य प्राण्यांच्या हत्येवर मर्यादा घातली गेली. त्यामुळे आपोआपच वन जंगलांतील प्राणीमात्रांचा समतोल राहू लागला.

**वामन अवतार**

या कालखंडापासून मानवाचे वर्चस्व प्रस्थापित होऊ लागले. बुद्धी व वाणी या दोन वरदानांमुळे मानवाने जगण्यासाठी अनेक सुखसुविधा शोधून काढल्या.

झाडाखाली, गुहेत, पोकळीत रहाणारा मानव घरांमध्ये राहू लागला. त्याचे अनुभव विश्व वाढत गेले. वणव्यातील मातीच्या गोळ्यांचे वणवा शांत झाल्यावर मजबूत व कणखर वस्तूत रुपान्तर झाले. मग त्याची गाडगी, मडकी, दगड्या तयार होऊ लागल्या. त्यावर जनावराचे कातडेबसविले की ढोल, नगारे तयार झाले. कच्चे मास वणव्यात भाजले गेल्याने ते रुचकर व खाण्यास सोपे वाटू लागल्यावर अग्नीवरील पदार्थ तयार होऊ लागले.

हळूहळू मानव जातीचे अधिपत्य आसमंतात वाढू लागले. त्याबरोबर हेवेदावे, भांडणे, जुलुम, युद्धे यातही वाढ होऊलागली.

कष्टाळू, गरीब व शांतताप्रिय सज्जनांना कोणी त्राता उरला नाही. तेव्हा त्यांच्यातील एक छोटा गट-वामन गट दुसऱ्या राज्याच्या शोधार्थ बाहेर पडला. हिंडता हिंडता सच्छील व प्रजावत्सल अशा बळीराजाच्या देशात ते आले. उदरनिर्वाहाकरिता बळीराजाकडून कांही साधन मिळविण्यासाठी गटप्रमुख वामन, राज्याच्या दरबारात आला.

बळीराजाने त्याचा आदर सत्कार केला. त्याच्या येण्याचे कारण विचारले. त्यावेळी वामनाने बळीराजाकडे तीन पावले जमीन मागितली. बळीराजाने त्याला सांगितले, “दोन पावले जमीन राज्यातील हद्दीत देतो व एक पाऊल जमीन डोंगरावरची देतो. आमच्या राज्यात बळीचा माथा या नांवाने तो डोंगर प्रसिद्ध आहे.”

आपल्याकडे आधुनिक काळात ठराविक मोजमापाच्या जमीनीला आपण एक एकर, एक गुंठा वगैरे म्हणतो. त्याप्रमाणे त्याकाळात मोठ्या भूभागाला एक पाऊल असे म्हणण्याचा प्रघात असावा.

पुढे वामन आणि गटाने अतीशय कष्ट करून ही भूमी सुपीक केली. डोंगर माथ्यावरील जमीनीवर झाडे लावून डोंगरमाथा हिरवागार केला. वनराईचे सौंदर्य वाढीस लावले. सर्व राज्यात शेतीचे अनेकविध प्रयोग

अनुक्रमणिका

करून धनधान्याची सुबत्ता निर्माण केली. वृक्षलागवडीचे महत्व सर्वसाधारण जनतेला पटवून दिले. या युगातील वामनाने हे अतीशय महत्वाचे काम केल्यामुळे त्याला ‘वामन अवतार’ म्हटले गेले.

### परशुराम अवतार

वामन अवतारानंतर बरीच वर्षे सर्वत्र शांतता व सुव्यवस्था नांदत होती. सुखासमाधानात प्रजा मग्न होती. हळूहळू या राज्यांमध्ये कुरबुरी सुरु झाल्या. आपला राज्य विस्तार करण्यासाठी दुसऱ्या राज्यावर आक्रमणे होऊ लागली. अनेक राजे प्रजेवर जुलुम जबरदस्ती करण्यात आनंद मानू लागले. अशावेळी या जुलमी क्षत्रीयांचा बिमोड करण्यासाठी परशुराम या तेजस्वी शूर युवकाने तरुणांची सैन्य पथके प्रशिक्षण देऊन तयारकेली. त्यांच्यामदतीने अनेक जुलमी क्षत्रीय राजांना सत्ताभ्रष्ट करून तेथे न्यायी व गुणी सैनिकांची नेमणूक केली. पहाता पहाता कांही वर्षातच सर्व राज्यांमधे पुन्हा स्थिरता व सुबत्ता नांदू लागली. साहजिकच अनेक ठिकाणांहून या राज्यांमध्ये आसरा घेण्यासाठी प्रजानन येऊ लागले. उद्योगधंदे वाढू लागले. निवासासाठी जागा कमी पडू लागली. प्रदुषणाचे दुष्परिणाम दिसू लागले. त्यामुळे परशुरामाने जवळच्या पश्चिमी समुद्राकडे मोर्चा वळविला. आताची जी कोकणपट्टी तिची निर्मिती करण्याचे परशुरामाचे कार्य महान होते. अतिशय निसर्गरम्य सुजल व सुफल असलेल्या कोकण भागाला सुनियोजनाने अधिकच देखणेपण लाभले. वस्तीसाठी एक मोठा प्रदेश शोधून काढला व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांवर राज्यांची धुरा सोपवून परशुराम तपश्चर्येसाठी निघून गेले.

या परशुराम सेनेनी सर्वत्र नंदनवने उभारली. दुष्ट क्षत्रीयांचे निर्दालन व कोकण पट्टीचा शोध या दोन महान कार्यामुळे या युगाला ‘परशुराम अवतार’ हे नांव प्राप्त झाले.

### श्रीराम अवतार

नारसिंह कालखंडापासून मानवाची उत्क्रांती सुरु झाली. वामन अवतारानंतरच्या परशुराम कालखंडात मानवाची सर्वांगीण उन्नती झाली. राज्याच्या बाहेर निसर्ग सान्निध्यात ऋषींचे आश्रम-गुरुकुले निर्माण झाली. शास्त्र आणि शस्त्र या दोन्ही विद्येत पारंगत करणारे अनेक ज्ञानी थोर ऋषीमुनींची परंपरा निर्माण झाली. अयोध्येचा राजा दशरथ याचे चारही पुत्र विद्या प्राप्तीसाठी आश्रमात येऊन राहिले. श्रीराम हा सर्वात ज्येष्ठ पुत्र. शस्त्र आणि शास्त्र या दोन्ही विद्या पूर्णपणे आत्मसात केल्यानंतर, कांही वर्षांनी श्रीरामांना राज्याभिषेक होण्याऐवजी वनवास स्वीकारावा लागला. रामकार्याचा इतिहास सर्वांना ज्ञात आहेच.

दक्षिण भारतातील रावणादिक राक्षसांची जुलमी राज्यसत्ता उखडून आसेतु हिमाचल शांतीचे-न्यायाचे रामराज्य सुरु झाले. या कालखंडातील हे काम करणारे श्रीराम म्हणजेच श्रीराम अवतार!

आजही ‘रामराज्य’ पुन्हा प्रस्थापित व्हावे अशी आपण प्रार्थना करतो. रामायण हा ग्रंथ आदराने पठण करतो व त्यातील व्यक्तींचे अनुकरणीय गुणांचा आदर्श समोर ठेवतो.

अनुक्रमणिका

## श्रीकृष्ण अवतार

श्रीराम व श्रीकृष्ण हे पूर्णावतार मानले जातात. या दोन्ही कालखंडातील काळ सर्वात उत्कर्षाचा व प्रगतीचा ठरला. भारतीयांना या दोन्ही कालखंडांचा पूर्ण परिचय असल्याने जास्त उल्लेख करीत नाही.

श्रीकृष्ण अवतार हा सर्व अवतारांपेक्षा थोडा निराळा आहे. लहानपणी गोकुळात राहून गांवातील मुलांना सकस व पौष्टिक आहार मिळाला पाहिजे, या हेतूने त्याने सुरु केलेल्या समाजकार्यापासून कौरव पांडव युद्धापर्यंत श्रीकृष्णाचे जीवन विविध गुणांनी परिपूर्ण झाले आहे. दुष्टांचे निर्दालन हे त्याचे मुख्य काम असले तरी श्रीकृष्णाने, राजनीती कशी असावी,राजाचे धोरण कसे असावे, परिस्थितीनुरुप राजाने लवचिकता कशी आत्मसात करावी या साऱ्या गोष्टींचा पाठ प्रत्यक्ष वागणूकीने शिकविला. आज साऱ्या विश्वात अभ्यासली जात आहे अशी'श्री गीता' या अलौकिक ग्रंथाची निर्मिती श्रीकृष्णाने केलीच, याशिवाय द्वारका नांवाच्या नगरीची नवनिर्मिती करण्याचे श्रेयही त्यालाच आहे.

श्रीकृष्णाच्या या महान कार्यामुळे 'श्रीकृष्ण अवतार' या नांवाने तो कालखंड परिचित झाला.

## बौद्ध अवतार

ज्याच्याकडे बुद्धीचातुर्य आहे असे बौद्धिक क्षेत्रातील ज्ञानी म्हणजे बुद्ध अवतार किंवा बुद्ध युग! या युगात अहिंसेची शिकवण व प्रसार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भिक्षूंचे मठ स्थापन झाले. समाजात परिवर्तन घडविण्यासाठी सामुदायीक प्रयत्न केले गेले. पराक्रम व शौर्य याला छेद देणारे एक नवीन युग म्हणजे बुद्धीयुग-बौद्धयुग! या युगात संन्यासाश्रमाला प्राधान्य दिल्याने लोकसंख्या वाढीवर आपोआप नियंत्रण आले. बुद्धाच्या या कार्याने हा कालखंड 'बौद्ध अवतार' म्हणून ओळखला गेला.

## कलीयुग

सध्याचालू असलेल्या या दहाव्या कालखंडाला कलीयुग न म्हणता 'कळीयुग' म्हणणे जास्त सयुक्तिक ठरेल. हे युग सुरु झाले आणि कळीची म्हणजे विविध प्रकारच्या बटनांची चमत्काराची मालिका निर्माण होऊ लागली. आता तर, हातात एक छोटेसे पाकीटासारखे यंत्र म्हणजे मोबाईलफोन घेऊन कुठेही जावे व कोणाशीही बोलावे अशी कळ निर्माण झाली आहे. याशिवाय अनेक कल्पनेत न येणाऱ्या या कळीच्या गोष्टी अनुभवास येत आहेत.

फार प्राचीनकाळी रामायण काळात, राम, लक्ष्मण व सीता विमानाने लंकेहून अयोध्येत परतले ही कथा कांही वर्षांपर्यंत अशक्य गोष्ट वाटत असे. पण आता त्याहीपेक्षा सुरस कळीच्या बटनाच्या चमत्कृती आपण अनुभवत आहोत.

अनुक्रमणिका

या कलीयुगाची कालमर्यादा मात्र आपणाला माहित नाही. आराम, सुखलोलुपता, व्यसने यांच्या मगर मिठीत रहायचे, असे अतिशय सुधारलेल्या या जगातील मानवाने ठरविले तर या कलीयुगाचा अंत कसा व केव्हा होईल हे सांगणे अवघड आहे. कारण पर्यावरणाचा समतोल राखणे या कलीयुगात कठीण झालेले आहे.

बुद्धी आणि वाणी या सामर्थ्यावर मानव हा सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ ठरला आहे व जगाच्या अंतापर्यंत श्रेष्ठच रहाणार आहे, हे मात्र खरे!

असा हा दहा कालखंडाचा – दशावताराचा अर्थ! पर्यावरण व दशावतार यांचा असा अतूट संबंध आहे."

श्री. आबाजींनी केलेल्या वरील विवेचनाशी मतभेद संभवू शकतात. पण तरीही एक आगळावेगळा दृष्टिकोण म्हणून तो उल्लेखनीय आहे, असे मला वाटते.

* * *

अनुक्रमणिका

## सोळा
# नर्मदा परिक्रमा मार्गक्रम

आबाजींनी केलेल्या सर्व परिक्रमात 'श्री नर्मदा परिक्रमा' अतीशय महत्वाची आणि रोमहर्षक आहे.

वास्तविक सर्वसाधारण धार्मिक परंपरेनुसार श्री नर्मदा परिक्रमा तीन वर्षे, तीन महिने आणि अठरा दिवसात म्हणजे सुमारे एक हजार बाराशे तीन दिवसात पूर्ण केली जाते. धार्मिक रुढीनुसार चातुर्मासात परिक्रमा बंद ठेवावी लागते.

आबाजींनी व्यावहारिक दृष्टीकोन स्वीकारून नर्मदा परिक्रमा प्रत्यक्षात एकशे एकोणसत्तर दिवसात (१६९ दिवस) पूर्ण केली. अमरकंटकहून दि. १३ डिसेंबर १९६९ ला त्यांनी परिक्रमेला प्रारंभ केला. दक्षिण तीराची वाटचाल त्यांनी ऐंशी दिवसात पूर्ण केली. या अवधीत ७४ गावी मुक्काम केला. दि. ३ मार्च १९७० ला हरिकाधाम येथून उत्तर तीरावरील परिक्रमेची वाटचाल सुरु करून, ८९ दिवासात, ७८ गावी मुक्काम करून ते दि. ३० मे १९७० ला अमरकंटकला परतले. संपूर्ण पदयात्रा २४७० (दोन हजार चारशे सत्तर) किलोमिटरची झाली. त्यानंतर कुमारीपूजन, नर्मदा पूजन, ओंकारेश्वर दर्शन आदी कार्यक्रम रेल्वे, बस वगैरेने करून दि. १६ जून १९७० ला खऱ्या अर्थाने त्यांची नर्मदा परिक्रमा पूर्ण झाली.

वरील कालावधित चातुर्मास येत नसल्याने यात्रा थांबण्याचा प्रश्न आला नाही. मात्र संपूर्ण परिक्रमा त्यांनी अनवाणी पायांनी केली आणि श्री नर्मदा नदी ओलांडली नाही.

सर्वसाधारण परिक्रमावासी सुमारे सत्तर मैलांची शूलपाणी जंगलातील अवघड आणि धोकादायक वाटचाल टाळून, वळसा घालणारा लांबचा मार्ग स्वीकारतात. परंतु आबाजींनी कठीण, खडतर आणि लूटमारीचा धोका असणाऱ्या शूलपाणी जंगल मार्गानी परिक्रमा केली. नागपूरहून निघण्यापूर्वी त्यांनी मुक्कामाच्या जागा साधारणपणे निश्चित करून, विशिष्ट नगरांतील टपाल कार्यालयांचीनांवे आगाऊ ठरवून, तेथे नातेवाईकांची पत्रे वा म. ऑ. मिळण्याची व्यवस्था केली. या संपूर्ण परिक्रमेची त्यांनीनियमित दैनंदिनी लिहिली.

नागपूरला परतल्यावर दि. २३ ऑक्टोबर १९७० ला महाजनचाळीतील त्यांच्या निवास स्थानच्या अंगणात प्रत्यक्षात त्यांनी केलेल्या नर्मदा परिक्रमा मार्गाची प्रतिकृती (मॉडेल) तयार केली. त्यात नर्मदेचा प्रवाह, प्रमुख मंदिरे, जंगल, आणि अन्य भौगोलिक परिस्थिती व प्रमुख नगरे त्यांच्या वैशिष्ट्यांसह दर्शविली. सुमारे आठवडाभर ही प्रतिकृती बघण्यासाठी नागपूरातील सर्व भागांमधून उत्सुक मंडळी येत होती आणि आबाजी त्यांना उत्साहाने परिक्रमेचे रसाळ वर्णन प्रात्यक्षिकासह ऐकवत होते.

### नर्मदा परिक्रमेची सर्व साधारण माहिती

अनुक्रमणिका


ॐकारेभृगु क्षेत्रे नर्मदा-ओर संगमे । सर्वत्र दुर्लभा रेवा त्रिषुस्थाने विशेषतः॥

भारतात पश्चिम वाहिनी नद्या क्वचितच. त्यामध्ये भारताच्या मध्यातून पश्चिमेकडे वाहणारी, सर्वात मोठी नदी नर्मदा होय. नर्मदेला भारताचा कंबरपट्टा असे म्हणतात. पहाड, डोंगर व पर्वत फोडूनच हिने आपला मार्ग सूकर केला. हिच्या काठी जंगल झाडी पुष्कळच आहे. तसेच शेतीप्रधान भूभागही आहे. नर्मदेच्या उगमापासून शेवटपर्यन्त कुठल्याही भागात पाणी स्वच्छ व शुद्ध तसेच आरोग्यदायीच आहे. पौराणिक काळापासून देव, ऋषी, मुनी, साधू, संत, योगी यांच्या वास्तव्याने नर्मदा किनारा अधिकच पावन झाला. अशा नर्मदेकाठी असलेल्या ॐकारेश्वराला नर्मदेचे नाभीस्थान म्हणतात.

ममलेश्वर हे महादेव मंदीर नर्मदेच्या दक्षिण तीरावरच आहे. पण असे म्हणतात की, ममलेश्वराच्या मंदीराच्या तीर्थाची नाली ही परिक्रमावासीयांनी ओलांडावयाची नसते. परिक्रमा पूर्ण झाल्यावर ॐकारेश्वरला परत येऊन ममलेश्वर व ॐकारेश्वराची पूजा व अभिषेक करावा लागतो तेव्हा परिक्रमा पूर्ण होते. म्हणून ॐकारेश्वर हे एक मोठे तीर्थ क्षेत्र समजले आहे. शिवाय विष्णूमंदीर, राममंदीर, अहिल्यादेवी होळकर यांची संस्था, देवालये, धर्मशाळा पुष्कळ आहेत. वर्षाकाठी ७ ते ९ हजार परिक्रमावासी सदावर्त घेतात, असे वही खतावणीवरुन समजते.

ॐकारेश्वरापासूनपरिक्रमा प्रारंभ करता येतो. दक्षिण तीराने गुजराथकडे जातात. ॐकारेश्वराच्यामागे (उत्तर तीरावर) चोवीस अवतारांची मंदिरे आहेत. आता सरकारनी ती आपल्या ताब्यात घेऊन त्याला कलुपेलावली आहेत. म्हणून जवळच शंकराच्या मंदिरापासून उत्तर तीराने परिक्रमेस प्रारंभ करून प्रथम अमरकंटकडे जातात. येथेच चोवीस अवताराजवळच मोठी व चांगल्यापैकी जैन मंदीरे बांधली असून धर्मशाळा व व्यवस्था चांगली आहे. हे जैनांचे मोठे तीर्थक्षेत्रे समजले जाते. ॐकारेश्वर उंचावर असून आजूबाजूला जंगल व झाडी आहे.

**अनुक्रमणिका**



**श्री. नर्मदा परिक्रमेत मे ७० मधे, जबलपूर येथील मुक्कामात श्री. जोशी व आबाजी गोखले - नातू उदय परांजपेसह**

नर्मदा नदीच्या किनारी गहू, कलिंगडाच्या बी एवढा पोपटी हिरवट हरबरा, राजगिरा, वाटाणा वगैरे पिके मोठ्या प्रमाणावर, भरघोस येतात. नर्मदा परिसराचे सृष्टीसौंदर्य उत्तम व अवर्णनीय आहे.

[हरबऱ्याचा आंबट पाला, वाटाण्याचा गुळचट पाला, तुरीचा कडसर पाला, बोरे, उंबरे, कवठे, आवळे, बेल, तुळस, औंदुंबर, चिंच यांचा पाला व फळे, प्रवास करता करता जे मिळेल ते आबाजी फस्त करीत. त्यामुळे प्रवास करताना अगदी ताजे टॉनिक मिळून प्रवास करायला ताकद येत होती. पोटाची खळगीही भरत होती.]

पर्वत, पहाड फोडून नर्मदेने युगानुयुगे वाहात राहून शूलपाणीच्या डोंगरी व जंगली भागांतून आपला मार्ग सुकर केला आहे. पण परिक्रमावासीयांना हा मार्ग पहिल्यासारखाच कठीण व दुर्गम आहे. नर्मदा किनारी खनिज संपत्ती पुष्कळ प्रमाणात आहे. शेतकी, भौगोलिक, ऐतिहासिक, पौराणिक काळ या सर्वांचा सखोल अभ्यास करण्यास नर्मदा किनारा म्हणजे एक विद्यापीठच आहे.

अनुक्रमणिका

## नर्मदा परिक्रमेचे थोडक्यात वर्णन

अमरकंटक हे स्थान समुद्र सपाटीपासून ४००० फूट उंचीवर आहे. तेथून निघून बोहरग्रामा वरुन कुकरी मठ, ग्वारीघाट, धुव्वाधार नंतर ब्राह्मणघाट नंतर होशंगाबाद, आवळीघाट, छीपानेर मार्गे हंडिया, ॐकारेश्वराची झाडी, आंबेघाट, पूनघाट, सातमात्रा येथील देवीचे देऊळ. कावेरी संगमावरून ॐकारेश्वर, ममलेश्वर ज्योतिर्लिंग, विष्णुपुरी, ब्रह्मपुरी, शिवपुरी, खेडीघाट, चंद्रशेखरानंद आश्रम, पुढे रावेरी येथील पेशव्यांची समाधी, सहस्त्र धारातीर्थ, खळघाट, ब्राह्मणगाव, राजघाट नंतर भिलखेडा, चिखलदा येथून शूलपाणी जंगल प्रारंभ, भिल्ल जमातीचे वास्तव्य, भौतीघाट, बिजासेन, हरणफॉल खाऱ्याची चौकी. बहादल नदी संगम, हपेश्वर, शूलपाणेश्वर, पांडव कालीन मंदिरे, मोक्षगंगा पिपल्लाद आश्रम, इंद्रवाणी गावातील टेंभे स्वामींची समाधी, रावेघाट, रामपुरीघाट, कुंभनाथ, हनुमंतेश्वर नरखडी घाट, शुकतीर्थ, पंचमुखी हनुमान, नंतर अंकलेश्वर, भडोच, बलबला कुंड, रुद्र कुंड, हासोटवरुन वमलेश्वर महादेव मंदीर नंतर समुद्रात नावेने ४०-४५ मैलाचा प्रवास करून उत्तर तीराला हरीकाधामला जावे लागते. नावेतूनउतरताना चिखल, वाळू, झाडे यातून प्रवास करत हरीकाधाम लक्ष्मी नारायण मंदीरात दर्शन व उत्तर तीर परिक्रमा प्रारंभ, लक्ष्मण लोटेश्वर भूतनाथ, भारभूतेश्वरी, नंतर दशानन घाटावरुन भडोच, महारुद्र तवराघाट, विस्तृत कबीर वट, अंगारेश्वरला मंगळाचे मंदीर, व पुढे कोरळतीर्थ म्हणजे तटाकीची काशी आहे. येथे खूप देवळे आहेत. येथून फत्तेपूर कोठीया मार्गाने मालसरला यावे. नंतर सिनोरचा सुंदर घाट आहे. तेथे सच्चानंद स्वामींची तपाची जागा आहे. श्री अनुसूया मातेचे स्थान, महारोग्यांचा दवाखाना आहे. पुढे जनकेश्वर, गंगनाथ पाहून चांदोदला यावे. कर्नाळीघाट, गायत्री गुंफा, तिलकवाडा नावा तयार करण्याचा कारखाना, गरुडेश्वर, टेंभे स्वामी समाधी, नारदेश्वर स्थान, शूलपाणेश्वरांचे जंगल सुरु होते.

नंतर हर्पेश्वर मंदीर, कोटेश्वराचा घाट, चिखलदा नर्मदा देवीचे मंदीर, रामेश्वर शिवलिंग, बगाड संगम, येथून पुढे काली बावडी गावापासून ६ मैलाची कठीण चढण चढल्यावर मांडवगड किल्ला, नीलकंठ मंदीर नंतर पूर्वेकडे उतरताना रेवा कुंडानंतर खाली उतरुन खळघाट, कपीलतीर्थ घाटानंतर महेश्वरला भर्तृहरीची गुंफा, मातंगेश्वर, काशी विश्वेश्वर इत्यादी सुंदर स्थाने व मोठा, मजबूत व सुरेख नर्मदा घाट, नंतर वाल्मिकीने केलेला मंडलेश्वर, सीतामाता नर्मदा मातेस भेटण्यास आली तो भाग, धावडी कुंड, येथे २६ फूट खाली नर्मदेचा धबधबा आहे. याच कुंडात अनेक जातीचे बाण व लिंगे मिळतात. हे सर्व पाहून झाल्यावर नर्मदा नाभी मंडळ सिद्धनाथ तीर्थावर यावे. देऊळ पांडवांच्या काळातील आहे.

पुढे गोनी संगम, छीपानेर संगम, गदरीया संगम, भारकच्छ वरून ब्राह्मणघाट, नंतर धुवाधार, पुढे नांदिया घाट, ग्वारीघाट, नंदिकेश्वर तीर्थ, पद्मी घाट, रामनगराघाट, मुंडा महारण्य, लिंगाघाट, चकदेही, सारंगपूर, टिकरिया गावी सुंदर राम मंदीर, पुढे कंकर असलेला मार्ग कठीण चढण, कपीलधारा ९० फूट खाली पडते, पुढे अमरकंटक परिसर, शेतकी कॉलेज, राखीव जंगल, आर्ट कॉलेज, नवीन मोठ्या इमारती व वस्ती, नर्मदा माईचे मंदीर व जुनी वस्ती, नर्मदा परिसर, वगैरे ठिकाणे असलेल्या अमरकंटकला परत येऊन परिक्रमा पूर्ण होते.

अनुक्रमणिका

आबादींनी केलेल्या परिक्रमा मार्गाचे-अमरकंटक ते अमरकंटक पर्यंतच्या सर्वसाधारण भूभागाचे घडणारे हे धावते मार्गदर्शन!

* * *

अनुक्रमणिका

# सतरा
# श्री नर्मदा परिक्रमा

श्री नर्मदा परिक्रमेचे हे यात्रावर्णन, सविस्तर तपशीलासह लिहिलेल्या आबाजींच्या दैनंदिनीवरुन, संपादित करुन, आबाजींच्या शब्दात देत आहे.

आयुष्यात एकदा तरी 'श्री नर्मदा परिक्रमा' करावी अशी ओढ खूप दिवसापासून लागली होती. पण तसा योग येईना. वयाने सहासष्टाव्या वर्षात पदार्पण केले. शरीर जरा थकायला लागले तेव्हा अधिक म्हातारपण येण्यापूर्वी श्री नर्मदा परिक्रमा पार पाडायचीच असा मी निश्चय केला. १६०० मैलांची ही अवघड परिक्रमा कशी काय पार पडेल याची आप्तेष्टांना चिंता वाटत होती. अंतर्यामी मलाही ते भय वाटत होतेच. परंतु दरवेळचा आत्मविश्वास याही वेळेस माझ्या मदतीला धावला.

## सिध्दता

श्री नर्मदा परिक्रमेला जायचेच हा पक्का निर्धार झाला त्यादृष्टीने जवळजवळ सहा महिने आधी, जून १९६९ पासून मी तयारीला लागलो. श्री नर्मदा परिक्रमायात्रेची माहिती मिळवायला सुरुवात केली. काही नर्मदा परिक्रमायात्रींची नावे कळल्यानंतर त्यांना पत्रे पाठवून माहिती देण्याची विनंती केली. त्यापैकी मंडलेश्वरचे श्री. रघुनाथ रामदासी (अण्णाजी जोशी) यांनी पत्राचे सविस्तर उत्तर पाठविले. त्यांनी स्वतः तेरा-चौदा महिन्यात नर्मदा परिक्रमा केली होती. प्रवरा संगमचे श्री. पद्‌मनाथ, सोलापूरचे पाटील या चार-पाच जणांनी मिळून चार-साडेचार महिन्यात ही परिक्रमा केली होती. गरुडेश्वरचे श्री गोविंदानंद सरस्वती, पुणे येथील श्री. राजाभाऊ फडके आदी अनेकांनी अगत्याने पत्रोत्तर देऊन सदिच्छेचे पाठबळ दिले.

नांदेड येथील निवृत्त शिक्षक श्री. मु. ना. कागलकर यांनी लिहिलेल्या 'श्री नर्मदा माहात्म्य' या पुस्तकाचा थोडासा उपयोग झाला. परंतु श्री. गो. नि. दांडेकरांचे पुस्तक पदयात्रेच्या दृष्टीने मला फारसे उपयोगी वाटले नाही. नागपूरातील केशवानंद आश्रमाचे संचालक श्री. शंकरानंद महाराज यांनी जथ्यानी (अनेक जण मिळून) तीन वर्षात परिक्रमा केल्याचे समजल्यावर त्यांच्या आश्रमात जाऊन आलो. त्यांनी अतिशय अगत्याने त्यांचे अनुभव व काही सूचना मला सांगितल्या.

## श्री. बबनराव धर्मपुरीकरांचे मार्गदर्शन

मला सर्वात जास्त मोलाची माहिती श्री.बबनराव धर्मपुरीकर, केशवनगर, नागपूर, यांच्याकडून मिळाली. वयाच्या तीस-बत्तीसाव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या इच्छेनुसार एक व स्वतःच्या इच्छेनुसार एक अशा दोन परिक्रमा अडीच वर्षात पूर्ण केल्या होत्या. माझे पत्र मिळताच श्री. बबनराव स्वतः माझे घरी आले. श्री नर्मदा परिक्रमा कोणी करणार असे त्यांनी ऐकले की, त्यांना फार आनंद होत असे, आणि त्यासाठी ते

अनुक्रमणिका

सर्वतोपरी मदत करण्यास सिद्ध असत. मलाही त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला. श्री. धर्मपुरीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार परिक्रमेचे वेळापत्रक करणे अतिशय सोपे झाले.

सर्वसाधारणपणे तीन वर्षे, तीन महिने, अठरा दिवसात नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्याचा प्रघात आहे. मी मात्र लवकरात लवकर म्हणजे सहा महिन्याच्या आत ती पूर्ण करावयाचे ठरविले होते. पावसाळा, चातुर्मास व कडक उन्हाळा यांच्या आगमनाने एखाद्या ठिकाणी बरेच दिवस रहावे लागू नये म्हणून डिसेंबर १४ ते १० जूनच्या आत यात्रा संपवायची ठरविले.

माहिती मिळविताना परिक्रमेतील अनेक नियम कळले-तीन साडेतीन वर्षात यात्रा पूर्ण करण्याचा प्रघात असल्याने यात्री अनेक नियमांचे पालन करतात. काही विशिष्ट तिथींना यात्रा न करणे, चातुर्मासामध्ये एके ठिकाणीच वास्तव्य करणे, वगैरे. मी मात्र यात्राकाळ मर्यादित ठेवल्याने तीन-चारच नियमांचे पालन करावयाचे ठरविले. (१) पादत्राणे न घालणे (२) डोक्यावर छत्री न घेणे (३) अंगाला तेल व साबण न लावणे वगैरे. त्यादृष्टीने मी अडीच-तीन महिने आधीपासूनच चष्मा, छत्री व पादत्राणाचा त्याग करुन अनवाणी चालण्याची सुरुवात केली. त्यामुळे पुढे पदयात्रेत पादत्राणांचा कधीकधी अभाव जाणवला तरीही मानसिक व शारीरिक निर्धार दृढ असल्याने माझी त्रास सहन करण्याची शक्ती वाढतच गेली.

## सहप्रवासी मिळाला

सहप्रवासी मिळाला नाही तरीही एकट्याने परिक्रमा करायची असे मी ठरविले होते. पण अचानक एके दिवशी गांधीनगर, नागपूर, येथे राहणारे श्री. सदाशिव श्रीधर तथा दादा जोशी यांनी परिक्रमा करण्याची इच्छा व्यक्त केली, त्यांनीही त्या दृष्टीने तयारी सुरू केली. सर्वांप्रमाणेच ते येणार, हे कळल्याने मलाही आनंद झाला. नाही म्हटले तरी वय झाल्याने जोडीदाराची आवश्यकता होतीच.'एक से दो भले' या न्यायाने एकमेकांच्या सहवासाने प्रवास निश्चितच कमी त्रासदायक वाटतो. तसेच अवघड समजल्या जाणाऱ्या या परिक्रमेत येणाऱ्या संकटांशी आणि परिस्थितीशी सामना करताना एकमेकांना धीर देता येतो. सहप्रवासी मिळाला या बातमीमुळे मला अधिकच उसाह येऊन माझी जोरात तयारी सुरु झाली.

परिक्रमा करताना पोशाख सुटसुटीत व यात्रेनुरुप असावा असे मला वाटत होते. लहानपणापासूनच मला रामदासी पंथाच्या भगव्या रंगाच्या पोशाखाचे विलक्षण आकर्षण होते. संसाराची जबाबदारी खांद्यावर असेपर्यन्त ही वस्त्रे परिधान करण्याचा मोह बाजूला सारला होता-पण आता परिक्रमेसाठी भगवे कपडे घालण्याचे मी ठरविले. माझी भाची सौ. मालिनी माधवी पेंडसे, धंतोली, नागपूर, हिने धोतरे, पंचा, शाल, उपरणे इत्यादी माझे कपडे भगव्या रंगाने रंगवून दिले.

थंडीपासून बचाव व्हावा म्हणून जास्त कपडे घेतले तर ओझे स्वतःलाच घ्यावे लागते. त्या दृष्टीने साधारणपणे खालील वस्तू परिक्रमा करताना घ्याव्यात असे मी ठरविले आणि त्याप्रमाणे योजना केली. एखादा गोणपाटाचा तुकडा किंवा हलकी घोंगडी, अंगावरचे दोन-दोन कपडे, एक काठी, चाकू, काटे काढण्याचा लहान चिमटा, मेणबत्ती, ॲल्युमिनिअमची हलकी दोन पातेली व झाकण्या, हलका तवा, स्वयंपाकाचा चिमटा,

अनुक्रमणिका

नर्मदा ठेवण्यास लहान बाटली, पूजा साहित्य व शिध्याकरिता तीन-चार कापडी पिशव्या. अर्थात सोयीप्रमाणे वस्तूत थोडाफार फरक होऊ शकतो. या वस्तूंमध्ये एका पाच पौंडी डालडाच्या झाकण काढलेल्या डब्याला तो हातात धरता येईल अशी तार लाऊन घ्यावी. पाणी आणण्यास बादलीसारखा किंवा काही ठेवण्यास त्याचा खूप उपयोग होतो.

## प्रवासाचा कालावधी

सर्वसाधारण श्री नर्मदा परिक्रमा ओंकारेश्वराहून सुरु करण्याची प्रथा आहे. मध्यप्रदेशातील नर्मदा व कावेरी नदी यांच्या बेटावर ओंकारेश्वर मंदिर आहे. ओं रेश्वर म्हणजे श्री नर्मदा नदीचे नाभी स्थान समजतात. परंतु १४ डिसेंबर १९६९ ला अमरकंटकपासून नर्मदा यात्रा सुरू करण्याचे आम्ही ठरविले. डिसेंबर वा जानेवारीच्या सुरुवातीस अमरकंटकपासून परिक्रमा सुरू करणे माझ्या दृष्टीने फार सोयीचे वाटले त्याची काही ठळक कारणे पुढीलप्रमाणे:-

(१) अमरकंटक हे नर्मदेचे उगम स्थान. तेव्हा उगमापासून परिक्रमा प्रारंभ व उगमावरच परिक्रमा पूर्ण हे केव्हाहि उत्तमच. त्यातून अमरकंटक हे पौराणिक काळापासून फार मोठे तीर्थक्षेत्र समजले जाते. दुसरे म्हणजे सहा महिन्यात परिक्रमा पूर्ण करणे असल्यास हा मार्ग अतिशय सोयीचा ठरतो. काही अडचणी असल्यास परिक्रमा अर्धीच राहिली तरीही नर्मदेच्या उगमापासून संगमापर्यन्तच्या सर्व भूभागाचे दर्शन होते. सर्व जिल्ह्यातील गावाची रचना, शेतीवाडी, जनतेची राहणी, रीतीरिवाज, भाषा, चालीरिती, भौगोलिक व ऐतिहासिक माहिती आदी दृष्टीने अमरकंटक ते पूर्ण गुजराथ नजरेखालून जातो. शूलपाणीसारखा अवघड व जंगली मुलुख एकदा तरी पहाण्याचा योग येतो.

(२) अमरकंटक पासून जसजसे खाली गुजराथकडे जावे तसतसे पुष्कळ नद्या, नर्मदेला मिळणाऱ्या लागतात व त्या ओलांडण्यासाठी बराच वळसा घ्यावा लागतो. जानेवारीत यात्रा सुरु केली की नद्यांना त्यावेळी फारसे पाणी नसते त्यामुळे संयोगी नद्यांना ओलांडताना पडणारा वळसा व चिखल-गोट्यातून चालण्याचे श्रम वाचतात.

(३) अमरकंटक पासून सुरुवातीच्या दोन्ही तीरावरील मध्यप्रदेशाच्या ८०-९० मैलांचा टापू मागासलेला व दुष्काळी आहे. कार्यारंभीच्या उत्साहावर यावेळी होणारी उपासमार जाणवत नाही. तसेच कोदोकुटकीचे भुसकट पसरुन त्यावर घोंगडी घालून निजले की थंडीहि जाणवत नाही. दक्षिण तीरावरील परिक्रमा संपवून उत्तर तीरावरील याच भागात आल्यानंतर यात्रा संपविण्याच्या उमेदित टापू सहजपणे जिंकू शकतो.

(४) शूलपाणीच्या जंगली मुलखाजवळ येईपर्यन्त फेब्रुवारीचा शेवट येतो. अशावेळी जवळजवळ ६०० मैलांची परिक्रमा पूर्ण झाल्याने आपण बरेच अनुभवी झालेले असतो. जंगलातील अवघड टापू व भिल्लांकडून लुटणे यामुळे सुमारे ८०-९० मैलांचा प्रवास फार जड वाटतो. पण पुढे गुजराथ यात्रींच्या स्वागताची वाट पहात

अनुक्रमणिका

असतो. गुजराथी बंधू उपजीविकेच्या वस्तू, कपडे, धान्य भरपूर देत असतात. त्यामुळे केलेले श्रम विसरून यात्री नव्या जोमाने वाटचाल करतो.

(५) गुजराथचा कडक उन्हाळा जाणवण्यापूर्वीच दक्षिण व उत्तर तीरावरील गुजराथ संपवून मध्यप्रदेशात यात्री शिरतो व उन्हाळ्याचा बराच त्रास वाचवितो.

तेव्हा ही सर्व परिस्थिती स्वतः अनुभवल्यानंतर ओंकारेश्वर किंवा ब्रह्मांडघाटहून यात्रा सुरू न करता १५ डिसेंबर १९६९ ला अमरकंटक पासून यात्रा सुरू करण्याची आमची योजना संपूर्णतः यशस्वी झाली असे म्हणावयास हरकत नाही.

अशा दृष्टीने परिक्रमेची तयारी चालू असताना नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे काही ठराविक देवदेवतांची दर्शने घेतली. साधुसंत व थोरांचे आशीर्वाद घेतच होतो. मनाचा निर्धार, आत्मबल व चिकाटी कमी पडू नये म्हणून आशीर्वादाचे खतपाणी मी सदैव मिळवतो. कोणाचा विश्वास असो वा नसो पण काही ज्योतिषांनाहि कुंडली दाखवून पुढील योग विचारले असता सर्वांनीच निश्चितीने यात्रेला जाण्याचा सल्ला मला दिला. आप्तईष्ट मंडळींच्या शुभेच्छांचे पाठबळही भरपूर होते. श्री. बबनराव धर्मपुरीकर यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे एक 'तक्ता' तयार केला. परिक्रमेची सिद्धता होत आली होती. वरून मी शांतपणा दाखवित होतो तरीही अंतर्यामी फार मोठे दडपण वाटत होते. सर्व सामुग्रीची जय्यत तयारी झाली आणि आप्त-इष्ट मंडळीकडून निरोपाचे कार्यक्रम सुरू झाले.

दि. १० डिसेंबर १९६९ ला पहाटे गणपती अथर्वशीर्ष मंडळ, गणेश टेकडी, सीताबर्डी, नागपूर, या संस्थेच्या वतीने श्री. दादा जोशी यांचे हस्ते गणेशपूजन झाले. एकवीस आवर्तने व अभिषेकानंतर मी देवतांची प्रार्थना व नर्मदेची स्तुती (काव्यात) केली. आम्ही स्वीकारलेल्या या कार्यात यश यावे म्हणून उपस्थितांनी गणेशाची प्रार्थना व शुभेच्छा व्यक्त केल्यावर हा छोटासा भावपूर्ण कार्यक्रम पूर्ण झाला. त्याच दिवशी सायंकाळी महाजनचाळवासियांच्या वतीने श्री. बापुराव वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षतेखाली दादा जोशींना व मला निरोप देण्याचा कार्यक्रम झाला.

**अमरकंटकला प्रयाण**

दि. ११ डिसेंबरला पहाटेच स्नानसंध्या आटोपून आम्ही गणपती टेकडीवर जाण्यास निघालो. आतापर्यंतच्या सर्व यात्रेत रक्षणकर्ता ठरलेल्या श्री गणेशाची पूजेतील मूर्ती बरोबर घेतली. गणपतीमंदिरात गेल्यानंतर माझ्या भगव्या पोशाखामुळे अनेकांना कुणी संतमहंतच आले आहेत असे वाटले. भगव्या पोशाखामुळे माझी सडसडीत शरीरयष्टी, भारदस्त व सतेज दिसत होती; असा अनेकांनी अभिप्राय दिला. ११ च्या सुमारास आम्ही स्थानकावर आलो. ऐनवेळी श्री अवधूत वैद्य हे पण परिक्रमेला येण्यासाठी स्टेशनवर आले. दोघांच्या जोडीला तिसरा आला; हा एक चांगला योगच वाटला. निरोप देण्यासाठी प्लॅटफॉर्मवर खूपच गर्दी झाली

अनुक्रमणिका

होती. ही गर्दी आणि दोन छायाचित्रकारांची त्यात भर हे पाहून आपण खरोखरच कुणीतरी मोठे पुढारी झाल्यासारखे वाटत होते. (सध्या तरी मोठेपण दाखविण्याची ही दोन प्रमुख लक्षणे आहेत.)

परिक्रमेतील कष्ट, अडचणी यांची सर्वांनाच कल्पना असल्याने अनेकांच्या डोळ्यात गंगा-यमुना येत होत्या. पण वरुन मात्र हसतमुख राहण्याचा प्रयत्न स्तुत्यच होता. युद्धावर निघाल्या तरी पती-पुत्र-पित्याला हसतमुखाने निरोप देण्याच्या निश्चयी तत्वज्ञानाचे संस्कार झालेले हे सगळे सगेसोयरे,यात्रेकरुंना निरोप देताना अश्रू मागे परतविण्यास बरेच यशस्वी होत होते. पाऊस व नर्मदामाई दूर असताना आमच्या डब्याजवळ मात्र मधूनच होत असलेला हा अश्रूंचा शिडकाव बघून मलाही क्षणभर भरून आले. पण निग्रहाने मन आवरुन मी 'नर्मदे हर' चा जयघोष सुरू केला. गाडीने शिट्टी दिली आणि हळूहळू सगळे मायापाश आपोआप दूर झाले. गोंदिया, डोंगरगढ व द्रुगला निरोप देण्यासाठी स्थानकावर मंडळी आलेली होती. रात्री बिलासपूरला माझे साडू श्री. क. भा. तथा आप्पा जोशी यांचे घरी आम्ही पोहोचलो. दि. १२ ला सकाळी आम्ही अमरकंटकला जाण्यासाठी निघालो. दुपारी दोनच्या सुमारास अनुपपूरपर्यंत गाडीने आल्यानंतर तेथून संध्याकाळी सातला अमरकंटकाला बसने आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी करावयाच्या नर्मदामाईच्या पूजनाची व कढईच्या कार्यक्रमाची (कुमारीकांना देण्याचे भोजन) थोडी तयारी केली. दि. १३ ला डॉ. भास्कर मोरेश्वर विद्वांस हे चौथे सहकारी आम्हाला येऊन भेटले. त्या दिवशी आम्ही चौघांनी नर्मदामाईची पूजा केली. सौ. इंदिराबाई अवधूत वैद्य यांनी नर्मदामाईची ओटी भरली व नैवेद्याचा सुग्रास स्वयंपाक केला. पाच कुमारीका व दोन बटू यांची पूजा केल्यानंतर, त्यांची जेवणं उरकली-नर्मदापरिक्रमेत कुमारीका पूजनाचे महत्व आहे. श्री. पुरुषोत्तम डेग्वेकर यांनी आम्हाला या सर्व कार्यक्रमात फारच मदत केली.

सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले पण आम्हाला नर्मदामाईंच्या मंदिरात जाता आले नाही. कारण दोन दिवसापूर्वीच माईच्या मंदिरातील मूर्तीचे सर्व दागिने चोरीला गेल्यामुळे मंदिर फक्त दुपारी अर्धा तास उघडे रहात होते. आम्ही सकाळीच परिक्रमेचा संकल्प सोडल्यामुळे आम्हाला नर्मदामाईचे दर्शन घेण्यास उत्तर तीरावर जाता आले नाही. परिक्रमेतील सोयीकरिता प्रारंभी दाखला घ्यावा लागतो. तो दाखला रामबाई धर्मशाळेतून घेतला नावे नोंदविली. संकल्पिलेल्या नर्मदा परिक्रमेचा दिवस उद्यावर येऊन ठेपला. मनावरचे दडपण थोड्या प्रमाणात वाढलेच पण माई सर्व सांभाळून घेईल, या विश्वासाने तिची प्रार्थना केली. रात्री शांतपणे झोपलो.

परिक्रमेला निघालेल्यांना 'मूर्ती' म्हणण्याचा प्रघात आहे. श्री. स. श्री. तथा दादा जोशी, नागपूर, श्री. अवधूत दत्तात्रय वैद्य वर्धा, डॉ. भास्कर मोरेश्वर विद्वांस, नागपूर आणि मी स्वतः अशा चार मूर्ती, रविवार दि. १४ डिसेंबर १९६९ ला सकाळी स्नानसंध्या आटोपून, माईला व इतर देवतांना नमस्कार करुन सकाळी आठ वाजता परिक्रमेला निघाल्या. माझ्या पायात अजिबात पादत्राण नव्हते. अनवाणी चालण्याचा मी बराच सराव केला होता. श्री. दादा जोशी यांनी प्रारंभी तरी पायात जोडा नसावा म्हणून दोन अडीच मैल अनवाणीच चालण्याचे ठरविले.

सुरवातीलाच थोडेसे अंतर जाताच रस्ता चुकलो. पण दीडेक मैलानंतर लक्षात आल्यानंतर परत योग्य मार्गाला लागलो. माईचे उगमस्थान असलेल्या 'माईका बगीया' या जंगल झाडीच्या स्थानावर आल्यावर तेथे

अनुक्रमणिका

कुंडात असलेल्या नर्मदामाईचे रोजच्या पुजेसाठी तीर्थ घेतले तिची पूजा केली, पुढे निघालो. गुलबकावलीची भरपूर झाडे असलेल्या शोणभद्रेचे उगमस्थानावर आलो तो तेथे चोरीस गेलेल्या वस्तूंचा शोध घेण्यासाठी पोलीस आणि श्वानराज आलेले होते. कुंडात दागिने असावेत या संशयाने कुंडाचे पाणी उपसणे चालू होते. माईचे दर्शनास बंदी होती त्यामुळे माझे मन जरा नाराज होते. पण मनात विचार आला की, कदाचित परिक्रमा यशस्वी करुन परत आल्यानंतर नर्मदामाई आपल्याला दर्शन देणार असेल! आपल्या श्रद्धेची, चिकाटीची आणि आत्मविश्वासाची तिला परीक्षा घ्यावयाची असेल. मनाला जरा चुचकारताच ते शांत झाले. लांबूनच माईला नमस्कार केला आणि उगमस्थानची छोटी प्रदक्षिणा पूर्ण करुन यात्रारंभ केला. श्री नर्मदा माईच्या दर्शनाशिवाय श्री नर्मदा परिक्रमेला प्रारंभ झाला. त्यावेळी मला एका गोष्टीचे स्मरण झाले. महाराष्ट्रातील पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे अतिशय आदराचे तीर्थक्षेत्र. मी पायी अनेकवेळा पंढरपूरच्या वाऱ्या केल्या. पण पंढरपूरच्या पहिल्या वारीत तेथल्या मुक्कामी मी तीन दिवस होतो. त्यावेळी रुपया-बारा आणे देऊन आत देवळात प्रवेश मिळत असतानाही मी त्या गोष्टीस तयार नव्हतो. परिणामी पांडुरंगाचे दर्शन न घडताच मी पहिली वारी पूर्ण केली. या गोष्टीचे मला तीव्रतेने स्मरण झाले.

वाटेत शंभरी गाठलेल्या आणि अनेक वेळा नर्मदा परिक्रमा केलेल्या महंत पूर्णानंदभूत (गौरीशंकर महाराजांचे शिष्य) बाबाजींचे दर्शन आणि आशीर्वाद घेतले. पुढे कबीर चबुतरा नाक्याजवळ थोडीशी विश्रांती घेऊन, चालायला सुरुवात करताक्षणी मागून 'ठैरिये, चारो मूर्ती आगे बढना नहीं', हा पोलीस जीपमधून आवाज आला. माईच्या दागिने चोरी प्रकरणातल्या नेमक्या चारच व्यक्ती पुढे चालल्या आहेत. अशी पोलिसांना सूचना मिळाली होती. आणि लगेच त्यांनी तिची अंमलबजावणी केली. पण संशयित सापडल्याचे समाधान मात्र हवालदार साहेबांना मिळाले नाही. लवकरच आम्हाला पुढे जायला मोकळीक मिळाली. आमचा मार्ग जंगलातून होता. वाटेत एका ओहळावर फलहार झाल्यानंतर आम्ही बोंदरगाव येथे पोहोचलो. एकूण त्यादिवशी बारह मैल चाल झाली.

## सर्वच परिक्रमावासी, पण अंतःस्थ विभिन्न हेतु

मी परिक्रमेला सुरुवात केली ती माझी लहानपणापासून नर्मदेची ओढ म्हणून. त्यात चित्तशुद्धी, निरनिराळे प्रदेश आणि स्वभाव ओळख वगैरे लहानसहान हेतु होतेही. अर्थात सगळे परिक्रमावासी अशा प्रसन्न मनाने परिक्रमा करीत नाहीत हे दोन-चार दिवसात माझ्या ध्यानात आले. मग निरनिराळी कारणे धरून परिक्रमेला आलेल्यांची वर्गवारी मी केली.

(१) साधुसंत, महात्मे, बैरागी ही मंडळी ध्यान धारणा, उपासना, भजनपूजन या गोष्टी प्रसन्न व शांत चित्ताने करता याव्यात व नर्मदेची सेवा करता यावी म्हणून परिक्रमेचा अवलंब करतात.

(२) संसारात असूनहि निर्हेतु व आनंदी वृत्तीने माईची सेवा व ईश चिंतन घडावे ह्या एका उद्देशाने काही परिक्रमेला निघतात.

(३) माईकी माँगनी म्हणजे बोललेला नवस पूर्ण करण्यासाठी परिक्रमेला निघणारे काही असतात.

(४) संसाराला वैतागून, भांडणतंट्याला कंटाळून किंवा स्वतःचा भांडखोर स्वभाव व त्यामुळे सर्वांनाच होणारा त्रास यामुळे त्रागा करुन निघालेले परिक्रमावासी क्वचित दिसतात.

(५) निरनिराळ्या व्याधींनी त्रस्त झालेले काही रुग्णाईत, आजाराला उतार पडावा म्हणून मोठ्या नेटाने परिक्रमेला जाणारे असतात.

(६) नोकरी-धंदा न मिळाल्याने काहीतरी विरंगुळा म्हणूनहि परिक्रमा करणारे भेटतात.

(७)उपजीविकेचे साधन व धंदा या दृष्टीने परिक्रमा करणारा एक वर्ग आहे. तो असा-मिळालेली भिक्षा किंवा सदावर्तात मिळणारे धान्य, पीठ किंवा इतर वस्तू विकून जमलेली रक्कम देशात पाठविणे परिक्रमेत पावसाळा जवळ आला की बस ने शेती करण्यास देशात जाणे. शेतीचे काम पूर्ण झाले की 'नर्मदेहर' म्हणून पुन्हा परिक्रमा चालू. अशा व्यवसायी परिक्रमा करणाऱ्यांना खडीफलटन असे म्हटले जाते. हा वर्ग बऱ्याच प्रमाणात परिक्रमेत असतो.

(८) गुन्हेगार किंवा त्याकडे कल असणाऱ्या काही व्यक्ती साधु बैराग्यांच्या आडोशाने परिक्रमा करतात. अर्थात उद्देश केवळ स्वतःचा बचाव आणि साधेल तितका स्वार्थ.

दोन्ही तीरांचा नर्मदा किनारा मिळून वर्षाकाठी सुमारे सात हजारांच्या जवळपास परिक्रमावासी असतात. यात बहुजन समाजाचाच जास्त भरणा असतो.

असे अनेक तऱ्हेचे हेतु मनाशी बाळगून परिक्रमा करणारे असतात. हे ऐकून जरा आश्चर्यच वाटेल. केवळ परमेश्वर भक्ति आणि मनाला शांती असे हेतु असणारे यात्रेकरू कमीच. पहिल्याच दिवसाच्या परिक्रमेत जे काही अनुभव आले त्यामुळे परिक्रमेची उत्कंठा वाढली आणि पुढे कसा जाणार याचा विचार करीत मी धर्मशाळेत मुक्काम केला. एकंदरीत या परिक्रमेत आपल्याला बरीच माहिती, अनुभव आणि शिकण्यासारख्या गोष्टी आढळणार हे लक्षात येऊन समाधान वाटले.

बुधवार दि. १७-१२-६९ ला सकाळी बरगाव सोडले. डॉ. विद्वांस चालताना नेहमीच मागे रहात असत. त्यांना अनेक वेळा तुम्ही मागे राहू नका अशी सूचना दिली. आपला मुक्काम कुठे असेल याची माहिती नसल्याने चुकामूक होईल. त्यामुळे शक्य तो बरोबर चालण्याचा सल्ला दिला. पण त्यांच्यात काही फरक पडला नाही. श्री. अवधूत सुद्धा मागेच रहात. पण फारसे मागे नसत. आम्ही मार्गात थांबत होतो. डॉ. विद्वांस यांचा पोशाख, सामानाची गाठोडी, लक्तरे निघालेले कपडे, टमरेल, या सर्व वस्तू अजबच होत्या. रात्री सारखी असंबद्ध बडबड, शरीराच्या विवक्षित भागाचे हाड वाजविण्याचे त्यांचे प्रकार अजबच होते. माझ्या समजूतीप्रमाणे ध्यान धारणेच्या साधनेत मार्ग चुकलेला बैरागी अशीच विद्वांस यांची स्थिती असावी.

अनुक्रमणिका

दुपारी पुढे हर्रागाव येथून पुढे जाणारा पक्का रस्ता सोडला व डावीकडील वाटेने पडखरवी खेडे व नंतर गोमती नदी पार केली. कुकरा मठाला पोहोचलो. गवत, खाचखळगे व नदी पार करेपर्यन्त संध्याकाळ झाली होती. डॉ. विद्वांस नेहमीप्रमाणेच बऱ्याच उशिराने तेथे आले. कुकरा मठाचे प्राचीन नाव कांचनापुरी. येथे सात मंदिरे व अठरा तलाव होते. आद्यशंकराचार्यांनी येथे शिवमंदिराची पुनर्स्थापना केली. नेपाळमधील राहाणारे श्री. शंकरानंदजी महाराज आज ३३ वर्षापासून या मठात असून पूजाअर्चा व देवस्थानाच्या शेत जमिनीची व्यवस्था बघतात. पूर्वी येथे एक कुत्र्याचे देऊळ होते, ते आता पडले आहे. जवळच त्याच कुत्र्याची दगडी मूर्ती नुसत्या ओट्यावर बसविलेली पाहाण्यास मिळते. या देवळाच्या दगडाचा तुकडा उगाळून लावला की वेड्या कुत्र्यांचे विष उतरते असे म्हणतात. आम्ही पण एक लहान तुकडा घेतला. रात्री मठ व देवस्थानाच्या आरतीला उपस्थित होतो. नंतर शेजारच्या एका बंदिस्त खोलीत विश्रांती घेतली.

दि. १८ ला सकाळी कुकरा मठ सोडला. बल्लारपूर गाव पुढे दिंडोरीच्या पक्क्या रस्त्यांजवळ कुडागाव येथून ११ किलोमिटर अंतरावर असलेल्या चांदरानी गावाला फाटा आहे. अडीच महिन्यांपासून बिलासपूरकडे निघालेला ३००-३५० बैलांचा तांडा मार्गात आढळला.

### नर्मदेचे प्रथम स्नान

माझ्या पायात पादत्राणे नाहीत याची जाणीव रस्त्याच्या उखडलेल्या गिट्टीवरुन होई. त्या गिट्ट्या सतत त्रास देत. दुपारी टार रोड तापलेला, आम्ही सकाळी ११ वाजता नर्मदा किनारी नर्मदा मंदिराजवळील गुजराथी धर्मशाळेत मुक्काम ठोकला. धर्मशाळेत फक्त जागाच मिळाली. परिक्रमेला प्रारंभ केला त्यानंतर प्रथमच आज नर्मदेचे स्नान घडले. श्री. भैय्यासाहेब तेलंग, नागपूर, यांनी दिलेल्या खणानारळांनी नर्मदामाईची वहात्या धारेत ओटी भरली. नारळ वाहात गेला. खण दुसऱ्या दिवसापर्यन्त दगडांजवळ होता. गावात भिक्षा मागितली. नर्मदा परिक्रमा सुरू केल्यानंतर रोज श्री नर्मदामाईची खालील स्वरिचत आरती मी म्हणत असे. आज प्रथमच झालेल्या नर्मदा स्नानानंतर आरती म्हणताना मी विशेष प्रसन्न होतो.

#### नर्मदेची आरती

जय देवी, जय देवी, जय नर्मदा माता जय रेवा माता।
तव चरणी नमितो मी, उद्धरी तू आता॥धृ॥
अमरकंटकी उगम पावसी, जल बिंदू धार।
पुढे मग नीर भरूनी तीर। सागर रुपी होण्यापूर्वी,
करिसी उद्धार, आमुचा करिसी उद्धार॥१॥
वाऱ्या करिती, तीर्थ करिती, पदयात्रा करिती,
अशी ही विविध मार्गे भक्ती । परिक्रमा ही एक
केलीया, सकल दोष हरती, पावन हो जगती॥२॥
महात्म्य वाचा, पोथ्या वाचा, रामायण वाचा।

अनुक्रमणिका

बहुवीध ग्रंथ वाचा, परिक्रमा काळात होऊ द्या
संगम हो याचा, आनंद लुटा साचा॥३॥
महामही ही भारत माता, तशीच तू माता
नर्मदे तू अमुची माता, आबा प्रार्थितो, होवो
सद्‌गुणी भारतीय जनता, भारतीय जनता॥४॥
नर्मदे हर

सकाळीच सूर्योदयी नर्मदेचे स्नानानंतर श्री. पांडुरंग गाणार यांच्याकडून शिधा मिळाला. केरळ जन्मभूमीचे स्वामी भक्तानंदजी यांचे पंक्तीचा आम्हाला लाभ झाला. भोजनात बरेच प्रकार होते. भोजन झाल्यावर स्वामींना आठवण झाली की, आज एकादशी होती व आपण भोजन केले. त्यांची एकादशी मोडल्यामुळे आम्हाला सर्वांनाच वाईट वाटले. परिक्रमा चालू असताना मी मात्र माझे सर्व उपवास बंद केले होते.

आम्ही अमरकंटक-जबलपूर मार्गाने दिंडोरीला आलो. मंडला मार्ग आक्रमावयास सुरुवात केली. दिंडोरी ते मंडला १०२ किलोमीटर अंतर आहे. ग्राम जुमनानी नंतर पुढे ईमलई छोटे गाव लागले. आम्ही प्रथम एका शाळेत मुक्कामाला उतरलो. परंतु तेथे संध्याकाळी उंदराची फारच रहदारी होती. म्हणून तेथून जरा मागे एका शेतकऱ्याच्या घराचा आश्रय घेतला. दिंडोरीला नर्मदा खडकाळ आहे.

दि. २० ला सकाळी ईमलई सोडली. नंतर छपरीग्राम येथून जवळच नर्मदेचा लहान धबधबा आहे. कचनारी गावानंतर बरंगा गाव लागले. थोडे जंगल व घाट आहे. नंतर संध्याकाळी राईला रस्त्यांवर उताऱ्याच्या आवारात एका घरी रात्रीचा मुक्काम केला. बैजनाथ प्रसाद, ब्राह्मण-ब्रम्हांड घाटचे पुजारी यांची मुक्कामी भेट झाली. संध्याकाळी खालच्या वाहत्या कुंडाचे पाणी आणले. प्रथम कोदोकुटकीचा भुसा खाली टाकला. त्यावर बिछाने पसरले. यामुळे बरीच उब आली. घराचा आश्रय होताच. पूर्ण काळोख झाला तरी अजूनही डॉ. विद्वांस मुक्कामाला आले नव्हते.

राईचा मुक्काम सोडून आम्ही तिघेच परिक्रमावासी पुढे निघालो. चौथे सहकारी डॉ. विद्वांस मागेच राहिले. हर्राग्रामनंतर राईघाट उतरताना पाऊलवाटेवर श्री. दादांचा पाय मुरगळला. लंगडतच चालावे लागले. मी अनवाणीच चालत असल्यामुळे तळपायाला फोड येऊ लागले. संध्याकाळी मुक्कामाला पायाला मेणाचे मलम व छाती बरगड्यांना एक चांगल्यापैकी मलम लावत असे. काही दिवस हात व पायमोजे वापरले. सकाळी निघतांना दादांचा पहिला, माझा दुसरा व श्री. अवधूत यांचा तिसरा नंबर लागत असे. स्वयंपाकाची बरीच माहिती तसेच स्वयंपाक करणे श्री. अवधूतांना चांगले येत होते. परिक्रमेत आमचेबरोबर असेपर्यन्त त्यांनी स्वयंपाकाचे तंत्र चांगले सांभाळले. याबाबतीत मात्र मला काहीच जमत नव्हते.

खैरीच्या मुक्कामानंतर दिठौरी गावच्या दोन वस्त्या. पुढे लगेच डाव्या बाजूला ओढ्याच्या काठाने पुढे गेले की गुप्त गंगेचा उगम आहे. हा ओढा वाहता होता. गुप्त गंगेचा उगम लहान उंचवट्यातून पाझरणाऱ्या धारांचा आहे. धारा अनेक आहेत. आम्ही येथेच स्नान केले व पूजा, जपजाप्य करण्यास जागा शोधत असता एका लहान उंबराचे रोपटे पात्रात होते. तेथेच बसून संध्या, पूजा वगैरे केली. श्री. अवधूतांना दत्तजयंतीचा

उपास असल्यामुळे औदुंबराचे दर्शन व पूजन करण्यास सांगितले. तेथेच किनारी एक मठी होती पण बाबाजी बाहेर गेले म्हणून मठीत जाता आले नाही.

दि. २३ ला बुढानेर पार करुन बिलगावचा पगदंडी मार्ग धरला. येथला पक्का रस्ता नर्मदेवरील पूलावरून पुढे गेला आहे म्हणून आम्हाला बुढानेर नदीनंतर पाऊल वाटेने पुढे जावे लागले. पुढे तीन पाऊल वाटा होत्या. अंदाजाने एक मार्ग धरला. बरेच पुढे गेलो असताना मागून एका परकऱ्या पोरीने ओरडून आम्हाला सूचना दिली की तुम्ही चुकीच्या मार्गाने जात आहात. आम्ही परत फिरलो. पण निश्चित मार्ग सांगण्यास तिथे कुणीच दिसेना. नर्मदेहरच्या मी तीन ललकाऱ्या दिल्या. लांबून गुराखी मुलांनी प्रतिसाद दिला. त्यांचेजवळ जाऊन रस्ता विचारला. एका मुलाला सोबत घेतले व पुढे निघालो. मार्गी लागल्यानंतर तो छोकरा परत गेला व आम्ही पुढे निघालो. जंगल, झाडी, खाचखळगे, काटे, लहान-मोठे ओढे पार करीत बिलगावला पोहोचलो.

आतापर्यन्तच्या परिक्रमेत येथेच भरपूर शेतीवाडी, बागबगीचे आहेत. गावकरी बरे दिसले. पण भिक्षा मिळणे जड गेले. आम्ही येथल्या महादेव मंदिरात मुक्कामाला उतरालो. मंदिरातल्या विहीरीचे पाणी खराब होते. लांबून दुसऱ्या विहीरीचे पाणी आणावे लागले. स्वयंपाक भाजीसाठी फुलकोबी व टोमॅटो मिळाले. जेवण झाले. रात्री उघड्या फरशीवर मंदिरात थंडीमुळे झोपणे जड गेले असते. जवळच्याच घरात सहा-सात स्त्री परिक्रमामूर्ती उतरल्या होत्या. तेथेच प्रथम आम्हाला जागा दिली. परंतु नंतर शेजारची एक स्वतंत्र पण अडगळीची खोली दिली गेली. बिलगावला श्री. जगन्नाथजी नावाचे सरपंच आहेत. संध्याकाळी गप्पा मारताना गावकऱ्यांनी सांगितले की. "त्या संगमावर एक रात्र तरी मुक्काम करायचा असतो. तसे काही न केल्यास काहीतरी गैरप्रकार घडतो. तुम्ही नशिबवान म्हणून थोडा रस्ता चुकलात. ज्या मुलीने तुम्हाला सूचना दिली ती माईच असावी. थोडक्यावरच भागले. तुमच्यावर माईची कृपा आहे."

दुपारची पूजा व संध्याकाळच्या आरतीला मी एक लोखंडी नळी (शंखाचे काम भागवणारी) शंखासारखी वाजवीत असे. रात्री हळू किंवा मोठ्याने पंचपदी म्हणत असे, हा नियम कटाक्षाने पाळला असे नाही. काही वेळेला कालमान परिस्थितीप्रमाणे वागावे लागत असे.

दि. २४ ला सकाळी बिलगाव सोडले. येथे वाटेत राणी दुर्गावती यांचे मोठे राजवाडे, मोठ्या इमारती व काही देवळे आहेत. आम्ही प्रथम नर्मदेवर स्नान केले. गावात भिक्षेचा व मुक्कामाचा प्रयत्न चालू असतानाच समजले की येथून जवळच श्री. नारायणराव केशवराव तांबे मालगुजार राहतात. शेते तुडवीत उन्हातून आम्ही त्यांच्या घरी आलो. तांबे त्यावेळी मजुरांकडून शेतीचे काम करुन घेत होते. त्यांनी आमचे हंसतमुखाने स्वागत केले. त्यांची जागा प्रशस्त होती. आम्ही थोडासा आराम केला. आदल्यादिवशी दत्तजयंती होती. पारण्याला अनायसे त्रयी मूर्ती ब्राह्मणांच्या भोजनाचा योग आला म्हणून तांबे ह्यांना फार आनंद वाटला.

दि. २५ ला सकाळी मधुपुरी सोडली. केव्हाही शेतातून जाताना हरबऱ्याचा आंबट पाला, वाटाण्याचा गुळचट पाला, तुरीचा कडसर पाला जे जे मिळेल ते मी खात होतो. याशिवाय औदुंबर, चिंच, बेल यांची पाने मिळाल्यास त्याचाही आस्वाद घेत होतो. तसेच उंबर, आवळा, आवळ्याचा पाला, पिकलेली बोरे यांची मेजवानी होतीच. मी खूप बोरे खात असे. थोडीशी बोरे पिशवीत साठवीत असे. बोरे खाताना दादांची थोडी

अनुक्रमणिका

बोलणीही खात होती. पण बोराबरोबर तीही पचत होती. सकाळच्या वेळी शेतातून जात असताना दंवानी कपडे व पाय भिजत असत. हातपाय गारठत असत. पण यातही काही एक और आनंद मिळे.

प्रारंभी श्री. अवधूतांची चाल कमी पडत असे. वरचेवर ते विश्रांतीसाठी थांबत असत. शेवटी त्यांना एक सूचना देणे भाग पडले की, अशा चालीने नर्मदा परिक्रमा पावसाळ्याच्या आधी पूर्ण होणार नाही. तुम्ही चाल वाढवा नाहीतर नागपूरला परत जा.

वाटेत एके ठिकाणी रस्ता चुकल्यामुळे बरीच छोटी गावे, पहाड, डोंगर, घाट चढउतार करावे लागले. पाच-सहा मैलांची चक्कर पडली व मार्गही कठीण होता.

पुढे सुरंगदेही सोडले नंतर बुजबुजियाला आलो. येथून उजव्या पगदंडीने दोन प्रवासी पुढे जात होते. आम्ही त्यांना विचारले नाही व सरळ दिसणाऱ्या फॉरेस्ट रोडने पुढे निघालो. सकाळपासून अवधूत पुढे होते. त्यांच्या मागे मी. म्हणजे पहिला नंबर ठेवणारे दादा मागे होते. पुढे घोडाडी गाव नंतर उंच डोंगरावरचा घाट, थोडे पठार पुन्हा उंच डोंगर, असे आम्ही चाललो. मध्यंतरी मार्गाबद्दल चवकशी केली असता रस्ता चुकला असे समजले. पण आता पुन्हा परत जाण्यापेक्षा पुढचे जाणे योग्य असे गावकऱ्यांनी सांगितले. शेवटी ११ च्या सुमारास घोडाडी घाट पूर्ण होऊन आम्ही पठारांवर आलो व श्री हिरालाला मुकद्दम पटेल यांचे घरी सदावर्त व शिधा घेतला.

आपल्या प्रांतात रामदासी पंथी किंवा सज्ञनगडची पालखी आली व ते समर्थसेवेकरी भिक्षेला निघाल्यावर ज्या घरी भिक्षा मिळेल त्या घरी मिळणाऱ्या भिक्षेतून एक मूठभर भिक्षा त्यांच्याच भांड्यात किंवा सूपात परत टाकतात व ते परत आलेले धान्य आपण आपल्या घरच्या धान्यात टाकतो. हा प्रघात मी पुष्कळवेळा या भागात केला. पण फायदा काहीच नाही. उलट सुपात परत केलेले थोडे धान्य ती मंडळी घेत नसत. त्यांना काही निराळाच संशय येत असे व समजूत पटत नसे. शेवटी ही भिक्षेची 'समर्थ पंथी' पद्धत मी येथेच बंद केली.

पुढे भरवरदा सोडले. संध्याकाळी बरघी गावी पोहोंचलो. त्यावेळी श्री. अवधूत यांच्याने चालणे होत नव्हते. अंगात तापही भरला होता. रस्त्यावरच्या शिवमंदिराजवळील छोट्या धर्मशाळेत सहा आणे देऊन एक खोली मिळवली. थंडीचे थोडे निवारण झाले. रात्रीचा मुक्काम येथेच करण्याचे ठरविले. आज बरघीला पोहोचणार याची कल्पना नव्हती. येथून जबलपूरला माझा भाचा चि. बाबूराव परांजपेला (काही काळ भाजप खासदार) निरोप पोहोचविण्याची आवश्यकता जाणवली. कारण श्री. अवघूत हे बरेच थकले होते. जबलपूरहून औषध योजना झाली असती. बरघी स्टेशनवरुन चि. बाबूला तारेने किंवा फोनने आम्ही येथे आल्याची खबर द्यावी म्हणून मी व दादा स्टेशनवर गेलो. पण तारांवर झाड पडल्यामुळे तार किंवा टेलिफोनचा मार्ग कुंठीत झाला होता. निरोप पोहोचू शकणार नाही या निराशेच्या मनःस्थितीत आमच्या मुक्कामाजवळ संध्याकाळी साडेसात नंतर आलो. इतक्यात बिडीच्या जाहिरातीची एक ऑटोरिक्षा दिसली, ही जबलपूरला जाईल असे मला वाटले म्हणून चवकशी केली. तो, श्री. शर्माजी बिडी एजंट यांचीच भट झाली. ते चि. बाबूला ओळखत होते. मी चि. बाबूच्या नावाने एक पत्र त्यांचे जवळ दिसे. पुढे आमचे बाबू उपाख्य बाबूराव परांजपे यांची भेट झाली.

अनुक्रमणिका

श्री. अवधूत बरेच हळू चालत त्यामुळे आम्हाला वेळोवेळी आमच्या वेगावर नियंत्रण ठेवावे लागे. मॉरबल रॉक्स मागे राहिले, नर्मदेने डावीकडे वळण घेतले. उत्तर तीरांवर भेडाघाटाची वस्ती होती. आम्ही पुढे चाललो पण श्री. अवधूतांनी किनारीच बैठक मारली. ते म्हणाले, 'माझ्याने पाच पावलेही चालवत नाही.' आता जास्त पुढे न जाता अगदी जवळचा मुक्काम गाठणे भाग होते. जवळच ५-६ घरांची कोळी जमातीची वस्ती होती. रात्री अंगणाच्या बाहेर जायचे नाही, या अटीवरच एका घरी कसातरी प्रवेश केला. हीच नर्मदा किनारी गवारीवाडी (वस्ती) आहे. येथे बोरे भरपूर होती. बहिरेपणा स्वीकारुन भरपूर बोरे खाल्ली पिशवीत भरुनही घेतली. श्री. अवधूत बरेच थकले होते. औषध योजना केली. मलमपट्टी करता त्यांना वैद्यकीय सल्ला दिला.

परिक्रमेच्या सातव्या दिवसापासून, सक्कागावापासून श्री. विद्वांस मागे राहिले होतेच.

## दुसरा साथी सुटला

श्री. अवधूतांचे पाय दुखणे, प्रकृतीमान बिघडणे यामुळे त्यांची चाल कमी होत असे. अलिकडे या त्यांच्या चालीमुळे श्री. दादा व त्यांची दिवसातून एखादे वेळी तरी वादावादी होत असे. परिक्रमेचा सूत्रधार व प्रमुख मीच होतो. म्हणून दादांनी मला यापूर्वी श्री. अवधूत यांना परत जाण्यास सांगावे, असे सुचविले होते. मी पण त्यांना काही दिवसांची सवलत दिली. पण चालण्यात काहीच प्रगती झाली नाही, म्हणून नाईलाजाने उद्या सकाळी त्यांना नागपूरला परत जाण्याचा आदेश मी द्यावा, असे आमचे रात्री ठरले. मी विमनस्क मनःस्थितीत झोपेची आराधना करीत होतो. पण निद्रादेवी पावली नाही. रात्र संपली.सूर्योदयानंतर सकाळी कटू कामगिरी करणे प्राप्त झाले.

डॉ. विद्वांसाच्या फटींगवृत्तीमुळे त्यांची साथ सुटल्याचे आम्हांला फारसे जाणवले नाही. पण अवधूत यांचा वियोग होणार याची तीव्रतेने जाणीव झाली. सकाळी रामपाऱ्यातच श्री. अवधूतांना तुम्ही नागपूरला परत जा, असे मी सांगितले, व त्यांच्याजवळील आम्हाला प्रवासात उपयोगी पडणाऱ्या वस्तू घेतल्या. वाट खर्चाकरिता त्यांना २० रुपये दिले व भेडाघाट गावाची दिशा दाखविली. निरोप घेतेवेळी आम्हाला नमस्कार करताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. त्यांना आशीर्वाद दिला व 'नर्मदेहर' म्हणून आम्ही पुढे निघालो.

आता आम्ही दोघेच परिक्रमवासी एकमेकांचे साथी होतो. सकाळी गवारी मुक्कामी अवधूतांना सोडून आम्ही पुढे निघालो. नर्मदातीरांवरचा मार्ग आज शेत जमिनीच्या उतरत्या घसरत्या मार्गाने चालणे कठीण होते. आम्ही दक्षिणीतीरावर नर्मदास्नान करुन समोर टेकडी वरील आश्रमात तेथल्या बाबाजींच्या दर्शनाकरिता गेलो. पण बाबाजी कलकत्त्याला गेले होते. पुढे मार्गक्रमणा करीत होतो. मार्ग अवघड आणि मनही अस्वस्थ! पाय आपले कार्य करीत होते. आम्ही भुरकटीयां गावी पोहोचलो. भिक्षा मागूनही खाण्यापीण्याची काहीच सोय झाली नाही. मिनतवारीने एका घरी पाणी मिळाले. जबलपूरला मिळालेल्या मिठाईचा थोडा आस्वाद घेतला पोटभर पाणी प्यायलो. पुढे निघालो, नंतर धरतीकछार गावी थोडी फार भिक्षा मिळाली.

अनुक्रमणिका

यानंतर जबलपूर-हुशंगाबाद पक्का रस्ता पार करुन आम्ही सकाळी सालीवाड्याहून वरील मार्गाने निघालो. पुढे दुपारी मालिया गावाजवळच्या पटेलांच्या वाडीत विहीरीवर स्नान, संध्या व वाडीतल्या झोपडीत स्वयंपाक भोजन केले. स्वयंपाक चालू असताना दादांच्याजवळ असलेले पंचा पूर्ण जळला. दादा मात्र त्यातून काहीही न होता सहीसलामत वाचले. वांगी, टोमॅटो व इतर काही भाज्या विकत किंवा फुकट जशा मिळतील त्या प्रमाणे घेत होतो. थोडा आराम करुन पुढे मलियागाव, उमरनदी पार करुन गोंदरयी गाव येथे एका शाळेत मुक्कामाला थांबलो.

ज्या गांवी हॉटेल असेल तेथे मी चहा, कॉफी, दूध वगैरे घेत होतो. कॉफी पानानंतर अंगाला, पायांना मलमपट्टी, मॉलीश करुन रात्री विश्रांती घेत असे.

पुढे लिंगा गाव सोडले. छोटी ब्रम्हमानला पोहोचलो. शारदा, महादेव, गणपती, नर्मदादिकांच्या मूर्ती व देवळे चांगली आहेत. आम्ही नर्मदेच्या वाळवंटात मांडवाखाली दुपारी मुक्कामाला थांबलो. येथे सदावर्ताकरिता दाखला दाखविल्यानंतर एका दुकानदाराला चिठ्ठी दिली व आम्हा परिक्रमावाल्यांना सदावर्त देण्यास सांगितले. बडी ब्रम्हान (उतर तीर) येथून बऱ्याच मूर्ती परिक्रमेला प्रारंभ करतात. येथे संक्रांतीची मोठी यात्रा भरते. यात्रा एक महिना असते. बऱ्याच लांबचे यात्रेकरु येतात. कच्चा पूल तयार झाला आहे. आम्ही दक्षिण तीरावर स्नान, संध्या, स्वयंपाक भोजन केले.

त्याचवेळी एक मजेदार दृश्य आम्हाला पाहायला मिळाले. वाळवंटात एका कुत्र्यावर ६ - ७ कुत्रे तुटुन पडले होते. तो कुत्रा कसातरी जीव घेऊन पळाला, व एकदम नर्मदेच्या पाण्यात जाऊन तोंड फिरवून उभा राहिला. बाकीच्यांना त्याच्याजवळ जाणे जड गेले. कारण सभोवार पाणी व समोरुन शत्रुला तोंड देण्याची त्याची सिद्धता. पाणी बरेच असल्यामुळे त्याचे विरोधक त्याच्या अंगावर जाऊ शकत नव्हते. थोड्या वेळाने सर्व कुत्रे परत फिरले. आलेल्या संकटाला या कुत्र्याने मोठ्या शिताफीने तोंड दिले.

या वेळेपावेतो दहा जाने. १९७० ची तारीख उजाडली. बिचवा सोडले व रिछावर येथे नर्मदा किनारी स्नान संध्या करुन राठोड समाजाकडून सदावर्त घेतले. रिछावरला शंकराने मदनास जाळले. जांबुवंताने येथेच तपश्चर्या केली अशी आख्यायिका आहे. नर्मदाकिनारी एक सुटी लहानशी महादेवाची पिंडी आहे. कितीही मोठा पूर आला तरी ही पिंडी जागेवरच असते, असे या पिंडीचे महात्म्य सांगतात. आम्ही आज रिछावर येथे लालदासजी महाराज यांच्या आश्रमात मुक्काम केला. नर्मदेचे पाणी वापरण्याकरिता बऱ्याच अवघड मार्गाने आणावे लागले.

दि. १३ ला खैराघाट, सूरेला गाव, काटी गाव, पुढे आंजन व नर्मदा संगम अशी वाटचाल सुरु झाली. आंजन नदी नर्मदेला मिळताना जवळ जवळ एक मैल पूर्वेकडे वाहात येऊन नर्मदेला मिळते. नर्मदेचा प्रवाह पश्चिमेकडे वाहतो. दृश्य मोठे मजेदार वाटले. पुढे सांडिया गाव येथे संगमाजवळ नर्मदा पात्रात 'शक्तीदेवीयज्ञ'चालू होता. आम्ही स्नान संध्या करुन यज्ञाचे दर्शन घेतले व सांडीया गावी एका मंदिरात भोजन घेतले.

अनुक्रमणिका

माछागावी कुबजा, नर्मदा संगम आहे. नर्मदा किनाऱ्यावरच्या अवघड निमुळत्या पाऊलवाटेने आम्हाला फार सावधगिरीने ते अंतर पार करावे लागले.

बनखेडी कोंडरवाडा येथील परिक्रमामार्ग आक्रमीत दि. १६ ला वृद्ध नर्मदा-बुढी नर्मदेचे पात्रास सुरवात झाली. खरी नर्मदा १ - १॥मैलावर आहे. वृद्ध नर्मदा किनाऱ्याने निघालो. मार्गात गौघाटावर तीन-चार कुंडे, महादेव मंदीर आहे. गाईला शापानंतर उःशाप मिळाला, तेव्हापासून परिक्रमेत गौघाटच्या कुंडावर परिक्रमावासीयांनी स्नान करावे, असा प्रघात आहे व तो सर्व पाळतात. आम्ही गौघाटला महादेव मंदिराजवळ दुपारी थांबलो. कुंडात स्नान केले.

आम्ही हुशंगाबादला पोहोचण्याचे ठरविले. मार्गात तहान लागली असता गावात बादलीही मिळाली नाही. तसेच पुढे निघालो. अंधार पडला. मानीखेडा गाव आले. तसेच सपाटून पुढे निघालो. पुढे टार रोड व बिजली आली. हुशंगाबाद दिसू लागले. पण गाव संपेना. नर्मदा घाट काही केल्या जवळ येईना. शेवटी चार ठिकाणी डॉ. अण्णासाहेब हर्षे यांचे घराचा पत्ता विचारत शेवटी आठ वाजल्यानंतर नर्मदेहरच्या नामोच्चारात त्यांच्या घरात प्रवेश केला. आम्ही येणार याबद्दल त्यांना अगोदरच समजले होते. रात्री कॉफी घेतली. आरती झाल्यावर समोर असलेल्या दत्तमंदिरात रात्रीचा मुक्काम ठोकला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पुन्हा नर्मदा घाटावर सर्व मंदिरांतल्या देवतांची दर्शने घेतली. घाट चांगला बांधला असून येथे नुसते बसले तरी मन प्रसन्न होते. दुपारी श्री. हर्णे यांच्याकडे जेवण झाले. संध्याकाळी घाटाजवळच दशनामी आखाडेके नागा बाबा मुक्कामाला होते. त्यांचे गुरु दादाजी बाबा, वय १७२ आहे. ते अजून हयात आहेत, त्यांचेही दर्शन झाले.

आमची यात्रा पुढे सुरु होती. एकदा एक म्हातारी परिक्रमा करणारी बाई सावकाश गतीने चालली होती. येथे न थांबता ती अगदी संथ पावलाने पुढे गेली. हरि नंद महाराजांनी येथे राहण्याचा आग्रह केला. पाऊस पडल्याने आम्ही याच जागेवर आज स्थिर होतो.

प्रवासात बऱ्याच मुक्कामी मला भजन म्हणण्यास सांगत. तेव्हा मी भजने म्हणत असे. बऱ्याच ठिकाणी मी पंचपदी म्हणण्याचा प्रघात ठेवला होता. शुकली नदी संगमानंतर कजली गावी गावाच्या बाहेर एक लहान छोटेखानी उघड्या खोलीत रात्रीचा मुक्काम केला. दिवसभर चिखलातून चालावे लागले. त्यामुळे मागे काटा फसलेल्या पायाच्या आंगठ्यात पू झाला व आंगठा रात्रभर ठणकत होता.

मैंदा गाव, भरतार, पाटखेडा, लाडवा, नागपूर असा मुक्काम करीत तवानदी नंतर निर्गुडिया गाव, खारवा गाव करीत पूर्णी गावी आलो. पूर्णी गावी राधाकृष्ण मंदीर येथील वाडीतल्या विहीरीवरील पाणी घेऊन स्नान, संध्या, स्वयंपाक वगैरे कार्यक्रम झाले. वाडीतल्या विहीरीचे पाणी चांगले "निरंजन पाणी" आहे. असे समजले निरंजन पाणी म्हणजे स्वच्छ व चांगले पाणी. पण मला मात्र पाण्याची चव खराब वाटली. जवळच अर्ध्या फर्लांगावर असलेल्या विहीरीचे पाणी आणून स्वयंपाक केला व भोजन करुनच पुढे निघालो. रात्रीचा मुक्काम चांदेल गावात केला.

अनुक्रमणिका

चांदेल गाव सोडले. पुनासा मोठे गाव आहे. पांढरट रंगाच्या दगडांचा मोठा भुईकोट किल्ला येथे आहे. तिथे चहा मिठाई खाऊन आम्ही पुढे निघालो. पुढे दोन मैलानंतर एका शेताजवळच्या वाहत्या झऱ्यावर स्नान, स्वयंपाक भोजन झाले. थोडीशी विश्रांती घेऊन जंगलमार्गे बरीच वाटचाल केल्यावर बरणीतले उरलेले पाणी फेकले. पुढे चाललो. लगेच पुढे तीन-चार वाटसरु व त्यांचेबरोबर एक लहान मुलगी दिसली. मुलीला तहान लागली होती. पण मी नुकतेच पाणी फेकले होते. वाईट वाटले पण काय करणार? पुढे 'हतिया गाव' मार्गात दोन परिक्रमावासियांची भेट झाली. थोड्या गप्पाही झाल्या. शूलपाणी जंगलाच्या आधी तेरसिंग पटेल-भिल्ल पाटील यांचेकडे सामान ठेवावे वगैरे त्यांनी माहिती दिली. आम्ही पुढे निघालो. याच विश्रांतीच्या ठिकाणी माझा चष्मा राहिला. संध्याकाळी इंधावडी गावी राम मंदिरात रात्रीच्या मुक्कामाला थांबलो. माझा चष्मा हरवला असे म्हणून चार मिनिटेही झाली नाहीत इतक्यात पुजारी महाराजांनी त्यांचेजवळचा एक जुना चष्मा मला दिला व अगत्याने म्हणाले, "आप इसका उपयोग कीजिये. और साथ ले जाईये।" दुसऱ्याला मदत करण्यासाठी काही व्यक्ती किती तत्पर असतात याचा सुंदर नमूना अनुभवण्यास मिळाला होता. रात्री चहा मिळाला. रात्री पूर्ण विश्रांती घेतली.

परिक्रमेच्या आधी अडीच महिने मी चष्मा व जोडा वापरणे सोडले होते. कारण अडीअडचणीला त्या वस्तूंवाचून अडू नये.

इंधावडी सोडली. आता लहान-मोठ्या टेकड्या, ओढे ओलांडणे, जंगल झाडी पार करणे चालू झाले. आता ॐकारेश्वरला जाणे आहे. पण योग असा की, मार्गतून काही अंतर पुढे गेले की चार-पाच पाऊलवाटा लागत असत. पण त्याचवेळी वाटसरु गुराखी, एखादी बाई यांच्याकडून आम्हांला योग्य तो मार्ग दाखविला जाई! पाऊल वाटेने टेकड्या, चढउतार असा रस्ता कापत रस्ता चालणे चालू होते. रस्ता चालत कावेरी नदी ओलांडली व पुढे गुंझारी वस्ती आली. पुढे वाटेतल्या दोन तीन मुलांनी आम्हाला ॐकारेश्वर पर्यंत मार्गदर्शन केले. त्यांना आम्ही दहा पैसे इनाम दिले. शेवटी दमून भागून आम्ही दुपारी बारा वाजता ओंकारेश्वरला पिली धर्मशाळेजवळ असलेल्या गोपीकिसन यांचे धर्मशाळेत उतरलो.

ओंकारेश्वर स्थान महत्वाचे आहे. पण आम्ही स्वतः तेथे जाऊ शकत नव्हतो. श्री ओंकारेश्वर मंदीर हे नर्मदा व कावेरी या नद्यांमधील बेटावर आहे. नर्मदा परिक्रमा करताना नर्मदा नदी ओलांडायची नाही असा नियम आहे. अर्थात ओंकारेश्वर मंदिरात महादेवाच्या पिंडीभोवती किंवा मंदिरातल्या नालीतले पाणी म्हणजे नर्मदानदीच असल्याने परिक्रमेत ओंकारेश्वर मंदिरात जाता येत नाही. मंदिरातील पिंडी भोवतीचे पाणी काढले की पुन्हा खालून वर पाणी येताना दिसते. हा आम्हा श्रद्धावानांना दैवी चमत्कारच वाटतो. (परिक्रमा पूर्ण झाल्यावर आम्ही ओंकारेश्वराचे दर्शन घेऊन आलो. तेव्हा घेतलेली अनुभूती.) श्री. भाऊ बेहेरे यांचेकडून सकाळी लौकरच महादेवाला अभिषेक करुन यथाशक्ती पूजा करुन घेतली. धर्मशाळेत परतल्यावर स्वयंपाक झाला. शिरा, दूध व दक्षिणा देऊन कुमारी पूजन केले. नंतर आम्ही भोजन केले. थोडा आराम करुन पत्रलेखन झाल्यावर सामानाची आवराआवर केली.

प्रवासात प्रचारातील काही वाक्ये ऐकायला मिळाली ती अशी :-

अनुक्रमणिका

दिन डुबते जाव - पश्चिमेला जा.

नदी नखना पडेगी - नदी ओलांडावी लागेल.

गडबार-बैलगाडीची चाकारी. (बैलगाडीचा मार्ग)

तरीतरीसे-किनाऱ्याने.

टप्पर-आसपास वस्ती नाही. एक-दोन छोटी घरे असणे या भागाला टप्पर म्हणतात.

फेब्रुवारी १ दिनांकाला चहा, कॉफी घेऊन आम्ही धर्मशाळा व्यवस्थापकांचा निरोप घेतला. आमचा परिक्रमा मार्ग धरला. नर्मदा किनार, शेतजमीन, खाचखळगे, उंच सखल प्रदेश मागे टाकीत कुरार गावी आलो. येथपर्यंत खांडवा हद्द आहे. नर्मदेच्या प्रवाहातल्या भागाला गौकुंड म्हटले आहे. कुंड बाहेर किंवा निराळे बांधलेले नाही. येथे जवळच्याच महादेव मंदिरात पडक्या धर्मशाळेत दुपारचा स्वयंपाक, पूजा, स्नानादि कार्यक्रम उरकले. थोडा आराम करुन पुढे निघालो. सोबतच्या प्रवाशांबरोबर मी पुढे गेलो. दादा मागेच राहिले. मी पुढे जाऊन थांबलो. मागाहून दादा आले. मी पुढे गेल्याबद्दल त्यांनी मला दम भरला. ऐकणे भागच होते. संध्याकाळी रावेर गावी पोहोचलो. मोठ्या जुन्या इमारती, मोठ्या वेशी व तटबंदीची पूर्ण पडझड झालेली दिसली. नर्मदेवरील घाट सुद्धा बराच खराब झालेला दिसला.

थोरले बाजीराव पेशवे महाराष्ट्रातले नावाजलेले राजकारणी, पराक्रमी सेनापती, व राज्याची धुरा ज्यांनी अनेक वर्षे सांभाळली त्यांच्या रावेर येथील समाधीची सरकारने घ्यावी तशी काळजी घेतलेली नाही. इतिहास वाचनातून व ऐकलेल्या माहितीवरुन त्या श्रीमंतांची मूर्ती कल्पनेने दृष्टीसमोर आणली व महापुरुषाच्या त्या समाधीला वंदन केले. रात्री धर्मशाळेत मुक्काम केला. अधूनमधून मला प्रवासात ताप येत असे, पण रात्री औषध घेऊन मी सकाळी पुढे निघत असे.

## नावाड्याने लुटले

दि. ३ ला सकाळी तेल्यांग सोडले. नदी किनाऱ्याने निघालो. जवळजवळ दोन मैल चालणे झाले. एका ओढ्याच्या संगमाजवळील शेतात दोन जवान नावाडी व दहा-अकरा वर्षाचा एक मुलगा बसला होता. आम्ही जवळ येताच बाबाजींनी आम्हाला येण्याबद्दल सूचना केली. आम्ही जवळ येताच 'बिडी पिओ' असे बाबाजी म्हणाला. आम्ही समजूतीच्या स्वरात यापैकी आम्ही काहीच करत नाही असे सांगितले. त्यांनी आम्हाला जाण्याची सूचना केली. आम्ही 'हरनर्मदे' म्हणालो. पुढे निघालो. थोड्या वेळातच शेकोटीजवळील एक तरुण नावाडी जलदगतीने आमच्या जवळूनच शेत तुडवीत सपाटून पुढे निघाला. त्याच्या जलद गतीने जाण्याबद्दल आम्हाला काहीच वाटले नाही. बरेच अंतर पुढे गेल्यावर तो एका शेताच्या बांधणीवर उकीडवा बसला होता. तरीही तो लघुशंकेस बसला असेल असा विचार करुन आम्ही सारख्याच गतीने चाललो होतो. त्याच्या समांतर येताच एक दगड माझ्या पायाशी येऊन पडला. आम्ही दोघे दगड कोठून आला हे पाहू लागलो, तोच तो जवान हातात एक मोठा दगड घेऊन आमच्यावर उगारत म्हणाला, "बाबाजी पैसे निकालो." आम्ही लगेच समजलो की हा लुटमारीचा खेळ आहे. आम्हाला हा प्रसंग अनपेक्षित होता. लगेचच दादांनी मनीबॅग फेकली. त्याबरोबर चष्माही फेकला गेला. पण तेवढ्याने त्याचे समाधान झाले नाही. तो पुढे म्हणाला "सब सामान निकालो."

अनुक्रमणिका

दादांनी सामानाची पिशवी, कोट व काठी त्यांच्यापुढे फेकली व म्हणाले "लेव तुमको जो कुछ लेना है वह लेव"! काठी बाजूला करुन जवानाने प्रथम मनीबॅग व पडलेले पैसे घेतले. नंतर पिशवीतली भगव्या रंगाची गरम शाल व काशिद्याची पिशवी घेऊन मी उभा होतो तेथे आला व काठी उगारुन मला म्हणाला, "बाबाजी पैसा निकालो." मी त्याला निक्षून सांगितले की, "माझ्याजवळ पैसे नाहीत. आप लोगोंसे भिक्षा मांगकर तो हम अपनी गुजरान करते है, तो पैसा कहांसे रहेंगा" असे म्हणून माझ्या गळ्यातली छोटी पिशवी हलवून दाखविली. त्यावेळी पिशवीतला चाकू बाहेर पडला. त्याने माझा चाकू, मनीबॅग व शाल, कशिद्याची पिशवी उचलली. मग मात्र मी थोडासा धाक दाखवित ओरडलो. तेव्हा तो मागे सरला. एका मिनिटात ५२-५३ रुपये, शाल, चाकू व कशिद्याची पिशवी मिळवली. एवढे होऊनही जाताना धोंडा उगारीतच तो गेला.

परंतु या प्रकाराचा माझ्या मनावर काहीच परिणाम झाला नाही. मी अगदी शांत होतो. माझा सांभाळ करणारी कोणती तरी शक्ती माझ्या पाठीशी आहे. अशी माझी ठाम समजूत होती. अलिकडे सात-आठ दिवस जिभेचे चोचले पुरवण्यावर जास्त खर्च होऊ लागला. भिक्षा व सदावर्तावर भिक्षा मागणे हा उद्देश माझ्याकडून डावलला जाऊ लागला. चोरीच्या प्रकाराने चांगलीच अद्दल घडली व पुन्हा पूर्ववत कटाक्षाने सर्व प्रकार करण्याचे ठरविले. अचानक चपराक बसतानाच शिस्तीचे पालन काटेकोरपणे सुरु झाले. हा प्रकार झाल्याने दादांच्या मनाची मात्र चलबिचल झाली. अजून शूलपाणी तर लांबच आहे. पुन्हा असा प्रकार होणार नाही कशावरुन? त्यापेक्षा परिक्रमा सोडून देण्याचे व घरी परत जाण्याचे ते बोलत होते.

आम्ही पुढचा प्रवास सुरु केला. या घटनेपासून भडोचला पोहोचेपर्यंत निष्कांचन परिस्थितीत आम्ही परिक्रमा केली. शूलपाणी जंगल पार करेपर्यंत गुजराथ मध्ये नर्मदेहर म्हणून भिक्षा मागत असताना चहा-पाण्यासाठी थोडे पैसे मागत होतो. कारण माझी मनीऑर्डर अंकलेश्वरला आली नाही. भडोचला बऱ्याच मनीऑर्डरी आल्या.

लेवागाव मागे टाकले. वेदीनदी ओलांडली. पुढे निघालो. माकडखेडा गावी आलो. चहा कॉफी घेऊन पुढे निघालो. तो प्रवास हा ऊन्हातून चालला होता. मार्गही चांगला नव्हता. नर्मदा किनारी कणेरा गावाजवळ स्नान, संध्या, जेवण करुन लगेचच पुढे निघालो. मार्गात मांडवीक ऋषींची गुंफा, मंदिर, धर्मशाळा, आश्रम वगैरे चांगली स्थाने पहावयास मिळाली. संध्याकाळच्या मुक्कामाला वडगाव येथे गावाच्या बाहेर नर्मदा किनारी असलेल्या माता मंदिरात रात्रीचा मुक्काम केला. येथून रात्री महेश्वर घाटांचे दृश्य व पात्रातले बाणेश्वर मंदीर यांचे दृश्य फारच चांगले दिसत होते.

प्रवासात लोहारा येथे नर्मदा किनारी दुपारच्या मुक्कामाला आलो. येथे एक मातारामाजी नावाने ओळखल्या जाणाऱ्या तपस्वी वृद्ध बाई आश्रमात राहतात. परिक्रमावासीय लोकांना त्यांचा आधार आहे. आम्हाला त्यांनी व त्यांचेबरोबर सेवा करणाऱ्या श्रीमती वैद्य यांनी खूप मदत केली. याच धर्मशाळेत उतरलेला पंचवीस वर्षांचा जवान रामनारायण भेटला, 'आगे शूलपाणी जंगलमेंही आपके साथ परिक्रमा करेंगे' असे तो म्हणाला. शूलपाणीसारख्या ८०-९० मैलांच्या काठीण मार्गात एका जवानाची सोबत मिळणार म्हणून आम्हाला आनंद झाला. येथे थोडे सदावर्त मिळाले. स्नान-पूजा-भोजनादि कार्यक्रम उरकून आम्ही पुढील प्रवासाला निघालो. संध्याकाळी मोहिपूरा गावी महादेव मंदिरात रात्रीच्या मुक्कामाला थांबलो.

अनुक्रमणिका

मोहिपुरा मंदीर सोडले. पुढे दतवडा गांवी चंगबाबा महाराजांच्या आश्रमात आलो. तिथे आश्रमवासीयांचा मुक्कामासाठी आग्रह झाला. पण भोजनादि कार्यक्रम करुन मग महादेव मंदीराचे दर्शनार्थ निघालो. मंदीर खूप पुरातन आहे. येथे भस्माचे खडे मिळतात. मी त्यातील दोन लहान भस्माचे खडे घेतले. त्यानंतर घोग्रानदी, पिपलेद ही गावे पार करुन बगूद गावी धर्मशाळेत मुक्काम केला.

## श्री नर्मदा देवीचे दर्शन

रविवार दि. ८ फेब्रुवारी हा माझ्या जीवनातील अतिशय भाग्याचा दिवस!

सकाळी आम्ही रामनारायणसह बगुद गावचा मुक्काम सोडला. शूलपाणी जंगलाची ख्याती ऐकली होती. आम्ही जंगलाच्या जवळ आलो होतो. पहाटेपासून माझे चित्त नेहमीपेक्षाही प्रसन्न होते. माझ्या आनंदीवृत्तीला निराळाच भाव जाणवत होता. श्री. दादा आणि रामनारायण गप्पा मारत पुढे चालले होते. मी थोडा मागे पडत होतो. रस्त्यावर खाचखळगे नव्हते. जंगलझाडीही जरा दूरच होती. लट्टा या गांवातून बायका-मुलींची नर्मदेवर ये जा चालू होती.

सकाळी नऊ साडेनऊ ची वेळ असावी. गाव मागे राहिले. मी एकटाच नामस्मरण करीत मार्गक्रमणा करत होतो. चालता चालता डाव्या बाजूकडे सहज लक्ष गेले. एक दहा-अकरा वर्षांची मुलगी एका पायाची मांडी घालून बसली होती. नाकीडोळी नीटस, गोरी व सडपातळशी, लाल किनारीचे पिवळट लुगडे नेसली होती. तिच्या डोक्यावरील टोपलीत, समोर विखुरलेल्या गोवऱ्या उचलून ती टाकीत होती. तिचा एक हात टोपली धरण्यात गुंतल्यामुळे ती एका हातानी गोवऱ्या भरण्याचे काम करत होती. मी तिच्या जवळ गेलो. गोवऱ्या भरण्यासाठी मदत करता करता तिला मी नाव विचारले. तिने "गंगा" नाव सांगितल्यावर मी म्हटले "तू नर्मदा किनाऱ्यावर रहाणारी ! नर्मदा, रेवा अशा नावाऐवजी तुझे नाव गंगा कसे ठेवले?"

त्यावर ती म्हणाली, "गंगा ही नर्मदा माईची मोठी बहीण! तिचेही नाव घेतले जावे म्हणून माझे नांव गांगा ठेवले."

त्यानंतर मी तिला पुढे येणाऱ्या शूलपाणी जंगला संबंधी विचारल्यावर ती म्हणाली, "जंगल प्रवास कठीण आहे. तुम्हाला फार कष्ट सहन करावे लागतील".

त्यावर मी तिला सांगितले की, "बरोबर आहे। पण नर्मदा परिक्रमा करताना शूलपाणी जंगलातूनच प्रवास करायचा असे ठरविले आहे. शिवाय नर्मदा माई आमच्या पाठीशी आहे, असा विश्वास आहे मला."

तशी ती हंसत म्हणाली, "बरोबर आहे. नर्मदा माई आपल्या मागे आहे. बाजूने आहे आणि आपल्या समोरही आहे."

एवढे बोलणे होईतो रानशेण्यांनी तिचे टोपले भरले. तिच्या डोक्यावर ते नीट ठेवण्यासाठी मीही हातभार लावला. ती मागे फिरली आणि मी पुढे निघालो.

खेड्यातली मुलगी असूनही बोलण्यात हुशार आणि चुणचुणीत आहे. असा विचार करत पंधरावीस पावले पुढे गेलो आणि सहज मागे पाहिले तर मुलगी दिसली नाही. जवळच्या दगडाआड असेल म्हणून मागे जाऊन पाहिले, इकडे तिकडे बघितले पण ती अदृष्य झाली होती. मग हाताला लागलेले दृष्य रुपातले शेण तरी काय आहे म्हणून मी दोन्ही हातांचा वास घेतला तर कापराचा सुगंधच आला. म्हणजे मला जणू नर्मदा माईचेच दर्शन घडले होते!

अतिशय प्रसन्नतेने मी घाईने मार्गक्रमणा करीत दादांना गाठले आणि त्यांना ही हकीकत सांगितली. ऊल्हासाने दादांच्या समोर हात केले आणि त्यांना म्हटले की, बघा तरी हाताचा वास!

तशी दादा म्हणाले, "वा! चांगला परिक्षक शोधलात. अहो, मला अत्तराचा सुवास येत नाही की, सडलेल्या वस्तूंची घाण येत नाही. कुठलाही वास मला येत नाही."

माझ्या आनंदात दादांना सहभागी करण्याचा माझा उत्साह या वाक्याने एकदम कमी झाला. पण क्षणभरातच मी परत प्रसन्नतेने वाटचाल सुरु केली. शूलपाणी जंगलातून प्रवास करण्याची मनाला वाटणारी अल्प भीतीही आता नाहीशी झाली होती. नव्या उमेदीने माझे मन आणि शरीर जंगलाकडे ओढ घेऊ लागले.

मोहीपुरा येथे बंगाली स्वामी यांनी निक्षून सांगितले होते की, तुम्ही शूलपाणी जंगलातून जाऊ नका. लांबच्या मार्गाने खानदेशात जा. शूलपाणी जंगलातून जाणे फार धोक्याचे आहे. राजघाटला येताच थोड्या विश्रांतीनंतर आम्ही भिलखेड्यांच्या मार्गाला लागलो. बडवानीच्या बाजूने जाण्याचा विषयच काढण्यास दादांना सवड मिळाली नाही. शूलपाणी जंगलातूनच जाण्याचा माझा निर्धार पक्का झाला.

राजघाटचा पूल ओलांडून नर्मदा किनाऱ्याने भिलखेड्याकडे निघालो. गंभीरता भासू लागली. सूर्य पश्चिमेकडे कलल्यामुळे अधिकच भर पडली. भिलखेडा गावात प्रवेश केला. बाजूला काही मंदिरे व सुस्थितीतल्या पुष्कळ समाध्या दिसल्या. जवळ धर्मशाळा दिसली. आम्ही गावात शिरलो. तेथल्या राममंदिरात रात्रीचा मुक्काम करावा असे सांगण्यात आले. श्रीराम मंदिरात प्रवेश केला. मंदिराचे पुजारी श्री. पुरुषोत्तमदास बैरागी यांनी आमचे स्वागत केले. तेथल्या तेरसिंग पटेल जवळ सामान ठेवायला आम्हाला काही व्यक्तींनी सांगितले होते. आम्ही आरती करुन शूलपाणी जंगलाची काल्पनिक चित्रे रंगवित झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सामानाची विभागणी केली. तेरसिंग पटेल यांच्या वाड्यात ठेवण्याचे सामान व बरोबर घ्यावयाचे सामान दोन विभाग केले. पटेलांच्या वाड्यात आम्ही तिघांनी पिशव्या ठेवल्या आणि प्रभु रामचंद्राला नमस्कार करुन मार्गस्थ झालो. पेंडरागाव, नंदगाव, पिछोडी, कठोरा, पाड्या गावांचा प्रवास करीत करीत

अनुक्रमणिका

सोंडूरगावी आलो. नैमित्तिक कार्यक्रम उरकले पुढे निघालो. मनात गंभीरता निर्माण होऊ लागली. फिरत फिरत बिजासेन गावी राधाकृष्ण मंदिरात मुक्काम केला.

## मदतगार श्री. तेरसिंग पटेल

"माझे जातभाई शूलपाणी जंगल परिक्रमावासीनां लुटतात त्यामुळे थंडीवाऱ्या करता त्यांचे अंगावर कपडा शिल्लक रहात नाही. पोटा करिता आटा शिल्ल्क नसतोच, परिक्रमावासीयांचे फार हाल होतात. हे माझ्या भिल्ल जमातीचं लुटीच काम मला पसंत नाही. पण करणार काय?," म्हणून श्री तेरसिंग पटेल म्हणतात की,"माझ्याकडे तुम्ही सामान ठेवा, रकमा ठेवा. तुम्ही परत चिखलद्याला आलांत की हे ठेवलेले सामान तुम्हाला सुखरुपपणे मिळेल याची खात्री असू द्या," आणि खरीच गोष्ट. आम्ही परत आल्यावर आमचे सामान पूर्णपणे मिळाले.

वसंत पंचमीला सकाळी निघालो. लांबून दिसणाऱ्या जांभळट निळसर डोंगरांच्या जवळ जात होतो. लहान मोठ्या टेकड्या मागे टाकल्या. सकाळी बीजासेल सोडले, बडवानी बिजासेलच्या मोटार मार्गाच्या आश्रयाने पुढे चाललो होतो. सभोवार टेकड्याच टेकड्या होत्या. आम्ही त्यांतून वळण घेत चाललो. मुरकुटा गाव लागले. या भागातही शेती आहे. पुढे निघालो. नर्मदा वळणे घेत पुढे धावते आहे. वसंत पंचमी असल्याने आंब्याचा मोहोर घेऊन तो वाहत्या प्रवाहात सोडला व मानसिक नर्मदा पूजन केले. मी बोरखेडीला थोडा आधी पोहोचलो. मास्तर साहेबांची भेट झाली. काही गरीब ग्रामस्थ माझ्याजवळ आले. व त्यांनी मोठ्या श्रद्धापूर्वक संसारातली अडचण सांगून यावर उपाय सांगा असा आग्रह धरला. माझ्या सर्व पदयात्रांमध्ये अनेक खेडूत आदीवासी मला साधु बाबा समजून नमस्कार करीत. त्यांच्या अडीअडचणी सांगत व मार्ग विचारत. मीही योग्य तो सल्ला त्यांना देऊ त्यांच्यात आत्मविश्वास व साम्प्रवृत्ती निर्माण व्हावी असा प्रयत्न करीत असे.

## अखेर भिल्लांनी लुटलेच!

मोटारच्या पण घाटी मार्गाने चढउतार करीत चाललो होतो. पण त्याकडे लक्ष नव्हते. खरं म्हणजे सकाळीच आम्ही लुटले जायचे. पण तो योग टळला असे बोरखेडीला असता गावकऱ्यांच्या बोलण्यावरुन समजले. आमच्या मार्गापासून नर्मदा किनारा थोडा बाजूला होता. किनारा येईपर्यंत लुटीची भीती नव्हती. पण तो प्रसंग एकदा येऊन त्यातून मोकळे व्हावे, असे सारखे वाटत होते. आता दुपारपासून चालताना कुणीच एकमेकांशी बोलत नव्हतो, अगदी चुपचाप चाललो होतो, चालण्याची गती चांगली होती. आम्ही नर्मदा किनाऱ्याकडे जात होतो. मासेमारीकरिता जाणाऱ्या भिल्लांची गाठ पडली. आम्ही पुढे चाललो. उतार सुरु. समोर खडकाळ नर्मदा दिसत होती. नर्मदेजवळ आलो. वाटाड्या छोकरा मागे फिरला. नर्मदेवर थोडा आराम व पाणी पिणे झाले. पुढे चाललो. खाच खळगे, मोठमोठे पाषाण, दोन्ही किनाऱ्यावरची डोंगर पहाडी, दिसत होती. उत्तर तीरावरुन 'नर्मदेहर' आवाज आला. प्रतिसाद देणे भागच पडले. 'नर्मदेहरचा' प्रतिसाद झाला. मार्गांत भिल्ल कुठे अडवतील याचा नेम नव्हता. मी डोळ्यांसमोर लुटीच्या काल्पनिक प्रसंगाच्या चलित चित्रांची मांडणी केली. "ते पहा, ते पाच सहा भिल्लांचे टोळके आम्ही दिसताच लांबून हातवारे करीत एकमेकांशी

अनुक्रमणिका

काहीतरी बोलत आहेत. त्यातला सर्वात तगडा काळाकभिन्न भिल्ल, त्याचे ते कल्ले व आक्कडबाज मिशा, उग्र चेहरा. तो साथीदारांना काही इशारा देतो आहे. धनुष्यबाण व कुऱ्हाड घेऊन सर्व सशस्त्र आहेत. एक सांकेतिक शीळ घातली गेली. लगेच हातात गोफणी घेतलेले बरेच भिल्ल दोन्ही किनाऱ्यावर दिसू लागले. कठीण प्रसंग, यांच्या तडाख्यातून आम्ही सहीसलामत सुटणार? कसे शक्य आहे? नर्मदेमाई तुच पाठीराखी आहेस. "मधेच चलित चित्र तुटले. इतक्यात पाच-पन्नास पाऊले पुढे, पाऊलवाटेत एका दरडीवर सत्य सृष्टीतला भिल्ल बसलेला दिसला. प्रौढ वयाचा, भुरकट केस. डोक्याला मुंडासे. अंगात कोपरी व खाली रुंद लंगोटी. खांद्याला तिरकमटा व हातात कुऱ्हाड. असा काळसर फाटक्या शरीराचा सडपातळ भिल्ल आमची मार्ग प्रतिक्षा करीत होता. आम्ही जवळ जाताच तो उभा राहून पुढे येऊ लागला. आम्ही त्याला मुख मुख म्हणण्यालाही अवसर दिला नाही. समोर सामान ठेवले. बाजूला उभे राहिलो. आमच्या कडून प्रतिकार होणार नाही, याचा त्याने अंदाज घेतला. तिघांचे सामान तपासले, त्याला योग्य वाटणाऱ्या वस्तूंचे गाठोडे बांधले. त्याच्या भाषेतल्या एक दोन शिव्या दिल्या. हातांतली काठी आमच्या अंगावर उगारली व उठाव सामान, निकल जाव यहांसे! असे काही तरी म्हणत तोच तेथून गेला. आम्ही उरलेल्या सामानाचे बोचके घेतले. 'नर्मदे हर' म्हणत आम्ही पुढे निघालो.

कल्पना सृष्टीतले ते भयंकर चित्र सत्य सृष्टीत सौम्य वाटले. जोपर्यंत आमच्या जवळ काही सामान शिल्लक आहे, तो पर्यंत लुटीची भीती शिल्लक आहे.

जवळ जवळ एक तास प्रवास झाला. दुसरा भिल्ल आडवा आला. त्याच्या भेटी नंतर आम्ही पुढे निघालो, तेव्हा आम्हा तिघाजवळ काय काय वस्तू शिल्लक होत्या व आम्ही कसे दिसत होतो?

... आमचा तगडा जवान रामनारायण शंकरलाल डुबे याच्या जवळ मळके व फाटके एक दोन कपडे शिल्ल्क होते. ते त्यानी दुसऱ्यांदा लुटणाऱ्या मामाला (भिल्लाना मामा म्हणण्याचा प्रघात आहे) स्वखुशीनें दिले, आता त्याचे जवळ एका हातात फडक्यात नर्मदेचे तीर्थ असलेली बाटली, नर्मदेची आरती, वगैरे स्तोत्रे छापलेली छोटी पुस्तिका व दुसऱ्या हातांत मोठी काठी आणी खाली एक लंगोटी.

श्री. दादांजवळ काय होते? नर्मदेच्या तीर्थाची बाटली, रोजनिशी, छापील नर्मदा भजनावली व स्वतःचा ओळख दाखला (फोटो सहीत) या वस्तूं तिळगुळाच्या रिकाम्या केलेल्या पिशवीत होत्या, आणि एका हातात काठी, नी फाटके गोणपाट पाठी! माझ्या जवळ काय होते? धोतर पंचा भगवे होते । नर्मदा तीर्थ देवही होते । हळद कुंकु डबीत होते । पाठी कांबळे रंग काळा । हाती काठी आणि भोपळा ।

आम्ही पुढे निघालो तो पहिला वाटाड्या छोकरा आमच्या भेटीला आला व आम्हाला दिगंबर स्थितीत पाहून मागे पसार झाला.

**अवघड शूलपाणी जंगल**

अनुक्रमणिका

राजघाटानंतर दक्षिण तीराने पुढे गेल्यावर देवगंगा-नर्मदा संगमा जवळ शूलपाणेश्वर महादेव मंदिर आहे. पुढे गुजराथ राज्याच्या सरहद्दीवरही एक मंदिर आहे. या मंदिराची व्यवस्था राज्यसरकार पाहते. या मंदिराच्या दुतर्फा पसरलेल्या ८०-९० मैलाच्या जंगल-झाडीस 'शूलपाणीचे जंगल' म्हणतात.

युगानुयुगे सातत्याने वाहणाऱ्या नर्मदेने डोंगर पहाड फोडून आपला मार्ग सुकर केला आहे. अलिकडे जंगलतोडीमुळे हिंस्त्र श्वापदे, पशू, पक्षी, छोटे साप वगैरेंचे प्रमाण बरेच कमी झालेले दिसते. भिल्ल जमातीची छोट्या गावातून वस्ती दिसते. सरकारी यंत्रणेने शूलपाणी जंगलात व जंगलाच्या आसपास रस्ते तयार करुन उद्योगधंदे, कारखाने व वसाहती निर्माण केल्या असल्या तरी हा भाग मागासलेलाच आहे.

भुसभुशीत वाळू, तापलेली वाळू, चिखल काटे, मोठाले गोटे, धारदार दगड धोंडे, गवताळ भाग, खाचखळगे, चढउतार, वळणे, तुटलेले कडे छोट्या-छोट्या नद्या, अशा अवघड परिस्थितीत मार्ग आक्रमीत करावा लागतो. पाळीव गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या यांचे कळप दिसतात. परिक्रमेत हिंस्त्र पशू दिसतात असे ऐकीवात होते. पण संपूर्ण परीक्रमेत वाघ, चित्ता, लांडगा, अस्वल, तरस, रानडूक्कर, सुसर, मगर, साप, अजगर वगैरे काहीच दृष्टीस पडले नाही!

### भिल्ल जमात

'आम्ही नर्मदा पुत्र आहोत', असे या भिल्लांचे म्हणणे आहे. नर्मदेला आम्ही माई म्हणतो. मग भिल्लांना मामा व भिल्लीणीला मामी म्हणण्याचा प्रघात कसा पडला तेच समंजत नाही.

ज्या किनाऱ्यावर ते राहतात, त्याच्या विरुद्ध किनाऱ्यावर जाऊन तेथील परिक्रमावासियांना हे भिल्ल लुटतात. पण स्वतःच्या किनाऱ्यावर असलेल्या परिक्रमावासियांना मात्र ते पाहुणे समजतात. व त्यांना गरज लागेल त्या वस्तू देतात.

ही जमात काही ना काही उद्योग करुन आपली गुजराण करीत असते. विड्या वळणे, दोऱ्या वळणे, मासेमारीकरता जाळी करणे, शेती गाई-म्हशी-शेळ्या-मेंढ्या पाळणे, शिकार करणे, मासे पकडणे, हातभट्टीची दारु काढणे, नर्मदा पात्रातून जाण्याकरिता लहान होडगी करणे, धनुष्यबाण, बाणाचे पाते तयार करणे वगैरे लघुउद्योगात ते गुंतलेले असतात. भिल्लीणीही कामगिरी करीतच असतात.

लुटारु भिल्ल एकट्याने वाटसरुंना लुटत असतो. प्रतिकार करणे अशावेळी योग्य नसते. कारण त्याच्या आवाजाने आजूबाजूचे भिल्ल आपणावर दगड व बाण मारतात. त्यांच्या झोपडीतला संसार गरिबीचा, गाडगी-मडकी, डबडी व क्वचित एखाद दुसरी थाळी व घागर एवढाच असतो. अंगावर कपडे कमीच. भिल्लीणीच्या अंगावर एखादे लुगडे व भिल्लाच्या डोक्याला मुंडासे व कमरेला मोठी रुंद लंगोटी !

### भौगोलिक रचना

अनुक्रमणिका

मध्यप्रदेशचा काही भाग, महाराष्ट्राच्या सरहद्दीवरील चाळीसपंचेचाळीस मैलांची चिंचोळी पट्टी व गुजराथचा काही भाग असे तिन्ही राज्याच्या सरहद्दीवरचे जंगल म्हणजेच शूलपाणीचे जंगल.

शूलपाणीच्या जंगलात भिल्लांची काही गावे टेकड्यांवर किंवा टेकड्यांच्या पलीकडे वळणावर असतात.

आम्ही घोंगसा गाव सोडले. नंतर तोरखेडी, पुढे करईगाव प्रवास करत नर्मदा किनारी स्वयंपाक व भोजन करुन रात्रीचे मुक्कामाला भिल्लांची टापरी व शेकोटीचा आश्रय घेतला.

त्या दिवशी माझ्या वडिलांची श्राद्धतिथी. नुसती दक्षिणा देऊ म्हटले तरी कनवठीला एक पैसाही नव्हता. आम्ही दिवसभर उपाशीच होतो. संध्याकाळी भोजन म्हणून दोन-दोन गाकर खाल्ले आणि ईश्वराचे चिंतनात घोंगडीच्या आधारे झोपलो.

दि. १२ ला आर्दोचा मुक्काम सोडला. उदयी नदीवर स्नान-संध्या-पूजा आदी कार्यक्रम उरकून एक-एक गाकर खाल्ला. पुढे लगेच बुछागाव येथे निघालो.

रथसप्तमी हा नर्मदा माईचा जन्म दिवस. त्या दिवशी नर्मदा किनाऱ्यावरील गावोगावी नर्मदा भक्त आपल्या शक्ती व ऐपती प्रमाणे पूजा करतात. आम्ही ९-२-७० लाच शूलपाणीत प्रवेश केला. शूलपाणी जंगलात होतो तोपर्यंत, पूजेत हळद, कुंकु,कापूर, फुले, नैवेद्य यापैकी काहीच शक्य नव्हते. मानसिक दृष्ट्या आमचा नैवेद्य चालू होता. देवता ते गोड मानत होत्या.

बुछागाव व नदी नंतर प्रवास करुन आम्ही संध्याकाळी रहाना जुगाणा गावी रात्रीचे मुक्कामाला थांबलो. भिक्षा मागितली. लाकूड फाटा जमविला. भांडी जमवून स्वयंपाक केला, भोजन झाले.

झाकणी किंवा तवा काहीच जवळ नसल्यामुळे किनाऱ्याजवळील खोलगट दगडांवर पीठ भिजवून हातावरच गाकर करणे व विस्तवावर शेकणे असा आमचा स्वयंपाक होत असे.

रात्री जुगाणा येथे माईची प्रार्थना करुन झोपलो.

## पुढचा प्रवास

फेब्रुवारीच्या मध्यात जुगाणा सोडले. चार दिवसापासून दीडदोन गाकरांवर सगळा दिवस काढावा लागत असल्याने पुढे पाऊल टाकणेही जड जात होते. तशात काही ठिकाणी मार्ग अतिशय अरुंद होता, परंतु हपेश्वर मंदिर आल्यावर पोटभर खायला मिळेल या आशेवर मार्ग चालत होतो.

अनुक्रमणिका

पेंडरा मुक्कामी पोहोचताच उत्तर तीरावरील हपेश्वर मंदिराचे व्यवस्थापक, नावेतून यात्रेकरुंच्या संख्येप्रमाणे शिधा पाठवितात असे समजले. आम्ही नर्मदेच्या किनाऱ्यावर जाऊन मोठ्याने नर्मदेहरचा आवाज देऊन तीन मूर्ती आहोत असे सांगितले. सुमारे एक तासानंतर नावाड्याने शिधा आणून दिला पण तो फारच अपूरा होता. नावाड्याला आम्ही तिघेजण आहोत, असे समजल्यावर त्याने परत जाऊन भरपूर शिधा आणून दिला. चार-पाच दिवसांनी भरपूर आणि व्यवस्थित जेवायला मिळाले. शूलपाणी जंगलाचा जवळ-जवळ पस्तीस मैलांचा प्रवास शिल्लक होता.

आमचा सहप्रवासी रामनारायण याला शेकोटी पेटविण्यात खूप गंमत वाटत असे. परंतु शेकोटीची तेवढी खूप गरजही नव्हती. त्याला आम्ही खूप समजाविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काही उपयोग झाला नाही. रामनारायणनी आम्हाला भांडखोर ठरविले. एकटाच निघून गेला. भिल्लांच्या झोपडीची उंची अगदी कमी व वरती गवत असे. शेकोटीमुळे झोपडीवरील गवत पेटण्याची शक्यता असल्याने आम्ही रामनारायणला शेकोटीसाठी मना करीत होतो.

दुसऱ्या दिवशी मी सकाळी आणलेली थाळी पेंडरा गावी पोहोचविली व आम्ही दोघे - मी व दादा निघालो. दादा पुढे व मी मागे अशी मार्ग आक्रमणा चालली होती.

हपेश्वरापासून पुढचे ३५ मैलांचे, जंगल चालण्याकरिता अत्यंत अवघड आहे. आतापर्यंत आलेला मार्ग चांगला होता असे वाटले. परंतु मागे फिरणे नाही आणि थांबणे योग्य नाही. आम्ही पुढे निघालो. वाटेत भेटणाऱ्या भिल्लांना विचारले तेव्हा, येथून शूलपाणी १४ कोस असल्याचे समजले. परवा संध्याकाळी पोहोचाल असे सांगितले गेले.

भिल्लांची वस्ती शोधून भिक्षा घेत पुढे निघालो. दुपारी स्नान पूजा, भोजनादि कार्यक्रम लवकर उरकला. संध्याकाळची प्रार्थना व आरती केली. शूलपाणी जंगलाच्या प्रवासाबद्दल चौकशी केली व त्या मुखडी गावी भिल्लाच्या गावीच मुक्काम केला.

प्रथम झोप शांत लागली पण उत्तररात्री 'नर्मदेहरच्या' आवाजाने मला जाग आली. एक म्हातारा भिल्ल हातात काटकी घेऊन आकाश व आमच्याकडे पहात काहीतरी पुटपुटत होता. ही क्रिया थोडा वेळ पाहिली. व मोठ्याने 'नर्मदेहर' असे म्हणालो. त्याच्या साधनेत व्यत्यय आला असावा. तो म्हातारा नाराजीच्या स्वरांत 'नर्मदेहर' म्हणत निघून गेला. त्याची चाहूल परत लागली नाही. मी मंद झालेली आगटी प्रज्वलीत केली व पुन्हा झोपलो.

मुखडी गाव सोडले. पुढे देणी गाव, ब्राह्मण गाव या ठिकाणी भिक्षा मागितली. परिक्रमाचा या पुढील मार्ग खडतर आहे, याची जाणीव वेळोवेळी होत होती. परिक्रमेला निघण्यापूर्वीच या सर्व अडचणी जमेस धरुनच पाऊल टाकले होते. त्यामुळे नर्मदा माई आम्हाला सहनशक्ती व बळ देईल यावर आमचा विश्वास होता.

अनुक्रमणिका

संध्याकाळपर्यंत शूलपाणी महादेवाचे दर्शन घ्यायचे, याच हट्टाने चाललो. वाटेत एक माथूर राजपूत नावाची व्यक्ती आम्हाला भेटली. तिचाही मार्ग तोच होता. आम्ही वाटेत भिक्षा मागितली. पोटपूजा केली व मार्ग चालत होतो. दोन्ही तीरावर ताड-माडांचे वृक्ष होते. कोकणी देखावा दिसू लागला. पुढे गुजराथ राज्याचे अरण्याधिपती शूलपाणेश्वर मंदीर आहे. ते आम्ही बघितले. त्या ठिकाणी आम्ही मुक्कामाला उतरलो. त्यावेळी दुपारी तीन ची वेळ होती. जया एकादशीच्या मुहूर्तावर शूलपाणी जंगल पार करण्यात आम्ही यश मिळविले होते. आमच्या अगोदर वादविवाद घालून जाणारा रामनारायण चार तासानंतर आला. त्याने उशीरा येण्याची कारणे सांगितली. आम्ही त्यावर काही बोललो नाही. ससा व कासवाच्या गोष्टीची मला आठवण झाली. मी त्याची चौकशी केली पण दादांनी त्याच्याशी काहीच बोलणे केले नाही. तरुण रामनारायणवर आम्ही मात केली होती एवढे मात्र खरे! मंदिराजवळ येताच श्री. दादांना मी कडकडून मिठी मारली. दोघांनाही कठीण मार्गातली परिक्रमा पूर्ण केल्याचा आनंद झाला होता. दोन दिवसात सत्तावीस मैलाची चाल झाली होती !

शूलपाणेश्वराहून निघालो. प्रवास गोरागाव धरण योजनेच्या भागातून सुरु झाला. जंगल संपले तरी रस्ता अजूनही जरा अवघडच होता. धरण योजना तयार होत असल्याची चिन्हे म्हणजे, नर्मदेच्या परिसरात ठिकठिकाणी पांढऱ्या पट्ट्यांची आखणी केलेली दिसत होती. वाट चालता-चालता मध्येच आम्ही रस्ता चुकलो. पण शेवटी वळसा घालून गोराग्रामला येऊन पोहोचलो. दुसऱ्या दिवशी आम्हाला वसंतपूरा गावी भरपूर शिधा मिळाला. बऱ्याच दिवसांनतर आम्ही भरपूर भोजन घेतले.

दि. १७ ला शूलपाणी जंगल पार करण्यात यश मिळाले. शूलपाणी जंगलाचा प्रवास कसा कठीण मार्गाने करावा लागतो, अपघात कसे घडतात वगैरे सूचना परिक्रमा करणाऱ्या व्यक्तींकडून व स्थानिक लोकांकडून ऐकायला मिळाल्या. या सर्व संकटांना तोंड देत आम्ही रामपूरी घाटाजवळील मंदिरात मुक्कामाला आलो. चहा घेऊन मुक्काम केला.

दि. १८ ला रामपूरी घाट सोडले. मांगरोल येथे महादेव मंदिरात शिध्याऐवजी आठ आणे मिळाले. नंतर पैसे, शिधा, चहा, वस्त्र, भांडी, लाकूड फाटा हे सर्व प्रवासभर मिळतच गेले. संध्याकाळी आम्ही कुंभेश्वरला आल्यावर आम्हाला विश्रांती साठी जागा मिळावी म्हणून तेथील एका महंताना विनंती केली. प्रथम एक बकऱ्यांच्या घाणीने भरलेली जागा दाखविण्यात आली. त्यानंतर आम्ही महंतांना पुन्हा चांगली जागा मिळावी म्हणून विनंती केली. त्यावेळी त्यांनी आम्हाला एक गुंफा दाखविली. गुंफेची थोडीफार साफसफाई करुन आम्ही झोपी गेलो.

सकाळी एकाएकी दादा जोशी यांच्या व माझ्या अंगालाही खाज सुटु लागली. सर्वत्र लाल फोड आले. त्याचा त्रास खूपच झाला. मलम वगैरे लावून ते बरे झाले. अशी होती आमची विश्रांतीची गुंफा!

दि. १९ ला कुंभेश्वरहून हनुमंतेश्वरला जाण्यास निघालो. वाटेत येणारे नाले-खोरे चढत उतरत, हनुमानासारख्या उड्या मारत तेथे पोचलो. हनुमंतेश्वर म्हणजे महादेव. हे मंदिर मोठे आहे. तेथे यज्ञाची तयारी चालू होती. तेथेच गावातून भिक्षा आणून आम्ही स्वयंपाक-भोजन केले. गेले दोन दिवसांपासून मला फार अशक्तपणा जाणवत होता. त्यात तळपायांच्या भेगांचे रुपांतर जखमात झालेले. चालताना बोट व जखमा

दुखत, पण सांगणार कुणाला! तसेच चालत निघालो. नर्मदा किनारी नरखेडी गावाजवळ नावेतून उंटांना पैलतीरी नेण्याची जरा वेळ गंमत पाहिली. नावेत उंटांना चढणे जमत नव्हते, त्यामुळे मानव व उंट दोघांचीही तारांबळ उडत होती. सायंकाळी सुखदेव गावी पोहोचलो. तेथे गायकवाड सरकारच्या मालकीचे श्री सुखदेव (महादेवाचे नाव) मंदिर खूप मोठे आहे. पण तेथील व्यवस्थापक श्री. देशपांडे नुसतेच गोडबोले होते. रात्री मुक्कामाला चांगली जागा असूनही, भकास व पडकी ओसरी दाखविली. शेवटी जवळच्या मार्कंडेय मंदिरात आम्ही गेलो. पुजारी महंत हनुमानदासजी यांनी मंदिरात चांगली जागा दिली व तेथील जवान जोडप्याने मला अगत्यपूर्वक चहा दिला व पायांसाठी व्हॅसलिनची बाटली दिली.

दि. २० ला सुखदेव गावाहून निघून दुपारी नर्मदा किनारीच्या कोटेश्वर मंदिरात पोचलो. तेथील पुजारी बाबा सदानंद महाराज नावाप्रमाणे आनंदी व अगत्यशील आहेत. भांडी शिध्यापासून सर्व सामान दिले. जेवणे करुन निघालो. पुढे शिसोद्रा गाव लागल. तेथील शेतकरी वर्ग सधन वाटला. पुढे वाट चुकलो. शेवटी सायंकाळी कार्तिक स्वामी मंदिरात पोहोचलो. हे मंदिर थोड्या जंगल झाडीत आहे. पण मंदिराची व्यवस्था चांगली आहे. पाण्यासाठी डंकीन गोल चाक फिरविण्याची होती. पाणी फार खोल असल्याने चाक फिरविताना दम लागला. शेवटी थोडेसे पाणी तेथे मिळाले.

येथील घरांमध्ये शेणांनी घर सारवण्याची पद्धत निराळी दिसली. अर्धगोल एकाला एक जोडलेले अशी एक रांग. त्यानंतर एकाखाली दुसरी रांग, अशा तऱ्हेनी सुंदर अर्ध गोलाकार नक्षी सर्वत्र दिसत होती.

गुमानदेव सोडून पुढे निघालो. अंदाडा येथे दुपारचा मुक्काम केला. श्री. ब्यानी भाई दांपत्याने अगत्याने सर्व सामान दिले. स्वयंपाक-भोजन करुन पुढे निघालो. गावात पत्रे किंवा मनीऑर्डर आली का पाहिले तर दादांची पत्रे मनीऑर्डर आली होती. माझे काहीच टपाल नव्हते. मला खूपच वाईट वाटले.

रामकुंडाजवळच शेंदूर लावलेल्या विष्णू व गरुड देवतांच्या छोट्या मंदिरात रात्रीच्या मुक्कामासाठी थांबलो. डास फार होते. कडूलिंबाची पाने व घोड्याची लीद जाळली. मंदिर स्वच्छ झाडले. व नंतर अंकलेश्वरी रामकुंडा पाशी रात्रीचा मुक्काम केला. पायाला पडलेल्या भेगांमुळे चालताना त्रास होतो. म्हणून रात्री मलम-लावून झोपलो.

दि. २५ ला अंकलेश्वर सोडले व टार रोडनी पुढे निघालो. अंकलेश्वराहून आम्ही बलबला कुंडावर आलो. हे कुंड म्हणजे चमत्कारच आहे. या कुंडातले पाणी खारट असून पाणी खालून वर उकळी आल्यासारखे दिसते. पाण्यावर बुडबुडेही येतात. महादेव मंदिर, लहानसे दत्तमंदिर, गौरीशंकर महाराजांच्या पादुका येथे आहेत. कुंडावर स्नान करुन भोजनादि कार्यक्रम उरकला. मुक्कामाचा आग्रह झाला. पण प्रेमाने निरोप घेऊन उन्हातच आम्ही बलबला कुंड सोडले. बलकुंडाजवळ कश्यप ऋषींनी तपश्चर्या केली. या कुंडाला सूर्यकुंड असे नांव आहे. हे मोठे तीर्थक्षेत्र मानतात. कानव्हा गाव व संध्याकाळी सज्योदगारी सिद्धनाथ मंदीरात रात्रीचे मुक्कामाला थांबलो. येथे मंदीराजवळच रुद्रकुंड आहे.

अनुक्रमणिका

**वमलेश्वर महत्वाचा टप्पा**

सज्योदला श्री. नाथुभाई भगत यांचे घरी सदावर्त व श्री. काशीराम भगवान यांचेकडे चार आणे दक्षिणा मिळाली ती घेऊन पुढे निघालो. प्रवास काही काळ झाल्यावर हासोट गाव आले. गाव मोठे आहे. आम्ही जिवणेश्वर महादेव मंदिरातल्या धर्मशाळेत उतरलो. वमलेश्वर येथे राहाण्याची व शिधासामुग्री मिळण्याची सोय नसल्यामुळे हासोट येथे नावेची प्रतीक्षा करीतच मुक्काम केला. उमेघाच्या दिवाणांनी यात्रेकरुंना बिनामूल्य पैलतीरावर जाण्यासाठी ही नाव ठेवली आहे. पुरेसे म्हणजे तीसपस्तीस यात्रेकरु मिळाल्याशिवाय मात्र नाव सोडत नाहीत. काही वेळेला पंधरावीस दिवस देखील नावेची प्रतीक्षा करावी लागते. आम्हाला ४-५ दिवस लागले. दक्षिण तीराची यात्रा संपून आता उत्तर तीराची परिक्रमा सुरू झाली होती. चार-पाच दिवस हसोटा येथे घालवावे लागले.या चार दिवसाच्या कालावधीत श्री. सेठ चंपतलाल कापडीया, तीन परिक्रमावासी, स्वामी पतित पावन, धीरजलाल पारीख, मनुभाई डॉक्टर असे अनेक लोक भेटले. त्यांनी आत्मीयतेने चौकशी केली. मदत केली. उद्या सकाळी म्हणजे दोन तारखेला वमलेश्वरला जाण्याचे निश्चित झाले. आम्ही त्या तयारीला लागलो.

२ मार्च १९७० चा दिवस! आमची सर्वांची वमलेश्वरला जाण्यासाठी आज पहाटेपासूनच धावपळ सुरु झाली. लवकर सर्व कार्यक्रम उरकून आम्ही दहा जणांनी वमलेश्वराचा मार्ग धरला. एकूण आम्ही एकोणीस परिक्रमावासी होतो. वारा अनुकूल असला तर नावेचा पंचेचाळीस मैलाचा प्रवास चार ते पाच तासात पार पडतो. वारा प्रतिकूल असला तर मात्र चोवीस तासहि लागतात. आम्ही मध्यामवर्गीय माणसे म्हणून आम्हाला बारा तास पैलतीरी जाण्यास लागले. वमलेश्वराच्या मंदीराजवळच धर्मशाळा आहे तिथे आज मुक्काम केला. वमलेश्वर छोटे गाव आहे. हासोटवरुनच सदावर्त आणले होते. फक्त पानगे (गाकर) केले. गूळाबरोबर खाल्ले. पूर्ण दिवस व पूर्ण रात्र वमलेश्वरालाच मुक्काम केला.

नावेचा प्रवास उद्या सुरू होणार होता. नावेत प्रातः र्विधीची कोणतीच सोय नसल्याने या सर्व गोष्टी आदल्यादिवशीच उरकाव्या लागतात. वमलेश्वराच्या तलावावर सर्व प्रातः र्विधी आटोपून पूजा-अर्चा आटोपून आम्ही सर्व परिक्रमावासी रेती, चिखल तुडवीत दीड मैलानंतर नावेजवळ येऊन पोहोचलो. समुद्राची पूजा सर्वांनी मिळून केली. नर्मदेहरच्या घोषात सकाळी दहा वाजता नाव सुरू झाली. पुन्हा दीडदोन तासानंतर नाव परत थांबली. परत समुद्रपूजा झाली. गुजराथी बांधवानी पूजा साहित्य पुरविले. बरोबर घेतलेल्या शिऱ्याचा प्रसाद एकमेकांना दिला. दाटीवाटी करुन बसलेल्या जागेत पैलतीरी असलेल्या हरीकाधामची वाट पहात बसलो.

नागमोडी वळणे घेत आमची नाव चालली होती. सुकाणू फिरले गेले की शिड बदलावे लागे. अशावेळी नाव एका बाजूला कलत होती. नाव कलंडते की काय ह्या कल्पनेने जीवाचा थरकाप होत असे. मन रमविण्यासाठी काहिंनी भजने, अभंग म्हणायला सुरुवात केली. त्यातल्या एका यात्रीने म्हटलेली भजने फारच सुंदर व आनंददायक वाटली. सर्वांचा जयजयकार चालला होता. रात्री अंधार पडल्यावर दिवसाच्या उजेडात दिसणारी गंभीर व भयानक दृष्ये कमी होऊ लागली. परंतु मन मात्र स्वस्थ बसू देत नव्हते.

अनुक्रमणिका

शेवटी दहा वाजता नाव किनाऱ्याला लागली असे नावाडी बाळू भाऊ यांनी सांगताच सर्वांच्या उत्साहाला उधाण आले. मात्र अजूनही प्रवास संपला नव्हता. अर्धा मैल चिखलाची वाट तुडवायची शिल्लक होती. हत्ती गेला होता. तेव्हा शेपूट जाणे कठीण नव्हते. एका कंदिलाच्या अनुरोधाने एकमेकांना आवाज देत आम्ही पस्तीस जणांनी मार्ग धरला. मी एकोणतीसवा होतो. माझ्यासमोर पांढरा शुभ्र पोशाख घातलेली व्यक्ती होती. त्यामुळे मी त्या व्यक्तीच्या पाठी राहून त्या अनुरोधाने चालत होतो. पडत. धडपडत, सामान व तोल सावरीत, अंधारातून, चिखलातून आम्ही सर्वचजण वाटचाल करीत होतो. कसेतरी एकदा वाळवंटात येऊन पोहचलो. तेथेच काटक्या-कुटक्या जमवून शेकोट्या पेटवल्या. दुपारी सोबत आणलेले गाकर खाल्ले. पाणी प्यायलो आणि शेकोटीजवळच पथारी पसरून निद्रादेवीच्या अधिन झालो.

अती अवघड अशी ही दक्षिण तीराची परिक्रमा ठरविलेल्या दिवसात जिद्दीने पूर्ण केल्याचा आनंद कांही औरच होता!

***

अनुक्रमणिका

## अठरा
# उत्तरतीर यात्रारंभ

दि. ४.३.७० ला नर्मदा परिक्रमाची दक्षिण तीराची आठशे चार मैलाची वाटचाल सर्व गोष्टींशी मुकाबला करीत पूर्ण केली व आज सकाळीच विजया दशमीच्या सुमुहूर्तावर उत्तर तीरांच्या परिक्रमेला प्रांरभ केला. मानसिक ताण बराच कमी होऊन उत्साह, जोम, आनंद वाढीस लागला होता. सकाळी आम्ही दोघांशिवाय बाकी सर्व पुढे मार्गस्थ झालो. आम्ही मात्र स्नान, संध्या, पूजा व स्वयंपाक व थोडे भोजन करुनच हरीकाधाम या देवस्थानांच्या दर्शनाला निघालो. हरीकाधाम महादेव मंदिरात पिंडीला तीन मुखे आहेत. आम्ही दर्शन घेऊन गुळपाणी घेतले व निघालो. उन्हाचा तडाखा जाणवत होताच.

जोगेश्वर आंबोटा गावी आलो. तिथे थोडी विश्रांती घेतली. मला थोडी चक्करही आली. शरीरही सुस्तावले होते. तरीही चालतच होतो. रात्री कोलीयाडा गावी आलो. रघुनाथदास यांचे घरी सदावर्त घेतले. मंदिराच्या पुजाऱ्यांनी दिलेला चहा घेतला. थोडी हुशारी वाटली. रात्री तेथेच विश्रांती घेतली.

रात्री दादांची व माझी गरमागरम चर्चा-वादविवाद झाले. त्याचा परिणाम हमरीतुमरी पर्यंत झाला. वीस पंचवीस माणसे गोळा झाली. रात्रभर दोघेही तळमळतच होतो. आरंभी चौघेजण होतो. आता दोघेजण राहिलो. दोघांनाही एकमेकांच्या साथीची आवश्यकता होती. उजडण्याच्या सुमारास मला जाग आली ती दादांच्या ओक्साबोक्सी मोठ्याने रडण्याने. मी उठून त्यांना समजाविले. पूर्ववत मनाने एकत्र आलो. सकाळी कोलीयाडा गाव सोडले. बैगणी गावी येऊन सदावर्त घेऊन केसरोल येथे श्रीराम मंदिराच्या आवारात नागेश्वर मंदिरात दुपारचे मुक्कामाला थांबलो. भोजनादि कार्यक्रम उरकून पुन्हा निघालो. इकसालगाव, भारभूतेश्वर मंदिरात रात्रीच्या मुक्कामाला आलो. हे मोठे तीर्थक्षेत्र आहे. रात्री नर्मदा मंदिराच्या ओसरीवर झोपलो. अंकलेश्वराची ज्योत चांगली दिसत होती.

त्यानंतर भारभूतेश्वर वडगागावी, दुशानगावी असे मुक्काम पार केले. महादेव मंदिराच्या धर्मशाळेत उतरलो. तेथे शांतीभाई पटेल यांनी आम्हाला उपवासाचे सदावर्त दिले. नर्मदेवर स्नान करुन उपवासाचे पदार्थ शिजविले व फराळ केला. विश्रांतीनंतर कुकरवाज गावी आलो. तेथे चोवीस तास नामसप्ताह चालला होता. तेथे रहाण्याचा आग्रह झाला. पूजा, अर्चा, आरती, भजने जपजाप्य करण्यास भरपूर वेळ मिळाला. जागाही चांगली होती. रात्री भजन चालू होते. स्वस्थ झोप लागली नाही.

कुकरवाडा सोडण्यापूर्वी दादांनी स्वयंपाक केला. शिवरात्रीचे पारणे सोडून (भोजन करुन) पुढे निघालो. पोस्ट ऑफीस मध्ये गेलो. तिथे माझी पत्रे व मनीऑर्डरी आल्या होत्या. खूप बरे वाटले. त्या मंडळींनी आमची चौकशी करुन आम्हाला चहा-कॉफी पाजली. माझी प्रकृती अधून-मधून ठीक नव्हती. दादांनी डॉक्टरांना दाखविण्याची विनंती केली. तिथे सर्व प्रकारची मदत मिळत होती. मंदिराची रचना व व्यवस्था चांगली होती आम्ही मुक्काम केला त्या मंदिराचे नाव नवग्रह मंदिर. मी प्रकृती स्वास्थाकरिता औषध व पौष्टिक आहार सेवन करु लागलो. रात्री महादेव नवग्रह मंदिरातच मुक्काम केला.

अनुक्रमणिका

आम्ही प्रवास करीतच होतो. भडोच हे नर्मदा किनाऱ्यावरील शहर. मात्र येथे नर्मदा म्हणजे खाडीच आहे. भडोच गावातून हिंडताना वेडेवाकडे रस्ते, अव्यवस्थित इमारती, पडकी घरे, कचऱ्याचे ढीग, उघडे-वाहते बघून मन उदास झाले. वातावरणामुळे तिथे रहाणेही सुखकारक वाटले नाही. भडोच, झाडेश्वर, शुक्लतीर्थ व अंगारेश्वर अशी तीर्थक्षेत्रे करीत १०.३.७० ला आम्ही नारेश्वरला पोहोचलो. रात्री मुक्काम मंदिरातच केला. या नारेश्वर मंदिराचा परिसर, अवधूत घाट, येथील स्वच्छता सर्वच काही वातावरण प्रसन्न करणारे होते. परंतु थांबायला वेळ नव्हता.

दि. ११ ला आम्ही जरा उशीरानेच नारेश्वर मंदिरातून निघालो. तिसोड, बकापूर, हाजीपुरा, कहोळा, फत्तेपूर ग्यारोली गावे घेत घेत निघालो. कोठीया गावी सर्व कार्यक्रम उरकून भोजन व विश्रांती झाली. अंगारेश्वर मंदिरात आलो. मंदिर मोठे आहे. येथेच मंगळाने तपश्चर्या केली. मालसरला मुक्काम केला.

त्यानंतर मालसरहून सिनोर गावी आलो. अनुसूया मंदिराजवळ आलो. नर्मदा किनारी फार प्राचीन व पौराणिक असे हे अनुसूया मंदिर आहे. मूर्ती स्वयंभू आहे. अनुसूयेचे माहेर सिद्धपूर चित्रकूट येथे आहे. येथे थोडी विश्रांती घेऊन पुढे निघालो. वाटेमध्ये आश्रम, मंदिरे लागतच होती. आम्ही व्यास मंदिरात आलो. व्यासेश्वर व महादेव मंदिर तसेच बाकीच्या देवतांची दर्शने घेतली, बद्रीकेदार, काशीविश्वेश्वर यांच्या प्रतिकृतींची मंदिरेही होती. व्यास मंदिराच्या समोर दक्षिणतीरी सुखदेव मंदिर आणि गाव आहे. पंचपदी झाली. रात्री झोप घेतली. मुक्कामासाठी तिथेच राहिलो.

कुबेर, बडीया गाव, बडवारा, मोरिया गावानंतर, तुळेश्वर, मनसाईदा, तिलकवाडा येथे आलो. भोजन केले. विश्रांती घेऊन परत निघालो. छोटी-छोटी गावे पार करीत हाजरोली गावाजवळ अंबराईत, एकीकडे नरोत्तम भगत नावाचे गृहस्थ राहतात, त्यांचेकडील झोपडीत मुक्कामाला गेलो. चहा पान झाले. मस्त दुलई पांघरुन छानपैकी झोप मिळाली.

हंजरोलीचा (सांजोली) मुक्काम सोडून आठ वाजताच गरुडेश्वरला पोचलो. तेथे धर्मशाळेत आम्हाला एक खोली मिळाली. गरुडेश्वर महादेव मंदिर गावाच्या उंचभागी पण एका बाजूला व लहानच आहे. इथला सर्व खर्च संस्थेमार्फतच केला जातो. नर्मदा व गरुडेश्वराचे दृश्य फारच सुरेख आहे. गरुडेश्वर गाव मोठे नाही. तरीही शाळा, पोलीस स्टेशन, एस. टी. स्टँड, पोस्ट ऑफीस वगैरे सर्व आहे. व्यवस्था फारच चांगली आहे. येथे जास्त करुन महाराष्ट्रीयन व गुजराती वर्ग जास्त येतो.

आम्ही परटी महादेव मंदिरात उतरलो. आम्ही सकाळी सदावर्त घेतले. धर्मशाळेत स्वयंपाक, भोजन, पत्रलेखन, पंचपदी वगैरे दैनंदिन कार्यक्रम झाले. तिथे गुरुजींना दत्तमंदिरात अभिषेक करावयास सांगितला. रात्री तेथेच मुक्काम केला.

बागडीया गावी, आदित्येश्वर महादेव मंदिर आहे. येथे रात्रीचे मुक्कामाला थांबलो. येथे सूर्याने तपश्चर्या केली म्हणून याला आदित्येश्वर महादेव म्हणतात.

अनुक्रमणिका

प्रकृती अस्वास्थामुळे उत्तर तीरावरील शूलपाणी जंगल टाकून गुजराथेहून लांबवरच्या मार्गाने जाण्याचे ठरले. आदित्येश्वरला हात जोडून निघालो. रात्री झरीया गावी मुक्कामाला आलो.

झरीया नसवाडी गावाचा मुक्काम हलविला. चालत-चालत बघाच्या गावी आलो. शाळेला सुटी असल्याने शाळेत मुक्काम. लाकूडफाटा, भांडी जमवून स्वयंपाक केला. स्नान पूजा उरकून भोजन केले व दुपारी ४ वाजता निघालो. संध्याकाळी भारवा गावी अश्विनी नदी किनारी रोकडीया मारुती व निळकंठेश्वर महादेव मंदिरात धर्मशाळेत उतरलो तिथे रात्रीचा मुक्काम केला.

**बसने प्रवास....**

दि. १५ मार्च : होळी पौर्णीमेचा दिवस होता. लवकर उठून स्नान संध्या, स्वयंपाक करुन एस.टी. स्टँड गाठला. कवाट ते छोटा उदेपूर एस.टी.त बसलो. सकाळी ९॥ वाजता छोटा उदेपूरला पोचलो. गावची रचना चांगली असून मोठ्या तलावामुळे, जास्तच सुरेख व रम्य वाटले. १२॥ वाजता थोडी पोटपूजा करुन परत एस. टीने पुढे निघालो.

आम्ही कवाट ते चिखलदा हा सत्यांशी मैलाचा प्रवास बसने केला. प्रवासात असताना भिल्लांच्या झुंडीच्या झुंडी बाजारहाटाकरिता येताना दिसल्या. लाल लुगडे नेसलेल्या भिल्लीणी व निळा किंवा लाल फेटेवाले भिल्ल ही रंगसंगती डोळ्याला सुखावह वाटत होती. ढोल-पावा वाजविणे, माडी-दारु घेऊन झिंगणे असे प्रकार पहायला मिळत होते.

भिल्लांचा होळी हा मोठा सण. अशावेळी ते दारु पिऊन धुंद झालेले असतात. आपापसातील भांडण तंटे याचवेळी सुरु होतात. अशावेळी लूटमारही होते. जीवही काहीवेळा गमवावा लागतो. तेथील स्थानिक लोकांनी ही माहिती दिल्याने कवाट ते चिखलदा हा सत्यांशी मैलांचा प्रवास आम्ही बसने केला.

चिखलद्याला मुक्काम केला. या इथे तीन रात्री मुक्काम केला. या मुक्कामात नर्मदा मंदिराचे पुजारी चाफेकर यांनी खूपच मदत केली. दक्षिणतीरावर शूलपाणी जंगलात प्रवेश करण्यापूर्वी आम्ही आमचे बरेचसे सामान भिलखेडा येथे ठेवले होते. चिखलदा येथे आल्यावर सकाळीच तेरसिंग यांचेकडे एक मनुष्य पाठवून पिशव्या मागवल्या. त्यात सामान पूर्णपणे होते. बाकीचा वेळ फिरण्यात, भजने म्हणण्यात वगैरे जात होता.

चिखलदा गावात होळीच्या सणानिमित्याने नाच-गाणे-दारु पिऊन झिंगणे चालूच होते. पहाटेच्या सुमारास होळी पेटविण्याचा इकडे प्रघात दिसला. होळीचा लाल रंग दोन दिवसांनी ओरसला.

तीन रात्री व दोन दिवसांच्या मुक्कामानंतर आम्ही सकाळी चिखलदा महादेव मंदिर सोडले. उत्तरतीरी प्रवास चालू. राजघाट पूल मागे टाकला. आता सामानाचे ओझे जाणवू लागले. बरीच गावे मागे टाकत

मलवाडा गावी पोचलो. रात्रीच्या मुक्कामासाठी एक्कल बारागावी येथील शिक्षक पंढरीनाथ कौंडिण्य यांच्या प्रायमरी शाळेत थांबलो.

परिक्रमेत भिक्षा मागणे, भांडी जमविणे, परिक्रमेची वाटचाली बाबत चौकशी करणे, वगैरे कामे मला चांगली जमत असत.

सरिकपुरा नंतर नलनायगावी रामाचे देवळाजवळ पुजारी बाबांच्याकडून थोडी भांडी घेऊन स्वयंपाक केला. भोजन झाल्यावर थोडा आराम करुन उन्हातूनच पुढे निघालो. एका म्हाताऱ्या भिल्लाने आम्हाला मार्ग दाखविला. मार्ग फारच काटेरी होता. बरेच अंतर चाललो तरी आमचे योजलेले ठिकाण येत नव्हते. अंधार पडू लागला.तेव्हा नर्मदा किनाऱ्यावरच्या एका वृद्ध दांपत्याने आमची अगत्याने सोय केली. त्याचे नाव मोहनसिंग ठाकूर त्यांनी आम्हाला गरम चहा दिला. शेतातले कलिंगड कापून दिले. आरती व पंचपदी झाली. आवाज चांगला लागला. रात्री शांत झोप लागली.

दि. २७ ला पुढे निघालो. नर्मदा किनारा सोडून मांडवगडरेवा कुंडाकडे चाललो. दोन-तीन फर्लांग गेल्यावर शंकर धारेश्वर महादेव मंदिर, हनुमान मंदीर, नर्मदा मंदीर व कुद्रन कुंड आहे. त्या कुंडातून बारामहिने एक धार वाहाते. आम्ही येथून चहा घेऊन निघालो. वाटेत देवतांची दर्शने घेतली. काडी गावे पार करुन पगारागावी प्रायमरी शाळेत मुक्कामाला थांबलो.

रात्री श्रीराम मंदीरात मुक्काम केला. काल रागकर ढोल, बाज्या भजन वगैरे गावात चालूच होते. सकाळी पगारा राम मंदीरातून निघालो. श्री. फत्तू किसन निरोप देण्यास आमच्या बरोबर एकदीड मैल आले. चिडी नदी नंतर पिपल्याखुंट-पिपली-अहेखास गावी तेथील गावकऱ्यांनी मुद्दाम बोलावून सदावर्त व चहा दिला.

काली बाबडी गावी श्रीराम मंदिरात मुक्कामाला उतरलो, श्रीराम, लक्ष्मण, सीता मूर्ती मोठ्या होत्या. मंदिराच्या मागील बाजूस पुजारी राहतात. त्यांनी शिधा, लाकूडफाटा व भांडी दिली. ढिगाऱ्यावरुन गोवऱ्या आणल्या. नंतर स्नान, संध्या, पूजा, स्वयंपाक व भोजन झाले.

दक्षिण तीरापेक्षा उत्तर तीरी चालण्याचे प्रमाण आमचे घसरत चालले. आरामाकडे कल झुकू लागला. दादासुद्धा थकलेले दिसू लागले. आज रंगपंचमी. येथेच मुक्काम करण्याचे ठरले.

दि. २९.३.७० ला याच वर्षी अष्टविनायक दर्शन पदयात्रा केली होती. त्याचे स्मरण झाले आणि त्या आठवणीनेच सकाळी काळी बावडी राम मंदिराचा निरोप घेऊन निघालो. सदावर्त चहा घेत मार्गस्थ झालो. कोयला बादकी चौकी जवळ पोहोचलो. बदावगाव जंगल सुरु झाले. मांडवगडचा डोंगर दिसू लागला. या भागात चिंच व खिरण्यांची झाडे पुष्कळ आहेत. जंगल, घाट, चढण चढत मांडवगडाजवळ पोहचू लागलो. वाटेत मी थोडासा थकलो. भूकही लागली होती. दादांना विश्रांतीची आवश्यकता वाटली नाही. ते नेहमीच्या सवयीप्रमाणे चालत राहिले. मी मात्र थोडेसे खाऊन भूक शांत केली. पुढे निघालो. वाटेत वरुन एक दगड आला. दादांच्या पायाला लागला. आम्हाला भीती वाटली. आम्ही जलद गतीने चालू लागलो. पण पुढे असे

अनुक्रमणिका

कळले की, खिरणीची फळे खायला वानरे येतात. त्यांना दगड मारले जातात. त्यातला दादांना एक दगड लागला असावा.

पूर्ण घाट चढून आम्ही वर पोहोचलो. प्रथम सोनगडची पडीत तटबंदी, मोठा तलाव, पांढरी मोठी इमारत दिसली. आम्हाला सोनगढचे दृश्य उदास वाटले. मी निळकंठेश्वर मंदिरापर्यंत जाऊ शकत नव्हतो. खूप थकलो होतो. ऊन फारच कडक होते. आम्ही वरुनच निळकंठेठेश्वराचे दर्शन घेतले. व टाररोडने मांडवगढ गावाकडे निघालो. रखरखीत उन्हातून बरेच पुढे गेलो. तेव्हा गाव आले.

जुने पडीत वाडे, दर्गे, मशिदी, मक्के यांचे छान दर्शन झाले. अजूनही काही इमारती चांगल्या स्थितीत आहेत. आम्ही गावातून शेवटच्या भागातील मोठ्या श्रीराम मंदिरात मुक्कामाला गेलो. हे मंदिर साडेंआठशे वर्षांपूर्वीचे आहे. श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. पण सुबकपणा मुळीच नाही. येथे रामनवमीला यात्रा भरते.

राहण्यास चांगली जागा मिळाली. सदावर्त मिळाले. स्नान, स्वयंपाक, भोजन, आराम सर्व देवडीजवळील पडवीत झाले. रात्री झोपही चांगली लागली.

## अवघड उतरण

सकाळी आम्ही मांडवगड सोडले. सुमारे ३ मैलावर असलेल्या रुपकुंडावरुन (त्याचे समोर रुपमतीचा महाल आहे) पुढे रस्ता होता. रुपकुंडानंतर पुढील मार्ग कडा तुटलेल्या भागातून उतरणीवरुन होता. जणू पाताळात जायच होत! आमच्या सोबत एक म्हातारा परिक्रमावासीही होता.

माझ्या पाठीवर सामान, एका हातात काठी व दुसऱ्या हातात पाण्याची बरणी होती. चालताना पाठीवरचं सामान कमीजास्त हलले तर तोल जायची भीती. अशा स्थितीत अनेक ठिकाणी तर खाली बसून एक एक पाऊल उतरावं लागलं. हा अवघड मार्ग पार करावयाचा ठरविल्याने, कुठे विश्रांतीला थांबलो नाही. शेवटी पूर्ण खाली आलो. त्यावेळी मांड्यांपासून खालचा भाग मला नाहीच, असं वाटू लागलं. हळूहळू सपाट मार्गावरुन भैर फर्लांग चालल्यावर माझ्या पायात चेतना आली.

वाटेत एक मोठा तलाव व वाहत्या पाण्याची दलदल पार केली. आता विश्रांतीची खूप गरज वाटत होती. पण जवळच एखादे मोठे गाव असेल या आशेने चालत होतो. तशात थोडा रस्ता चुकलो. पण सोबतच्या म्हाताऱ्याने मागून आवज दिल्याने, आम्ही मागे येऊन योग्य मार्ग धरला. शेवटी बुटी नदी ओलांडून डांबरी रस्त्यावरुन पाय भाजत माध्वा ही गुलजार गावी पोहोचलो. रात्री मारुती मंदिरात वस्तीला आलो तर, तिथे जणु उंदरांची सभा भरणार होती. कारण अनेक उंदीर खालून वर, वरुन खाली अशी धावपळ करीत होते.

पहाटेच गुलजार सोडले. दुपारी महेश्वर गावी आलो. सौ. माणिक सुभेदारकडे मी एकटाच 'नर्मदे हर' म्हणून तिच्या घरी आलो. सर्व सुभेदार कुटुंबीय अगत्यशील व धार्मिक वृत्तीचे दिसले. त्यांनी माणूस पाठवून सामानासह दादांनाही घरी आणले.

## महेश्वरला वास्तव्य

दि. १ एप्रिलला महेश्वर घाटावर लिंगार्चने होतात, त्यांची पद्धत मी पाहिली. काही संस्कृत श्लोक म्हणत सफाईने लिंग तयार करुन ती लगेच तांदूळ लावून पाटावर ठराविक अंतरावर केलेल्या खळग्यात ते ठेवत. अगदी यंत्रवत सर्व क्रिया सुरु होत्या. त्यांत पूजेबद्दल आस्था व आपलेपणा वाटत नव्हता.

सुभेदारांकडे सौ. माणिकने उत्तम जेवण, गुलकंद, मोरावळा वगैरेचा खुराक व पूर्ण विश्रांती घ्यायला लावली. डॉक्टरांना प्रकृतीही दाखविली. महेश्वरला देवी अहिल्याबाईंचा भव्य पुतळा, २७फूट लांबीचा भाला, देवळे, घाट, दरबाराची जागा, वगैरे तीन दिवसांत सर्व पाहिले. आराम, व्यवस्थित जेवणे यामुळे आमच्या प्रकृतीही जरा सुधारल्या. महेश्वरचा अहिल्यादेवीचा घाट म्हणजे रम्यता, शांती व पावित्र्य यांचा संगम असलेले रमणीय स्थान आहे.

सुभेदार मंडळींचा प्रेमळ निराप व दिलेली भरपूर शिदोरी घेऊन निघालो. या परिक्रमा यात्रेत नामनगर, हुशंगाबाद, जबलपूर, ओंकारेश्वर व महेश्वर या सर्व ठिकाणी घरोब्याच्या मुक्कामी आराम व समाधान वाटले. महेश्वर नदी, नंतर लाडवी गावावरुन गांधी नदीजवळ आलो.

तेथे दुपारी श्री दत्तमंदिरात अण्णाजी जोशी यांनी अगत्याने त्यांचे गुरु स्वामी फाटक शास्त्री यांच्या पुण्यतिथि निमित्य होणाऱ्या भोजनाचे आमंत्रण दिले. आम्ही अण्णांना एक पंचा व तादूळ देऊन नमस्कार केला. आतापर्यंतच्या परिक्रमेत अशक्तपणा जाणवत होता, तरी मानसिक स्वाथ्य व आनंद यांची वाढ होती.

श्री. अण्णाजींचा निरोप घेऊन ऊन्हातून पुढील वाट चाललो होतो. लक्कडपूलचा ओढा मागे टाकला. त्यावेळी समोरुन एका खूप मोठ्या गोणपाटाच्या झोळीत उंटाचे पिलू ठेवून, ती झोळी बासात अडकवून दोन व्यक्ती रस्त्याने येत होत्या. उंटाचे गोजिरवाणे पिलू तोल सांभाळत बसले होते आणि त्याची आई मागून चालत येत होती. दृश्य मजेदार दिसत होते.

रात्री धर गावी श्रीराम मंदिरात मुक्कामाला थांबलो, माझ्या दोन्ही तळव्यांना फोड झाल्याने चालताना त्रास झाला. तसेच डाव्या पायाच्या आंगठ्याचे नख गळून पडले. जास्त चालीच्या वारीत यापूर्वीही पायाच्या बोटांची नखे अनेकदा गळून पडली होती.

अनुक्रमणिका

बरलाय गाव सोडून दुपारी मुक्कामाला बडवाद गावी आलो. तेथील नागेश्वर कुंड मोठ्ठे चौकोनी असून त्याचे पाणी फार स्वच्छ, रुचकर व सतत वहात असते. यात दोनदोन फुटी मासे आहेत. कुंडात मध्यभागी महादेव मंदिर व जरा बाजूला मारुती मंदिर आहे. येथे राममंदिर असून त्याच्या मागे ब्यांशी वर्षांचे जोगळेकर महाराज राहतात. त्यांची भेट झाली. सतेज उंचेपुरे, ताठ व सडसडीत असलेले श्री. जोगळेकर वेदपठणात पारंगत आहेत. ऐन उमेदीत त्यांनी हरिद्वार ते रामेश्वर अशी सात वेळा गंगा कावड नेली होती. त्यांनी परदेश प्रवासही केलेला आहे.

सकाळी नागेश्वर सोडले. जंगलातून चढउतार करुन नर्मदाकिनारी एकांत स्थळी असलेल्या कोटेश्वर महादेव मंदिराचे दर्शन घेतले. नंतर बराच अवघड मार्ग चालून कोठावा येथे सनातन वैदिक ऋषीकुंड आश्रम (नर्मदा व कावेरी संगमाजवळ असलेला) येथे मुक्कामाला थांबलो. सोमवती पर्वणी निमित्याने, येथे बरेच यात्रेकरु जमले होते. आम्ही स्नान, पूजा, जेवण आटोपून आश्रमाचे नवीन बांधकाम बघितले. तेथून ओंकार मांधाता गाव, ओंकारेश्वर टेकडी मंदिर व नर्मदा कावेरी संगम हे मनोहर दृश्य बघितले. रात्री विजेच्या दिव्यानी त्याची शोभा अधिकच वाढली. कोठावा आश्रमात संस्कृत अध्ययनाची व्यवस्था असून ती योजना मोठ्या प्रमाणात वाढविणे आहे, असे समजले.

या आश्रमाची इस्टेट शेतजमिन, गुरे वगैरे बरीच मोठी आहे. नर्मादाकिनारी ईश्वरचिंतनात शांतपणे काळ कंठिता यावा म्हणून स्थापन केलेल्या आश्रमांचा व्याप काही ठिकाणी इतका वाढवितात की मूळ उद्देश बाजूलाच राहतो. उलट गृहस्थाश्रमी असणाऱ्याचा संसार सुटसुटीत व आटोपशीर असल्याने आश्रमापेक्षा घरीच तो ज्यास्त शांतपणे इश्वरचिंतन करु शकेल, असे मला वारंवार जाणवते.

## चोवीस अवतार ग्राम

वर्ष प्रतिपदेचा दिवस! चैत्र शुद्ध १ शके १९९२! सकाळी मुखमार्जन करुन कडूलिंबाचा पाला खाऊन सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या व आश्रम सोडला. संध्येची चोवीस नावे येथे न घेता, कावेरीच्या उत्तर तीरावर ओंकारेश्वराच्या मागे असलेल्या चोवीस अवतार देवस्थानांचे दर्शन घ्यावे, असे ठरवून आम्ही चालू लागलो. प्रारंभी अर्ध्या मैलाचा मार्ग चांगला होता. नंतर खडकाळ, गोटाड कपाऱ्या असलेल्या मार्गाने दीड मैल चाललो. शेवटी एका उंच टेकाडावर आलो पण तेथून सुळका खाली गेलेला होता. त्यावरुन जाणे शक्यच नव्हते. सकाळी माहिती देणाऱ्यांनी हा अवघड मार्ग आहे, हे सांगितले नव्हते. शेवटी पुन्हा अर्धा मैल मागे आलो. नर्मदा कावेरी संगमावर खूप यात्रेकरु जमले होते. पण आम्ही दुसऱ्या किनाऱ्यावर दोघेच होतो. वाटेत एकही व्यक्ती भेटली नाही. दाट जंगल होते. काट्याकुट्यातून मार्ग शोधत दक्षिण दिशेवर लक्ष ठेवून आम्ही वाटचाल करीत होतो. पण २४ अवतारांपैकी एकाही अवताराचे दर्शन होईना. शूलपाणी जंगलातून प्रवास करीत होतो, ती आठवण झाली. शेवटी बऱ्याच उशिरा दमलेल्या आम्हाला शिद्धकूट हे किल्लेवजा जैनमंदिर दिसले. तेथे सर्व व्यवस्था चांगली होती. पण आम्हाला आश्रय मिळणार नाही असे समजले. शेवटी अर्धा मैल असलेल्या चोवीस अवतारांकडे निघालो. वाटेत जरा वेळ थांबून लिंबाचं सरबत घेतलं आणि शेवटी चोवीस अवतारांचे ठिकाण गाठले.

अनुक्रमणिका

वास्तविक अनेकजण या ठिकाणाहून नर्मदापरिक्रमेस प्रारंभ करुन येथेच परिक्रमा पूर्ण करतात. हे गाव लहान आहे. येथील अनेक मूर्तींचा व देवळांचा विध्वंस झालेला आहे. हे स्थान उदास व फार मागासलेले वाटले. त्यामुळे या स्थानाविषयी माझा अपेक्षाभंग झाला. आता या स्थानास सरकारी कुलुप लावलेले आहे. त्यामुळे जवळच असलेल्या महादेव मंदिरातून परिक्रमा आरंभ करतात. या ठिकाणाहून दोन वर्षांपूर्वी परिक्रमा सुरु केलेले चार सख्खे भाऊ परिक्रमा पूर्ण करुन येथे आज सायंकाळी येऊन पोचले. त्यांची आमची भेट झाल्याने सर्वांनाच आनंद झाला. त्या भावांची नांवे - सर्वश्री. शंभू गणेश प्रसाद, माधव प्रसाद, महादेव प्रसाद, शिवनी उपाध्याय, मुक्काम, मपुराबाद- जिल्हा- जळगांव, पूर्व खानदेश हे चारही भाऊ चांगले मराठी बोलत होते.

थोडा रस्ता चुकल्यामुळे (अनेकजण येथे रस्ता चुकतात असं कळलं) मागे पुढे करीत पिंपळगावावरुन सीता वन या पूर्वा नदी काठी असलेल्या जंगलातील गावात आलो. येथे गावापासून जरा दूर एका छोट्या टेकडीवर श्रीराम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीतामाई, लव-कुश, वशिष्ठ व मारुती यांच्या संगमरवरी मूर्ती असलेले एक मोठे मंदिर आहे. मंदिराच्या आवारात मारुतीची आणखी एक मोठी मूर्ती असून, दोन्ही भिंतीवर बऱ्याच देवदेवतांच्या दगडी मूर्ती आहेत. येथे यात्रेकरुंना पूर्ण सदावर्त मिळते. या देवस्थानाची जवळ-जवळ ऐंसी एकर जमीन असून पचास हजाराचे लाकडाचे उत्पन्न आहे. येथील सीताकुंडात नर्मदेच्या वाहत्या पाण्याची स्वच्छ धार आहे. आजुजूबाजूला मोठे वृक्ष असून वातावरण शांत व आल्हाददायक वाटले. पिपरी या गावाजवळ हे सीतावन आहे.

सीतावनानंतर चौदा कि. मीटर अंतर कच्च्या रस्त्याने चालून नर्मदाकिनारी असलेल्या धारडी गावात पोचलो. येथे नर्मदा नदीच्या अनेक लहान व एक मोठी धार असा सातधारा धबधबा आहे. धबधब्याखाली एक मोठा डोह असून त्यात अनेक तऱ्हेचे बाण मिळतात. खडकांची रचना व प्रवाहाची विशिष्ट गती यामुळे या डोहाजवळचे पाणी भोवऱ्यासारखे फिरत असते. तेथेच अनेक उथळ व खोल लहान मोठे खळगे आहेत.या भोवऱ्यात दगड पडले की सारखे फिरत असल्याने कालांतराने अंडाकृती बाणांचा (शिवलिंग) आकार येत असतो, अशी माझी कल्पना आहे. काही खळग्यात मासे दिसले. काही दरडीतून हिरव्यागार दुर्वा उगवल्या होत्या. आठदहा वर्षांची तीनचार मुले कपारीवर बसून मासे पकडीत होती. एकून धबधब्याचे दृश्य मनोहर असले तरी गंभीर वाटत होते. मला सकाळी लो ब्लड प्रेशरचा त्रास जाणवल्यामुळे थकवा वाटत होता. त्यामुळे आम्ही येथील धर्मशाळेत मुक्काम केला. महादेव मंदिराचे पुजारी व व्यवस्थापक श्री. गंगाराम वैष्णव स्वभावाने चांगले होते.

सायंकाळी येथे देवीची एक मिरवणूक आली. दोन पगडी घालेले मुखवटे व दोन देवीचे मुखवटे यांना पूर्ण पोशाख घातले होते. अंगात आलेल्या बाईसमोर पायघड्या घातल्या होत्या. बऱ्याच स्त्रिया डोक्यावर कलश घेऊन आल्या होत्या. मिरवणूकीत ढोल, ताशे, पिपाण्या होत्या. नाचे व सोंगाड्या गाणी म्हणत नाचत होते. या मूर्तीचे त्यांनी नर्मदेत विसर्जन केले.

अनुक्रमणिका

धारडी कुंडाहून निघून प्रेमगढला जेवण व आराम करुन पुढे निघालो. खाडी नदी, मगरवाडी नदी ओलांडली. येथे नर्मदानदीचे पाणी किती स्वच्छ आहे याची कल्पना येऊ लागली. जसजसे वर चाललो तसतशी नदीतील पांढरी माती दिसू लागली. प्रवाह मोठा होता तरी पाण्याचा रंग निर्मळ, हिरवट स्वच्छ, पारदर्शक दिसू लागला. आम्ही भेटखेडा या चारपाच टपरे असलेल्या वस्तीपाशी पोचलो. तेथे नदीवर अर्धा तास थांबलो. निर्मळ प्रवाहातील माशाचं खेळणं पहाताना मन प्रसन्न झाले. वाहत्या नदीचे पाणी एवढे स्वच्छ क्वचितच दिसते. नदीतील पात्रात चुनखडी सारखी पांढरी माती होती. त्यामुळे निसर्गनिर्मित मत्सालय पहायला मिळाले.

पहाटेच मेटखेडा सोडले. पाच मैलावरील तीन कनेरी येथे पंजाबी झोपडीत सदावर्त घेतले. जवळच्या ओढ्यावरुन स्नान करुन पाणी आणले व स्वयंपाक केला. इतक्यात हांसोटला भेटलेले जुने चार परिक्रमावासी येथे भेटले (महात्मा, पतीतपागल वगैरे). या मंडळींसह दुपारीच आम्ही पुढे निघाले. आज पाय चांगलेच पोळत होते. जंगल असूनही ऊन लागत होते. वाटेत वाघ नाही, पण त्याची विष्ठा व पाऊले दिसली. दमून भागून आम्ही तिन्ही सांजेला श्री. राम अवतार जाठ, अंधारवाडी, पोष्ट-बडकेश्वर, ता. हरसूर, जिल्हा खांडवा (पूर्व नेमाड) यांचेकडे पोचलो. या दांपत्याने आम्हां सहाजणांचे अगत्याने आतिथ्य केले. रात्री महुवाच्या फळांचा उग्र व गोडसर वास येत होता. अंथरुणावर व सर्वत्र महुवाच्या फळांचा सडा पडला होता.

## जोगा फॉरेस्ट

किटी घाटावरून जंगल झाडीने नर्मदाकिनाऱ्याने सहा मैल चालल्यावर जोगा फॉरेस्टचा भाग लागला. नर्मदेच्या मध्ये एका बेटावर येथे टेकाडावर फत्तेहगड नांवाचा जुना किल्ला व जवळच वस्ती लागली. दक्षिणतीराहून जेव्हा आम्ही प्रवास केला. तेव्हा कुठे स्वयंपाक करून दुपारी थांबलो ते स्थान येथून दिसत होते. २१ जाने. ७० ला आम्ही तेथे होतो.

## रामनवमी

राम नवमीच्या दिवशी तनखाननंतर कनागांव, सोटीनदी, राजोरगांव वरुन बागदीनदी ढोपरभर चिखलातून पार केली.संगमावरील राधाकृष्ण आश्रमात न थांबता द्रोणागिरी व गदाधारी मारोती जवळच्या पारावर मुक्कामाला थांबलो. स्नान व स्वयंपाक झाल्यावर मारुतीरायाजवळ बसून रामचंद्राची दोन पदे म्हटली व बरोब्बर दुपारी १२ वाजता जयजयकारात रामजन्म साजरा केला. (मागील वर्षी अष्टविनायक पदयात्रेत सिंहगडावर रामजन्म साजरा केला होता. त्यावेळी भाऊ सोमपुरकर बरोबर होता त्याची आठवण आली.) दुपारी थोडा आराम करून पुढे निघालो. पाय फार पोळत असल्याने मधेमधे थांबावे लागले. नंतर मात्र जोरदार वावटळ उठली. पावसाचाही रंग होता. मंडलेश्वर, नवाडागांव, बजवाडागांव करीत बाणगंगानदीनंतर बरीच चाल केल्यावर सायंकाळी ७॥ वा. नेमावरला सिद्धनाथ मंदिराच्या धर्मशाळेत पोचलो.

अनुक्रमणिका

दुसरे दिवशी नेमावरला विश्रांती घेतली. सिद्धनाथ मंदिरामागील एका मठीत रहाणारे स्वामी विश्वनाथ प्रकाश हे सतेज, भारदस्त व तेजःपुंज शरीराचे, उत्तम गायक, सर्वांशी प्रेमळ वागणारे व परोपकारी म्हणून येथे प्रसिद्ध आहेत. त्यांची भेट झाल्याने आनंद झाला. तसेच शुक्लतीर्थावर भेटलेले श्री. सु. अ. केळकर यांचीही मठीत भेट झाली.

नेमावर सिद्धनाथ मंदिर नर्मदेच्या उत्तर तीरावरील नाभीस्थान आहे. येथे बरीच मंदिरे व घाट आहेत. संध्याकाळी हंडीयाकडून पूल ओलांडून एक बराच मोठा उंटाचा तांडा आला. बरोबर गाढवांचा व हजारोंच्या संख्येने मेंढरांचा व बकऱ्यांचा कळपही चालला होता. चालताना सर्वांच्या पावलांचा विविक्षित आवाज येत होता. खूप धूळही उडत होती. बऱ्याच बैलगाड्यांमध्ये संसारी सामान व त्यावर मुले व स्त्रिया बसल्या होत्या.

मी दोन तीन जणांना विचारण्याचा प्रयत्न केला. पण 'इधरसे आये और इधर जा रहे है' या आशयाची उत्तरे मिळाली.

एवढ्या मोठ्या विविध प्राण्यांच्या कळपाची राखण कशी करत असतील? त्यांना गवत, झाडपाला कसा मिळत असेल? त्या सोबत भटकत असणाऱ्या कुटुंब कबिल्याची व त्यांच्या पालनपोषणाची काय व्यवस्था असेल, असे अनेक प्रश्न मनात घोळवत बऱ्याच वेळाने मी धर्मशाळेत परतलो. नेहमीप्रमाणे पंचपदी म्हणून नंतर मोकळ्या गच्चीवर गाढ झोपी गेलो.

## गाईची सुटका

पतितपावन व सहकारी' ब्रह्मांडघाटापर्यंत आमचे सोबत रहातील असे त्यांनी सांगितल्यामुळे मला बरं वाटलं. या मंडळींच्या सोबतीमुळे प्रवास चांगला व अधिक वेगाने होऊ लागला. जामनोर, कुंडगांव, गोतीनदी, संगमावरून पुढे आलो. मी सर्वांपेक्षा थोडा मागे होतो. किचलीगांवी नर्मदेच्या चिखलात एक गाय फसली होती. आमचे तीन परिक्रमावासी सहकारी तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न करताना मला दिसले. चिखलात गाय बऱ्याच वेळेपूर्वी फसलेली दिसत होती. मीही मदतीला पुढे आलो. बरीच मेहनत करुन गाईला चिखलातून काढून रेतीवर आणले. तिला जोंधळ्याचे पीठ द्यावे असे महाराज म्हणाल्यामुळे मी जवळील पीठ थाळीत घेऊन त्याचे गोळे केले. प्रथम गाय तोंड उघडायला तयार नव्हती. नंतर हळूहळू ती रवंथ करू लागली. दादांनी तिला गुळाचा खडा दिला. तिची जरावेळ सेवा करुन, तिला वाळूत बसवून मग आम्ही हातपाय धूवून पुढे निघालो. 'माझी पुण्याई खर्च होउंदे पण गाईला जिवंत ठेव'. अशी पतितपावन महाराजांनी नर्मदेला प्रार्थना केली. ककेरी नदी संगम पार करुन ७॥ च्या सुमारास आम्ही बडीछी पारनेर गावी मुक्काम केला.

दुपारी उन्हामुळे पाय फार पोळत. तशात वाट जरा अवघड होती. एकीकडे नर्मदेचा प्रवाह व बाजूला उंचवटा अशावेळी एका झाडाच्या बुंध्यातून जाताना पाय अडकून मी पडलो. पण सुदैवाने हाताला झाडाची फांदी लागल्याने वाचलो.

अनुक्रमणिका

## हनुमान जयंती

२१ एप्रील. हनुमान जयंती ! पहाटेच नर्मदा तीरावर पतीत पावन मंडळी मुक्कामाला होती. तिथे मी व दादा गेलो. उगवत्या सूर्याचे दर्शन केले. राम व मारुतीरायांचे भजन म्हणत आम्ही हनुमान जयंती साजरी केली. पुढे वाटचाल चालू ठेवतांना हा मार्ग फार अवघड आहे, हे वारंवार जाणवत होतं. नर्मदाप्रवाह स्वच्छ होता. पण घाट नसल्यामुळे आंघोळीकरता पाण्यात जपून उतरावे लागे. सात धाराच्यापुढे भागनेर नर्मदा संगमाजवळ, औदुंबराच्या झाडाखाली दुपारी मुक्कामाला थांबलो. स्नान, संध्या, पूजा, स्वयंपाक व जेवणे झाल्यावर आराम करत असतानाच भागनेरनदीकडून एक मोठा दोनशे उंटाचा तांडा येताना दिसला. तांड्याला नर्मदेचा उतार पाहून पलिकडे नेताना रखवालदाराची त्रेधातिरपिट उडत होती. पण त्यानी अगदी छोट्या बच्च्यांनासुद्धा पलिकडे नेले. ही गंमत पहाण्यात माझी दुपार केव्हां सरली त्याचा मला पत्ताच लागला नाही.

परिक्रमावाले साधुसंन्याशी लहान मुलांना पळवून नेतात अशी हूल उठल्याने आम्हाला या बाजूच्या प्रवासात जास्त त्रास झाला. आश्रय शोधण्यासाठी बरेच कष्ट पडत. या पार्श्वभूमीवर रात्री महू गांवी मुक्कामाची जागा शोधताना एका गरीब शेतकऱ्याने आम्हाला त्याच्या घरी जागा दिली. दोन दिवसापूर्वीच त्याच्या घरातील लहान मुलाचे निधन झालेले होते. त्या शेतकरी कुटुंबाच्या मनाचा मोठेपणा लक्षात रहाण्यासारखा होता.

उत्तर तीरावरील प्रवासाला सुरुवात झाल्यावर उन्हाळा वाढू लागला होता. अनवाणी पायांनी उन्हाची चाल, खडकाळ मार्ग आणि सामानाचं ओझं या सोबत पायांना लहानमोठ्या जखमा होत होत्या. त्यामुळे दादांना आणि मला फार अशक्तपणा जाणवत असे. रात्री पायांना मेणाचे मलम किंवा व्हॅसलीन मी नियमित लावत असे. त्यामुळे पाय सकाळी जरा बरे असत. पण थकव्याचे काय? शेवटी मी गुळाच्या पाण्यात रात्री तयार केलेल्यातले गाकर पहाटे खाण्यासाठी ठेवू लागलो. पहाटे गाकर खाऊन निघाल्यामुळे थोडा उत्साह वाढत असे. दुपारी पोटभर जेवण व रात्री परत १॥/२ गाकर व मिळाल्यास चहा घेणे, असा आहार सुरू केल्यामुळे मला थकवा कमी वाटू लागला. शिवाय वाटेत मिळणारा नैसर्गिक खुराक म्हणजे फळे, पाला व कच्चे दाणे वगैरे तोंडी लावणे असे.

जोशीपुरा गांव सोडल्यानंतर नर्मदाकिनाऱ्याचा मार्ग फारच कठीण होता. जंगलझाडी, निर्मनुष्य रस्ता व अत्यंत अवघड पाऊलवाट, यातून जाताना दोन वेळा तोल जाऊन खाली पात्रात पडतो की काय असे वाटले. बघवाड्याजवळ किनाऱ्यावर वरच्या बाजूला एक बंदूकधारी आमच्या मार्गावर बसलेला दिसला. मनातून थोडी भीती वाटली. पण त्याने काही केले नाही.

रामनगर नंतर दक्षिणतीरी तवा नदीचा संगम लागला. येथे विंध्य पर्वताची सावली कांही विशिष्ट दिवसांत नर्मदा पात्रात पडते. त्यावेळी येथे मोठी जत्रा भरते. तेव्हा नर्मदेत स्नान करण्याचे फार महत्व असते अशी माहिती कळली. गंजगाव, मढावन करून रात्री बनेठा गांवी श्रीराम मंदिरात मुक्कामाला थांबलो.

अनुक्रमणिका

नादनेर गांव मागे टाकून भारकच्छ या गावी आलो. येथे भृगु ऋषींनी तपश्चर्या केली अशी आख्यायिका कळली. येथे सदावर्त घेतले. त्यात सातूचे पीठ बरेच मिळाले. स्वयंपाक, जेवण करून पुढे निघालो. सायंकाळी बिशेर गावी पोचलो. अंधार पडू लागला, पण वस्तीसाठी आश्रय ठिकाण मिळेना. गांवाबाहेर बाजूला नर्मदाकाठी एका मंदिराजवळ आलो. तर मंदिर अगदीच खराब स्थितीत होते. शेवटी निर्मनुष्य अशा नर्मदा किनारी एका आंब्याच्या झाडाखाली मुक्काम करायचे ठरले. तिथे बाजूलाच एक लग्नाचं वऱ्हाड थांबलं होतं. नर्मदेवर हातपाय धुवून पाणी पिऊन आलो. त्यावेळी कळलं की हे वऱ्हाड रात्रभर इथे राहणार आहे. लग्नघराची सोबत मिळाल्याने आम्हाला बरं वाटलं. एक पेट्रोमॅक्स व बैलगाडी या मंडळींजवळ असल्याने त्या निर्जन, अंधाऱ्या जागेचे रुप बदलले. आम्हीही निर्धास्तपणे रात्री आराम केला.

**बाबाजींचा अविश्वास**

सकाळी भिलाडियाहून तेंदूनी नदी, पिपरी गांव, सरी गावावरुन मांगरोल गांवी आलो. तेथील श्रीराममंदिरातल्या बाबाजींची मनोवृत्ती चांगली वाटली नाही. त्या बाबाजीने दादांशी उगाचच वाद घातला. 'इतक्या लवकर सहा महिन्यात, नर्मदा-परिक्रमा पूर्ण करणे शक्य नाही, तुम्ही खोटे सांगताहात,' असे त्यांचे म्हणणे होते. बलबला कुंड पाहिले का, वगैरे प्रश्नही विचारले. आम्ही त्यांना आमच्याजवळील दाखला दाखविला. पण ते त्यांना फारसे पटले नसावे. कारण थंडाई छानने चालू असल्याने बाबांच्या अंगात तिचा संचार झाला असावा असे आम्हास वाटले. रात्री बरहागांवी मुक्काम केला. पतीतपावन आणि मंडळींची ब्रह्मांडघाटावर परिक्रमा संपणार होती. त्यावेळी आम्ही तेथे पोचावे, अशी त्या मंडळींची इच्छा होती.ही मंडळी आमच्या थोडे पुढे मुक्कामाला असत. या प्रवासात मंदिराजवळ भगव्या किंवा लाल रंगाच्या ध्वजासोबत हिरवा, लाल, पांढरा अशा वरून खाली क्रमाने पट्टे असलेला ध्वजही लावायची पद्धत दिसली.

बहरा गावाहून निघालो. वाटेत केतूने तपश्चर्या केली, त्या केतूधामानंतर खाडनदी, सुलतानगंजवरून बोरासला आलो. येथे खूप मोठे व चांगले श्रीराममंदिर असून येथील संस्कृत पाठशाळेत १८ विद्यार्थी शिक्षणासाठी राहिले आहेत. दि. २९ ला रामपुरागांवी मुक्काम होता. येथील कांही मंदीर घरासारखीच बांधलेली आहेत. त्यावर कळस किंवा शिखर नसते.

सकाळी रामपुराहून निघालो. हिरापुरनंतर करोंदागांवी हिरवीगार वाडी, प्रेमनारायण यांचा वाडा व तगडा घोडा दिसला. सहज मुनीमाजवळ खाव्यासाठी काही मिळेल का यांची चौकशी केली. तो म्हणाला, 'घोडा रोज २४ मैलांची दौड करू शकतो. त्यामुळे त्याला रोज १॥ पाव तुपाचा खुराक आम्ही देतो.' पण आम्हाला मात्र तिथे शिधाच काय पण गुळाचा खडाही मिळाला नाही. तेथील एका बागवानाने मात्र आम्हाला दोन कच्चे कलमी आंबे दिले. रात्री बिलघरी येथे एका वाड्याच्या ओट्यावर मुक्काम केला.

**मे महिन्याचा उन्हाळा**

अनुक्रमणिका

एप्रिल संपून मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील दिवस. बिलथरी सोडून सिमरिया, बाऱ्हाहगांव, कन्हैयागांव, छत्रापूरवरून पुढे निघालो. आज ब्राह्मांडघाटावर लवकर पोचायचं होतं. त्यामुळे वाटेत कुठे विश्रांतीला थांबलो नाही. दोन शेते ओलांडून पुढे गेलं की ब्राह्मांडघाट लागतो असं कळलं होतं. टाररोड आला. पाय पोळू लागले. झाडांच्या सावलीचा आधार घेत पुढे जात होतो. पण ब्राह्मांडघाट काही येईना. वाटेत लागलेल्या चौरापाटा गांवी मुक्काम करावा असे वाटू लागले. पण धर्मशाळा चांगली नव्हती. व स्वयंपाकासाठी लाकूड फाट्या पासून जमवाजमव करण्यालायक गांवाची परिस्थिती नव्हती. तेथे आम्ही चहा घेतला व विश्रांती घ्यायचं ठरविलं. तेवढ्यात एक यात्री दिसला. तो म्हणाला 'चला बाबाजी येथून १॥ मैलावर ब्राह्मांडघाट आहे.' थोडा गूळ खाऊन पाणी पिऊन भर उन्हात त्याच्याबरोबर निघालो. पाय फार पोळत होते, म्हणून दोन वेळा गोणपाट बांधण्याचा प्रयत्न केला. पण जमलं नाही. शेवटी फुफाटा टाळत दगडांवरुन, पानांवरुन चालत ब्राह्मांडघाटावर पोचलो. मोठ्या वडाच्या पाराजवळील धर्मशाळेत ओसरीवर पोचलो, तेव्हा दुपार झाली होती. पूजा, स्वयंपाक, जेवण व थोडी विश्रांती झाल्यावर आम्ही पतीत पावन मंडळींची चौकशी केली. त्यावेळी एक वृद्ध नानाजी म्हणाले 'हां, वे आये थे और कलही यहाँ से चले गये!'

इतक्या लवकर पोचून कढई व भोजन, पूजा करून ही मंडळी येथून निघून गेली, याचे जरा आश्चर्य वाटले. त्यामानाने आम्ही फारच मागे राहिलो हे सिद्ध झाले. रात्री जवळच चालू असलेल्या यज्ञ मंडपात कुणीतरी हिंदी भजन म्हणत होते. भजन म्हणण्याची ढब, आवाज व चाल ऐकून मला हांसोट येथील एकतारीवाल्या पटेलबाबांची आठवण झाली. जणू तेच इथे भजन म्हणताहेत, असं वाटलं. तिन्ही सांजेला श्री. प्रभाकरपंत सरदेसाई हे चोवीस अवतारापासून महाशिवरात्रीला परिक्रमेला निघालेले गृहस्थ भेटले.

आम्ही ब्राह्मांडघाटाला पूर्ण दिवस विश्रांती घेतली. श्री गणपतराव चौधरी यांचे घरी मुक्कामाला जागा व पूर्ण सदावर्त मिळाले. कपडे दुरूस्ती, पत्रे लिहिणे वगैरे कामे आरामाने पूर्ण केली. दुसरे दिवशी ब्रम्हांडघाटातून निघायचे ठरविले होते. सकाळी तयारीही केली. तोच आमचे परिक्रमावासी मित्र 'पतितपावन व मंडळी' आलेली दिसली. ते रात्री उशिरा ब्रह्माण्डघाटाला पोचल्याचे त्यांनी सांगितले. म्हणजे आम्ही दोघा म्हाताऱ्यातले तारुण्य आजमावण्याचा हा दुसरा योग आला. पूर्वी रामनारायण हा तरुण असाच आमच्यापूर्वी निघालेला आमच्या नंतर चार तासाने श्री शूलपाणेश्वर मंदिरात पोचला होता.

पिलानखा, हिरणपूर, बुरशीगांवावरून गोलकागांवी पोचलो. तेथील गोविंदगीर गोस्वामी फारसे शिक्षित नव्हते. पण रहाणी व विचार थोर वाटले. रात्री रामपुरागांवी मुक्काम केला. श्री प्रभाकर सरदेसाई तेथे आले. ते काही दिवस आमच्या बरोबर परिक्रमा करणार म्हणाले.

कोरपानी गांव, पिठोरा, बाबरीया मुगरि वरागांवानंतर डोंगरगांव येथील माखनलाल लोहार यांचे कारखान्याच्या आवारात, त्यांनी फार आग्रह केल्याने, मुक्काम केला. श्री माखनलाल हे कुशल कारागीर असून अत्यंत मेहनती दिसले. त्यांनी स्वतः परिक्रमा केली होती. मात्र त्यांच्या तरुण मुलात त्यांची धडाडी दिसली नाही. श्री माखनलाल यांनी आमची व्यवस्था चांगली केली.

अनुक्रमणिका

रोहिणीगांव, अमोघागांव, हिरापूर वरून पुढे चाललो असता मागील टेकडीवरील बाबाजींनी सत्तूचे सदावर्त घेण्यासाठी आम्हाला आवाज दिला. परत मागे जाऊन टेकडीवर गेलो. बाबाजींनी तिघांनाही गूळ व सत्तूचे पीठ दिले. बाबाजींची छोटीशी मठी, छोटा बगीचा व आश्रम चांगला वाटला.

पुढे हरिणीनदीतून (जबलपुर जिल्हा) जुगपुरागांवी आलो. दुपारी मुक्कामासाठी जागा मिळाली नाही. पुढे पावलागांवी एका प्रायमरी शाळेत व्हरांड्यात थांबलो. गांवातून सदावर्त आणले. रात्री बरबटी गांवातील शेवटच्या घराच्या अंगणात रात्री मुक्काम केला. अमावस्या होती. त्यामुळे घराच्या भिंतीना सफेदी देणे सुरु होते.

बरबटीवरून झालोन गांवी आलो. प्रकृती जरा बरी नव्हती. झालोन गांवी सदावर्त मिळाले पण स्वयंपाक व आराम करायला जागा मिळाली नाही. शेवटी नर्मदा किनारी एका उंच टेकडीवरील ओसाड मारुती मंदिराच्या जवळ जागा स्वच्छ करून स्वयंपाक, जेवण व विश्रांती घेतली. पाणी आणण्यासाठी चढउतार करावा लागला. याचा त्रास झाला. पुढे सायंकाळी कुसली गांवी रात्रीचा मुक्काम केला. इतका उन्हाळा असूनही नर्मदेला मिळणाऱ्या अनेक लहानमोठ्या प्रवाहांना, झऱ्यांना खळखळत पाणी वाहताना दिसले.

ती. दादा व सरदेसाई 'जबलपुरला येणार नाही'. म्हणाले ते दुसऱ्या मार्गाने भेडाघाटला गेले. मी कुसली गांव, उमरिया, नटवारा करुन दि. ८ मे ला कुडनगांवी खुशालसिंग ठाकुरांच्याकडे मुक्कामाला थांबलो. दोन दिवसांपासून त्यांच्या मेहुण्याची प्रकृती गंभीर होती. पण त्यांनी सांगितले, 'आपण परिक्रमावासी. आपण जागा शोधत हिंडणे आम्हाला पसंत नाही. तेव्हां येथेच मुक्काम करा.'

## जबलपूरात आप्तेष्टांच्या भेटी

नंतर जबलपूरला जाण्यासाठी पहाटेच निघालो. भाचा चि. अच्युत परांजपेकडे चार दिवस खूप आराम केला. सौ. शुंभाने अगत्याने केलेल्या सेवेमुळे माझी प्रकृती खूपच सुधारली. पायाचे कमी झाले. नव्या उमेदीने दि. १३ मे ला धमासा गांवी जाण्यास सायंकाळी जबलपूर सोडले.

दि. ७ मे पासून १२ मे पर्यंतचा प्रवास (कुसुलीगावा पासून जबलपूर पर्यंतचा) नर्मदा किनारा सोडूनच झाला होता. आणि पुढेही जोगीटिकरीया पर्यंत १० दिवसांचा प्रवास पक्क्या रस्त्याने, जवळच्या मार्गाने करावयाचे ठरविले म्हणजे १६ दिवस नर्मदेचे स्नान वा दर्शन होणार नव्हते.

धमासा, पिपरिया, तिलसानी, महगवा, सरवाही, गुरैय्या हे मुक्काम करत दि. १९ मे ला पुढे निघालो. पुढे शहपूर गांवी चमरकुंडीनदीच्या काठावरील मंदिरात गेलो. हे स्थळ एका बाजूला असल्याने शांत वातावरण होते. पण या मंदिराचे व्यवस्थापक गेंदालालजी महाराज हे स्वामी असूनही तामसी वृत्तीचे व उद्धट होते. मी व दादा दोघेही तापट त्यामुळे आमचे त्यांच्याशी थोडे खटकलेच. त्यांनी थोडा शिधा दिला होता. लाकडे मात्र रागाने अंगणात फेकली. आम्ही परिक्रमावासी म्हातारे असलो तरी लाचर नाही, हे त्यांनी जाणले. आम्ही

अनुक्रमणिका

लाकडे उचलली व शिधाही घेतला. मात्र येथे पाणी न मिळाल्याने खोदलेल्या झऱ्यातून गढूळ पाणी आणले. पुढे कसदा नदीवर स्नान केले. दादांनाही आता थकवा जाणवू लागल्याने आमचा प्रवासाचा वेग कमी झाला होता. सायंकाळी दुसऱ्या एका बाबाजींनी आम्हाला भाजलेली बेलफळे दिली. मला हे खाद्य आवडले. आज मुंगळ्यांनी फार त्रास दिल्याने रात्री झोप नीट झाली नाही.

विक्रमपूर गांवी पूर्ण मुक्कामाला थांबलो होतो. आज मार्गात हल्यांचे दोन कळप दिसले. पैकी ६३ हल्यांचा एक कळप बुंदेलखंडातून सव्वा महिन्यापासून निघून बिलासपूरला १५ दिवसांनी पोहोचणार असे कळले. दुसरा ७९ हल्यांचा कळप झांशीपासून पंचवीस दिवसांपूर्वी निघालेला बिलासपूरलाच जाणार होता.

विक्रमपूर गावाच्या शेवटी एका धर्मशाळेत मुक्काम केला. जबलपूरपासून ११७ कि. मिटरवर हे गांव आहे. अजून ११६ कि. मीटर अंतर अमरकंटकला पोचण्यासाठी चालावे लागणार होते. विक्रमपूर धर्मशाळा सोडली. दुपारी मुक्कामाला कुठेही सोय झाली नाही. शेवटी घुनसी नदी जवळील एका दारूभट्टीत गेलो. त्यांनी आपुलकीने जागा व भरपूर सदावर्त दिले. अजून काही लागले तर सांगा असेही सांगितले. नदीच्या पात्रातील पाण्यात स्नान केले. स्वयंपाक झाडाखालीच केला, पण पावसाचा रंग दिसल्याने भट्टीचे सामान ठेवण्याची मोठी झोपडी होती तेथे जाऊन जेवण केले. तेथे कडवट, उग्र आणि थोडासा गोडसर वास येत होता. दादांना वासच येत नसल्याने त्यांचा प्रश्नच नव्हता. आणखी एक परिक्रमावासी तेथे आला पण वासामुळे तो तिथून निगून गेला. मला मात्र निघून जावेसे वाटले नाही. उलट मी तेथे भट्टीची रचना पाहिली.

### नर्मदा स्नान

घुनसी नदी-शाहपुराहून निघालो. धमनगांव, न्यूसापौंडी, माडिआकलावरून पुढे निघालो. जोगी टिकरिया घाट उतरत असता लांबून नर्मदा नदीचे दर्शन झाले. सोळा दिवसांनंतर नर्मदा स्नान होणार म्हणून मला आनंद झाला. घाट संपता संपता एक पदयात्री आमचेकडे येताना दिसले. जवळ आल्यावर पाहतो ते प्रभाकर सरदेसाई होते. जबलपुरपासून त्यांची आमची भेट झाली नव्हती. दुपारी आम्ही जोगी टिकरिया गांवाबाहेरील एका धर्मशाळेत थांबलो. त्यावेळी तिथे 'पतित पावन महाराजांची' पुन्हा भेट झाली. मी त्यांना सांगितले की आम्ही ३ जूनच्या दरम्यान अमरकंटकला पदयात्रा पूर्ण करु. त्यावेळी तुम्ही तेथे कढईकरीतां अवश्य यावे. रात्री मुक्कामाला आम्ही देवरा गांवी नर्मदाकिनारीच्या उंच टेकडीवरील देवी मंदिरात थांबलो. तेथे श्री सीतारामजी केरळवाले महाराज दिसण्यात सर्वसाधारण पण अध्यात्मात अधिकारी असलेले सत्पुरूष भेटले. तसेच श्री. शिवचरण शुक्ल हे गुजराथी ब्राह्मांड गेल्या वर्षीपासून येथे मुक्कामाला आहेत. २४ लाखाच्या गायत्री पुरःचरणाचा त्यांनी संकल्प केला असून आणखी दोन वर्षांनी तो पूर्ण होईल असे ते म्हणाले. (घरचे संसारी असून त्यांना बायको, मुले आहेत.) ते दिवसभर बराच जप करतात. सायंकाळी आरती झाल्यावर मौन सोडतात. रात्री ८ वा. त्यांचे मौन संपल्यावर त्यांचे सोबत गोष्टी झाल्या. त्यांनी स्वतःकरता केलेल्या भाजीपुरीत आम्हालाही भागीदार केले. रात्री अचानक पाऊस आल्याने झोपेकरता गुंफेजवळची खोली मला मिळाली.

अनुक्रमणिका

दिंडोरी, लुटगांव, उदरी गाव करून दुधी गावी आलो. आज पाणी व भिक्षा दोन्हीची वानवाच होती. दादा व सरदेसाई दोघेही भिक्षा मागण्यास निघाले होते. दादांना व मला दोघानांही जास्तच थकवा जाणवू लागल्याने पाणी, लाकडे गोळा करणे, सदावर्त आणणे व स्वयंपाक या गोष्टींचा त्रास जास्त जाणवू लागला. मात्र सरदेसाईंची मदत असल्याने थोडे बरे होते. आमच्या दोघांचाही परिक्रमा ठरल्या दिनांकालाच पूर्ण करण्याचा निर्धार असल्याने, कितीही त्रास झाला तरी नाऊमेद होत नव्हतो. आजचा सर्व प्रवास गोटाड व खराब मार्गाने झाला.

दुधीगांवा नंतर ग्राम विजापुरी येथे स्नान, स्वयंपाक, जेवण व थोडा आराम करून पुढे निघालो. अर्ध्या पाऊण तासात पावसाची जोरदार सर आली. प्रायमरी शाळेत असलेल्या गायी व बकऱ्या यांना बाजूला करून तिथे जरा वेळ थांबलो. सायंकाळी कचराटोला या गांवी एका शाळकरी मुलाने त्याच्याघरी मुक्कामाला यायचा आग्रह केला. त्याचे वडील श्री. बन्सीलाल कलार यांनी चांगली सोय केली. रात्री आरती, पंचपदी हे दैनंदिन कार्यक्रम आटोपल्यावर पडवीत झोपलो.

पावसाचा रंग होता म्हणून सूर्योदयानंतर कचराटोला सोडले. तेढी नर्मदा संगमावरील तेढी, लालपूर, कांचनपूर नंतर शिवालाघाट येथे श्री. धारानगरी १०८ श्री रामदासजीच्या आश्रमात मुक्कामाला थांबलो.पिंपळ, वड, कडूलिंब, आम्रवृक्ष व आवळा ही पांच झाडे असतील त्याला पंचवटी म्हणतात. येथे बरीच झाडे होती.

शिवाला घाट येथे सोमनाथाची गुंफा नदीत आहे. वरून दिसत नाही. नर्मदेच्या प्रवाहात खूप मोठ्या हत्तीच्या पायाचा नखासहित खोल आकार (पोकळ पाय) दिसतो. त्यात उत्तरवाहिनी महादेवाची पिंडी आहे. पाण्यात गुंफात आणखी दोन ठिकाणी मोठ्या खळग्यात अशाच प्रवाहाने तयार झालेल्या नैसर्गिक महादेव पिंडी आहेत. नर्मदेच्या उत्तर तीरी नीलगंगा व दक्षिण तीरी नागनाथ गंगा असून येथे शिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

शिवालाघाट येथे पाऊस आल्याने उशिरा निघावे लागले. नीलगंगा, पात्रा गावावरून घगरा टोला (टोला याचा अर्थ गावाचे बरेच विभाग एकत्र असणे. एक एक गावी असे ७/८ टोला असतात.) वरून बरेच पुढे गेल्यावर धमेडी गांवी मुक्कामाला आलो. वाटेत काही संयोगी नद्या (ज्या नर्मदेपेक्षा रुंद पात्राच्या व मोठ्या प्रवाहाच्या) दिसू लागल्या.

तसेच सकाळपासून दूरवरच्या डोंगरांच्या रांगा दिसू लागल्या. लहान मोठे खोल वा उथळ नाले, नद्या, जंगलझाडी व चढावमार्ग असा मार्ग होता. भीमकुंडी गांवी कालपासून रामधून चालू असून तेथे भोजन मिळेल, असे गांवकऱ्यांनी सांगितले. आता नर्मदेचं पात्र फारच किरकोळ दिसू लागलं होतं. रात्रीचा मुक्काम भीमकुंडी गावात केला.

## अमरकंटकला पुनरागमन

अनुक्रमणिका

हर्राटोलावरून, मिरीग्राम मार्गे दमदमगावी पोहोचलो. गाव अगदी ओसाड व छेटे होते. तेथे नर्मदा नदी शोधावीच लागली. लहानशा ओढ्यासारखी होती. येथूनच कपिलधारेला जायचं असं दादांनी सुचविल्याप्रमाणे, स्नान व पूजा, जेवण करून पुढे निघालो. बराच मार्ग चालल्यावर उजवीकडील झुकत्या पाऊलवाटेला लागलो. दोन फर्लांग चालल्यावर लक्षात आले की आम्ही रस्ता चुकलो. परत मागे येऊन फाटाफटीला(पाऊल वाटेच्या प्रारंभापर्यंत) आलो. वाटेत एकही व्यक्ती भेटली नाही. आम्ही आपले कपिलधारा शोधत चाललो होतो. अचानक श्री. सरदेसाई म्हणाले ‘कपिलधारा बरीच मागे गेली’. त्यामुळे थोडी विश्रांती घेऊन कपिलधारेच्या शोधात दुसऱ्या मार्गाने निघालो. तोच लांबून एक गुराखी दिसला. त्याला ओरडून विचारले तर तो बहिरा होता. त्याच्या जवळ गेल्यावर त्याने सांगितले की कपिलधारा २/२॥ मैल मागे राहिली. आता येथून अमरकंटक जवळ आहे. त्यामुळे पाणी पिऊन जरा वेळ आराम केला व सरळ अमरकंटकलाच जायचे आम्ही ठरवले. जाता जाता मी सहज सरदेसाईंना विचारले ‘कपिलधारा स्थान मागे राहिले असे तुम्ही एकदम कसे म्हणालात?’ तेव्हां त्यांनी सांगितले "माझ्यातल्या ब्रम्हराक्षसाने मला तशी सूचना दिली. गेल्या सात वर्षांपासून एक व्यक्ती, या रुपाने मला त्रास देते. त्यामुळे अनेकवेळां माझ्याकडून इच्छा नसली तरी विसंगत वागणूक होते. कधी सतत जुलाब (याचा प्रत्यय आमच्या बरोबर ते असताना येत असे)तर कधी पोटदुखी अकस्मात उद्‌भवते. तेव्हां मी गाणगापूरला गेलो. तिथे मला दृष्टांत झाला की तू नर्मदापरिक्रमणाला जा. तीन वर्ष परिक्रमा पूर्ण करण्यात जातील. तोपर्यंत या ब्रम्हसमंधाची दहा वर्षांची मुदत पूर्ण होईल. व या त्रासातून तुझी सुटका होईल. म्हणून मी महाशिवरात्रीपासून परिक्रमेस निघालो आहे." अशी होती सरदेसाईंची परिक्रमकथा!

आता दुपारचे उन्हाने पाय पोळत हाते. अमरकंमटक गाठायचे असा निर्धार असल्याने तसेच पुढे चालत होतो. गांव बऱ्याच लांबून दिसू लागले. पण अंतर सरत नव्हते. तशात रस्ता पक्का असला तरी कंकरांनी भरलेला होता. कुठेही पाय ठेवा ते पायाला टोचत होते. सकाळपासून जवळ जवळ १४ मैलांची चाल झाली होती. आता या शेवटच्या तीन मैलांनी मात्र डोळ्यात पाणी आणायला सुरूवात केली. शेवटी ॲग्रीकल्चर फॉर्म महाविद्यालय, बगीचे, नवीन वस्ती मागे टाकून चौदा मैलांचा प्रवास पूर्ण करून श्री नर्मदामाईच्या मंदिरात दुपारी चार वाजता येऊन पोचलो. खऱ्या अर्थाने परिक्रमा पूर्ण झाली. या आनंदाने प्रथम नर्मदामाईला साष्टांग नमस्कार घातला व नंतर दादांना कडकडून भेटलो.

वास्तविक कपिलधारेवर एक दिवस विश्रांती घेऊन दि. २ जून १९७० ला अमरकंटकला पोहोचण्याचा आखलेला कार्यक्रम, दोन दिवसअ अधीच कसा पार पडला याचेच आश्चर्य वाटले. अमरकंटकला येऊन मग कपिलधारेवर जावे अशीच कदाचित माईची इच्छा असेल, असे मी समाधान केले.

अमरकंटकला श्रीमती रामबाईंनी अम्हाला एक स्वतंत्र घर रहायला दिले. कोटीतीर्थांची पूजा व कढई झाल्याशिवाय नर्मदेचे दर्शन घेता येत नव्हतं. गायत्रीदेवी दर्शन, पूजा, गावांत फिरणे आणि विश्रांती अशा कार्यक्रमात दिवस आरामात जात होता. रामबाईंनी विचारल्यावरुन परिक्रमेची माहिती व प्रवास वर्णन त्यांना सांगत होतो.

अनुक्रमणिका

दोन दिवसानंतरची गोष्ट! तिन्हीसांजेला आम्ही नर्मदेची आरती म्हणत होतो. अचानक माझ्या घरची मंडळी त्यावेळी आली आणि मला आनंद झाला. दि १२ डिसेंबरला परिक्रमेला निघण्यापूर्वीही अशाच सायंकाळच्या आरतीच्या वेळी आमची पाहुणेमंडळी येथे आली होती याची आठवण जाली व योगायोगाची गंमत वाटली.

रात्री पिठले भाताचे साधेच जेवण पण खूप चविष्ट वाटले. मंडळींच्या हातचे सुग्रास जेवण आणि तेही आयते हा दुग्धशर्करा योग साधला गेला. शिवाय दादा आणि मी दोघांनी सर्व कामापासून आज सुट्टी मिळाली होती.

दुसऱ्या दिवशी कोटीतीर्थावर सर्व मंडळी पूजेसाठी जमलो. त्याचवेळी पावसाचा शिडकावा झाल्याने शुभशकून वाटला. सर्व देवतांची पूजा केल्यावर माझ्या सौभाग्यवतीने श्री नर्मदामातेची खणानारळाने ओटी भरली. धर्मशाळेतील प्रशस्त जागेत कुमार-कुमारिका पूजन झाले. दादा व मी यांची एकत्रच कढई होती. दहा कुमारिका, चार कुमार. ब्राह्मण व संन्याशी यांना गोडाचे जेवण व दक्षिणा देऊन संतुष्ट केले.

संध्याकाळी माईका बगीया येथे गेलो. दर्शन व ओटीभरणं झाल्यावर मी बरोबर आणलेले रत्नाकर (समुद्र) जल नर्मदा कुंडात सोडले व दोन बाटल्यामध्ये नर्मदा जल भरुन घेतले. तेथून शोणभद्रा उगमावर जाऊन तीन मैलांची नर्मदा उगमस्थानाची प्रदक्षिणा सर्वांनी पूर्ण केली.

## अमावस्या पर्वणी योग

वैशाख वद्य ३० शके १८९२! शनैश्वर जयंतीचा दिवस! कपिलधारा, दूधधारा व परत अमरकंटक अशी दहा मैलांची पदयात्रा करण्याचे सर्वांनी ठरविल्याने माझा ऊत्साह अधिकच वाढला. मधून मधून पावसाची सोबत घेत आम्ही कपिलधारेला पोहोचलो. पाऊलवाटेने प्रथम दूधधारेकडे गेलो. आज त्याची धार खूपच मोठी होती. तांबूस रंगाच्या पाण्याच्या धारेखाली सर्वांनी मनसोक्त आंघोळी केल्या. वाटेत अनेक मृगाचे किडे दिसल्यामुळे नातू चि. रविन्द्र व मिलिंदने ते पकडण्यात काही वेळ घालविला.

कपिलधारेवर दर्शने घेऊन, अवघड मार्गाने जाऊन कपिलधारेचे मनोहारी दृष्य पाहिले. सायंकाळी परतलो त्यावेळी माझ्याशिवाय अन्य सर्व मंडळी दहा मैल चालीने बरीच थकली होती.

दुसऱ्या दिवशी श्री. मुकुंदराय महाराजांकडून परिक्रमा पूर्ण केल्याचा दिनांक व मोहोर माझ्या वहीत घेतली. दादा त्यांच्या नातेवाईकांसह नागपूरला रवाना झाले.

मी श्री. प्रभाकर सरदेसाई यांना परिक्रमेसाठी लागणाऱ्या अनेक उपयुक्त वस्तू व शुभेच्छा दिल्या.

अनुक्रमणिका


**परिक्रमेची सांगता**

रेल्वेनी बिलासपूर, भोपाळ, इंदूर करुन दि १५ मे ला आम्ही ओंकारेश्वराला गेलो. अभिषेक, पूजा करून ओंकारेश्वर, पंचक्रोशीला प्रदक्षिणा घातली. (ओंकारेश्वराला नावेतून जावे लागते त्यामुळे परिक्रमेत तेथे जाता येत नाही) गौरी सोमनाथ मंदिराचे दर्शन घेतले. झोपलेल्या मारोतीचेही मंदिर असल्याने त्याचेही दर्शन घतले.

दुसऱ्या दिवशी ओंकारेश्वराला अभिषेक व कढई कार्यक्रम केल्यावर परिक्रमेची सांगता झाली.

आता नागपूरला जाण्याचे वेध लागल्याने लगेच रेल्वेनी सौ. मनोरमा गोखलेंसह दि. १७ ला दुपारी नागपूरला पोहोचलो. स्टेशनवर स्वागतासाठी नातेवाईक, परिचित आले होते.

टेकडीवरील श्री गणेश मंदिरात प्रथम दर्शनाला गेलो. आमच्या आगमनाप्रित्यर्थ सकाळपासून गणपती अर्थात शीर्ष पठण चालू होते. गणेश दर्शन, आरती झाल्यावर स्वागताई जमलेल्या मंडळींनी श्री नर्मदामाईच्या जलकलषासह मिरवणूकीने, आम्हांला घरी नेले. आमचे महाजनचाळवासी. अनेक परिचित, आप्तेष्ट भाविक मंडळी या स्वागत समारंभात सहभागी झाले होते. पण शिवराज लिथो वर्क्सच्या माझ्या कर्मचारी बंधूंच्या स्वागताने मी खूपच भारावलो. ही मिरवणुक संपेपर्यंत रात्रीचे नऊ वाजले.



श्री नर्मदा परिक्रमेहून परतल्यावर दि. १७ जून १९७०ला नागपूर येथील स्वागत प्रसंगी - डावीकडून श्री. बाळ देशपांडे, श्री. शंकरानंद महाराज, कन्या सौ. सुधा रानडेसह.



श्री नर्मदा परिक्रमा करून नागपूरला परतल्यावर दि. १७ जून १९७०ला शिवराज लिथो वर्क्सच्या कामगार बंधूंनी केलेले स्वागत.

## अनुक्रमणिका

श्री नर्मदामाईचे आशीर्वाद, सर्वांच्या शुभेच्छा आणि मनातील जिद्द या पाठबळावर, योजलेल्या कालावधित श्री नर्मदा परिक्रमा पूर्ण झाली होती. अनेक वर्षांपूर्वी सोडलेला संकल्प पूर्ण झाल्याने मला अतीव आनंद व समाधान वाटले.

**नर्मदे हर!**

***

अनुक्रमणिका

# समारोप

आनंदयात्री आबाजींच्या आयुष्यातील अत्युच्च आनंदाचा काळ म्हणजे त्यांनी आसेतु भारत केलेल्या या विविध परिक्रमा.

नोव्हेंबर १९५४ मध्ये वयाच्या एक्कावन्नाव्या वर्षी पदयात्रेच्या अभ्यासास आबाजींनी प्रारंभ केला. त्यावेळीएका चालीने तीन मैलांची वाटचाल त्यांना कठीण वाटे. पण जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि संकल्प सिद्धीस नेण्यासाठी केलेले कठोर परिश्रम, यातूनच वयाबरोबर पदयात्रेतील त्यांचे नवेनवे उपक्रमही वाढू लागले. त्यामुळेच १९६१ ते १९९४ पर्यंत, वयवर्षे सत्तावन ते नव्वद वर्षे वयापर्यंतच्या चौतीस वर्षात संकल्पिलेल्या चाळीस हजार किलोमिटर्सच्या पदयात्रा त्यांनी, यशस्वीपणे ठरविलेल्या कालावधितच पूर्ण केल्या. अपवाद केवळ १९७७ मधील खंडीत झालेल्या गंगा-तुळस कावडयात्रेचा!

त्यांनी केलेल्या परिक्रमांचा कालावधि, परिक्रमेचे किलोमिटर्स आणि परिक्रमा मार्ग यांचा थोडक्यात आढावा असा :-

१९६१ ते १९७१ या कालावधित श्री क्षेत्र पंढरपूरच्या महाराष्ट्र, मराठवाडा, डाकोरनाथ, अमदाबाद, सूरत, आळंदी, अमरावती, कारंजा आदी विविध मार्गानी केलेल्या एकूण नऊ पदयात्रा, दोनशे पंचवीस दिवसात चार हजार सातशे एकोणसत्तर कि. मि.

*१९६९ व १९८१ या दोन वर्षी श्री अष्टविनायक पदयात्रा. एकोणचाळीस दिवसात तेराशे चार कि. मि.

*दि. १४ डिसेंबर १९६९ ते ३० मे १९७० या कालावधित मी नर्मदा परिक्रम.एकशे अडुसष्ट दिवसात दोन हजार चारशे अठ्ठ्याऐंशीकि.मि.

*दि. २३.१२.७१ ते १७.४.७२ प्रयाग रामेश्वर गंगा कावडयात्रा.एकशे अकरा दिवसात दोन हजार तीनशे अठरा कि.मि.

*दि. १४.१०.७३ ते १८.४.७४ श्री सप्तगंगा कावडयात्रा.एकशे सत्याऐंशी दिवसात, चारहजार एकशे सत्तावन कि.मि.

*दि. १४.१०.७५ ते २१.४.७६ भारत भ्रमण अनेक गंगोदक कावडयात्रा एकशे एक्याण्णव दिवसात चारहजार सहाशे पस्तीस कि.मि.

*दि. ५.११.११७९ ते ३०.१२.१९७९ श्री शिवगंगा दर्शनयात्रा छप्पन्न दिवसात, अकराशे एकोणचाळिसकि.मि.

अनुक्रमणिका

* १९८० ते १९९३ मधे दरवर्षी चौऱ्यागडच्या मोठ्या महादेवाच्या एकूण चौदा वाऱ्या केल्या.

*दि. ४.११.१९८१ ते १०.१२.१९८१ श्री अक्कलकोट स्वामी दर्शनयात्रा. एक महिन्यात सातशे बत्तीस कि.मि.

*दि. ३.३.१९८२ ते १९.३.१९८२ श्री राघवेन्द्र स्वामी (मूळ वृंदावन) तुंगभद्रा नदीजवळील आश्रमयात्रा. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व कर्नाटकातून सतरा दिवसात चारशे पंधरा कि.मि.

*दि. १६.१२.१९८३ ते १७.१.१९८४ वणी, नाशिक- सप्तशृंगीदेवी गड यात्रा. बत्तीस दिवसात सहाशे चौसष्ट कि.मि.

या प्रमुख यात्रांव्यतिरिक्त नागपूर जिल्हा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आदी अनेक ठिकाणच्या लहान अगणित पदयात्रा करुन आबाजींनी चाळीस हजार किलोमिटर्स अंतर पूर्ण केले.

आबाजींच्या या पदयात्रांचा इतिहास खूप माहितीपूर्ण आहे. खूप रोचक आहे. त्यांनी टिपलेले निसर्गवर्णन आणि मनुष्य स्वभावाचे बारकावे दाद देणारे आहेत. ते अभ्यासल्यानंतर आबाजी खरोखरच किती योग्यतेचे आनंद पदयात्री होते याची मला वारंवर जाणीव होऊ लागली. या त्यांच्या पदयात्रांमध्ये हजारो मैलांचा प्रवास त्यांनी केला. ‘अकेला चलो रे’ हे सूत्र सदैवच सोबत होते. १९६२ मधे पंढरपूर वारीसाठी नागपूर ते कारंजा हा एकशे चाळीस मैलांचा उन्हाळ्यातील प्रवास त्यांची सत्वपरिक्षा घेणारा ठरला. खरखरीत उन्ह, पाण्यासाठी जीव तहानलेला, जंगलातील मार्ग आणि सोबतीला कुणी नाही! पुढे दोन दिवसांनी अचानक आलेले वादळ, वीजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाने त्यांना चांगलाच तडाखा दिला.

अर्थात अशांसारखे खूप प्रसंग आल्यानंतरही ते अविचलीतपणे, नामस्मरणाच्या मनोबळावर यात्रेचा मार्ग आक्रमित. आपल्या मनाप्रमाणेच त्यांनी देहालाही विलक्षण शिस्त लावली होती. संकल्पिलेले कार्य मग ते कोणतेही असो. पूर्णत्वास न्यावयाचेच ही त्यांची जिद्द होती. अनवाजी पायांनी ऐन उन्हाळ्यात त्यांनी नर्मदा परिक्रमा, ठरल्या कालावधितच पूर्ण केली. मग पायांना भेगा पडोत, ते रक्ताळोत किंवा तापाने शरीर ग्रासो.

आबाजींचा मूळ पिंड समाजसेवकाचा. पदयात्रेतही समाजसेवा करण्याचा ते प्रयत्न करीत. यात्रेच्यावेळी आबाजींचा चेहरा विलक्षणतेजस्वी दिसे. त्यांचा साधा वेष, पांढरी दाढी व कणखरचाल याचा प्रभाव सामान्यांवर पडे. जाती-धर्म-पंथया भेदभावाच्या पलिकडे गेलेल्या आबाजींकडे अनेक निरक्षर, भावीक व संसारतापाने पोळलेल्या व्यक्ति सल्ला मागत. त्यावेळी ते योग्य मार्गदर्शन करीत. व्यसनी व्यक्तिला वेळ प्रसंगी कठोर भाषेत उपदेश करीत. पर्यावरणाचे व निसर्गाच्या तादात्म्याचे महत्व सांगत. आणि प्रत्येक कृतीमागे देशहित- समाजहिताची भावना कशी महत्वाची आहे ते पटवायचा प्रयत्न करीत.

अनुक्रमणिका

आबाजींनी केलेल्या विविध परिक्रमांना, नागपूरातील वृत्तपत्रांनी, विशेषतः दै. तरुण भारत, महाराष्ट्र, नागपूर टाइम्स, नागपूर पत्रिका, हितवाद, दै नवभारत, लोकमत आमि सा. प्रज्वलंतने चांगली प्रसिद्धी दिली. त्यांचे परिक्रमा वर्णन लिहितांना या वृत्तपत्रातील कात्रणांचा खूप उपयोग झाला. काही वृत्तपत्र, मासिके व साप्ताहिकांनी त्यांच्या मुलाखती प्रकाशीत केल्या.

नागपूरच्या हितचिंतक, मित्रमंडळी व परिचितांनीही आबाजींचे मनापासून स्वागत केले. परिक्रमा करुन आले की, त्यांना भेटायला येणाऱ्यांची रीघ लागे. या नागपूरकरांनी त्यांचे सत्कार केले. त्यांच्या पदयात्रा वर्णनाचे अनेक कार्यक्रम आयोजिले. त्यांचे मनापासून कौतुक केले. याबद्दल आबाजी अतीशय समाधानी होते. त्यांना नागपूरकरांचा खूप अभिमान होता. प्रेम होते.

पण-- तरीही त्यांना एक खंत वाटे. ते म्हणत, "विविध क्रीडा प्रकार, नृत्य, नाट्य, अभिनय, तसेच विविध छंद व उपक्रमांची शासनाकडून दखल घेतली जाते. मग पदयात्रा या उपक्रमाला शासन मान्यता कां नसावी? शासकीय सन्मान व पुरस्कार मिळावा असा माझा कोणताही हेतु नाही. फक्त पदयात्रा उपक्रमालाही प्रोत्साहन मिळावे यासाठी शासनाने पदयात्रेची दखल घ्यावी, अशी माझी तीव्र इच्छा आहे."

प्रत्येक पदयात्रेहून परततांना आबाजी वाटेत लागणाऱ्या सर्व नद्यांचे पाणी घेऊन येत. याप्रमाणे भारतातील एक्कावन्न नद्यांची "गंगा" अतिप्रयासाने एकत्रित करुन दि. १९ मार्च १९७६ ला त्यांनी श्री क्षेत्र पंढरपूरच्या विठोबाचे दर्शन घेतले. ते पवित्र गंगा जल विठोबाचे चरणी समर्पित करताना त्यांनी प्रार्थना केली, "ज्याप्रमाणे भारतातील सर्व नद्यांचे जल एकत्रित करुन हे गंगाजल तुझ्या चरणी वाहिले, त्याप्रमाणे आमच्या भारतातील सर्व देशभक्त विचारवंतांचे प्रवाह दिल्ली दरबारात एकत्रित आणून, त्या एकत्रित शक्तीसामर्थ्याने आमचा भारत सुजलां-सुफलां-बलवान होऊन अक्षय वैभवशिखरावर विराजमान होऊ दे. आम्हा भारतीयांच्या वतीने तुझ्या चरणी ही प्रार्थना!"

आबाजींच्या प्रत्येक कार्याचे सूत्र असणारी देशप्रेमाची ही भावना त्यांनी आयुष्यभर जोपासली.

धार्मिक आचरणात स्वतः शिस्तप्रिय असणाऱ्या आबाजींच्या वागण्यात, विचारांत नव्या जुन्यांची योग्य सांगड घातलेली दिसे. आधुनिक वातावरणातील बदलांची ते कौतुकाने दखल घेत. त्यामुळे त्यांची नातवंडे, नातजावई आणि नातसुना या सर्वांना आजोबांचा सहवास प्रिय वाटे. तरुण पिढीतील ही मंडळी त्यांना मोकळेपणानी आपल्या अडचणी सांगत. मित्रत्वाच्या नात्याने त्यांच्याशी गप्पा मारत.

आणि म्हणूनच आबाजींचे नागपूरातील एक स्नेही श्री. म.वि. गोखले यांनी खालील शब्दात केलेले आबाजींचे वर्णन अतीशय सार्थ वाटते.

"आबाजींचे व्यक्तिमत्व बहुरंगी बहुढंगी आहे. जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श झाल्याने ते इतके उजळले की ते कोण आहेत व कोण नाहीत हे ठरविणे कठीणच. आबाजी चालणारे आहेत पण "चालू" नाहीत. बोलणारे आहेत पण"बोलूकाका" नाहीत. ते गातात पण गायक नाहीत. स्त्री भूमिका करीत पण वृत्तीने "मर्द" आहेत.

अनुक्रमणिका

नट आहेत पण "खट" नाही धर्मनिष्ठ आहेत पण 'कर्मठ' नाहीत. श्रद्धाळू आहेत पण "अंधश्रद्ध" नाहीत. भक्ती करतात पण 'भक्तीबंबाळ' नाहीत. टाळ वाजवितात पण 'टाळकुटे' नाहीत. रूढ अर्थात श्रीमंत नाहीत पण मनाने 'श्रीमंत' आहेत. परिक्रमा करताना भिक्षा मागितली पण 'भिक्षेकरी' नाहीत. साधुवेष घातला तरी 'संधीसाधु' नाही. विधि विशारद नसले तही 'अत्यंविधी विशारद' आहेत. स्वधर्माचा अभिमान बाळगणारे पण धर्मांध नाहीत. आबाजी परधर्मसहिष्णु भारतीय नागरिक आहेत."

९४ वर्षांच्या आबाजींचे केस पांढरे झाले, शरीर बारीक होऊ लागले. बुद्धी आणि मन यांचा समतोल साधणाऱ्या आबाजींना आता नागपूरची ओढ लागली. विलेपार्ले येथे कांही वर्षांपासून चिरंजीव केशव कडे वास्तव्य करणाऱ्या आबाजींनी नागपूरला येण्याचा ध्यास घेतला. दि. २५ ऑगस्ट ९८ ला त्यांनी नेहमीच्या पद्धतीने कागदावर पट्टीने रेघा आखून सुवाच्च अक्षरात लिहीलेला एक कागद मला दिला. त्यात त्यांनी लिहिलेल्या मजकूराचा मतितार्थ असा, "मी उद्या नागपूरला जात आहे. हे माझे मृत्युपत्र नव्हे पण माझी ईच्छा लिहून ठेवतो. आयुष्यभर ज्या सचोटीने - आनंदाने मी जगलो तो वारसा माझ्या मुलांनी – नातवंडा पतवंडांनी आणि आप्तेष्टांनी स्वीकारावा. सचोटीने वागावे. भांडणतंटा करू नये. सर्वांना शुभाशिर्वाद देणारा - आबाजी बळवंत गोखले, वय वर्षे ९४."

दि. २६ ला आबाजींना विमानाने नागपूरला आणले. सुमारे पंधरा दिवस रोज आबाजींच्या भेटीला येणाऱ्यांची वर्दळ सुरु होती. आबाजी खूप उत्साहात होते. येणाऱ्यांचे आदरातिथ्य, चौकशी आणि गप्पांमध्ये रममाण झालेल्या आबाजींच्या जीवनातील ते शेवटचे आनंदपर्व होते.

पंधरादिवसानंतर आबांजींची जीवनज्योत अचानक मंद झाली. अशक्तपणा वाढला. चालवेनासे झाले. मात्र मेंदु तल्लख होता. जमेल तेवढे नामस्करण ते करत होते.


दि. १६ सप्टेंबर ९८ ला त्यांच्या इच्छेनुसार महाजन चाळीतील त्यांच्या जन्मनिवासस्थानी त्यांना नेले. आता आबाजींचे खाणे पिणे बंद झाले. देह पूर्ण थकला आणि चारच दिवसांनी घटस्थापनेच्या दिवशी पहाटे सोमवार दि. २१ सप्टेंबर ९८ ला आबाजींमधील चैतन्य अनंतात विलीन झाले.

दि. १६ सप्टेंबरला आपल्याला महाजनचाळीत नेत आहेत हे पूर्ण शुद्धीवर असलेल्या आबाजींना कळले, त्यावेळी त्यांच्या चेहऱ्या वरुन अतीव आनंद ओसंडू लागला. त्यादिवशी पाहिलेला त्यांचा तो, "चैतन्यमन आनंददायी चेहरा" हीच माझी त्यांच्याशी निगडीत असलेली शेवटची आठवण!

कै.आबाजींनी चोखाळलेल्या आनंदमार्गाची वाट कधीच संपू नये! सदैव चैतन्यमय - प्रेरणादायी ठरलेल्या या आनंदयात्रीच्या वाटेने अनेक आनंदयात्रींचा मेळा सतत चालता राहो !

***

अनुक्रमणिका



**श्री नर्मदा परिक्रमेहून परतल्यावर दि. २३ जून ऑक्टोबर १९७० ला तयार केलेल्या श्री नर्मदा प्रतिकृती समवेत आबाजी.**

## अनुक्रमणिका